
# माणूस

आक्टोबर ६२

मूल्य : एक रुपया



पत्रव्यवहाराचा पत्ता
' माणूस, ' मराठी मासिक
४१९ नारायण पेठ, पुणें २.

• • •

वार्षिक वर्गणी : आठ रुपये
किरकोळ अंक : एक रुपया

वर्ष दुसरें : ऑक्टोबर १९६२
अंक पांचवा



## या अंकांत

— सूचना —

१. प्रकाशित लेख, चित्रें इत्यादि बाबतचे सर्व हक्क स्वाधीन.
२. पुरेसें पोस्टेज सोबत नसल्यास नापसंत साहित्य लगेच निकालांत काढलें जातें.
३. या मासिकांत व्यक्त झालेलीं मतें ' माणूस ' मासिकाच्या चालकांचीं अधिकृत मतें असतातच असें नाहीं.

— जाहिरात व्यवस्था —
एस्. आर्. करमरकर. सुपर पब्लिसिटी, पुणें.

अभिराष्ट्रेण वर्धताम्




संपादक
श्री. ग. माजगांवकर

— सामाजिक अंतरंग —

रणावीण स्वातंत्र्य जेव्हां मिळालें ... ... रा. म. शास्त्री.

— साहित्य विभाग —

नाटकाचीं तिकिटें ... ... रामचंद्र हिंमणे
घडा ... ... प. त्रि. सहस्रबुद्धे
मोह ... ... सौ. कमलिनी अभ्यंकर
दलाल ... ... माधव आपटे
आधार ... ... ना. स. करंदीकर
शिक्षा ... ... रमेश सुळे
कविता ... ... नरेंद्र पराडकर सुधाकर देशमुख, मुकुंद वैद्य, विश्वनाथ जोशी, सोनांबेकर, श्री.

— रंगभूमि, चित्रपट —

ते कलावंत, त्या आठवणी ... ... सुधीर दामले
सप्तपदी ( परीक्षण ) ... ... रंगा मराठे

— विदर्भांतील उत्खननाविषयीं माहितीपर लेख —

— एका सामान्य कोंकणी कुटुंबाचा परिचय —

मुखपृष्ठ—दत्ता महाबळेश्वरकर. ' सीमोल्लंघनकालच दसरा '.



लिओनार्ड मोस्ले यांच्या " The Last Days of The British Raj "
या ग्रंथाच्या प्रदीर्घ परिचयाचा तिसरा व शेवटचा हप्ता.

रा. म. शास्त्री

भारताची फाळणी करून पाकिस्तान व भारत या दोन डोमिनियन्सना १५-८-४७ ला स्वातंत्र्य देण्याचें ठरलें खरें; परंतु फाळणी करायची कशी? प्रांतांच्या सरहद्दी कुणीं ठरवावयाच्या हे प्रश्न तितकेसे सोपे नव्हते.

पंजाबांत एक कोटी साठ लाख मुसलमान होते. तर हिंदु व शीख एक कोटी वीस लाख होते. बंगालमध्यें तीन कोटी तीस लाख मुसलमान होते तर हिंदु व इतर दोन कोटी सत्तर लाख होते. देशाचें राजकारण अखेर याच संख्या-शास्त्रावर स्थिर झालें होतें. एखाद्या विभागांत हिंदु किती? एखादा माणूस हिंदु असला काय किंवा मुसलमान असला काय ही गोष्ट कांहीं लहानसहान महत्त्वाची नाहीं हें पुढचा रक्तलांछित इतिहास लिहून ठेवणार होता.

सरहद्द प्रांतांत जिथें काँग्रेस मंत्रिमंडळाचा फाळणीपूर्वी संपूर्ण प्रभाव होता. त्या प्रांतानें सार्वमतानुसार पाकिस्तानांत जाण्याचें बहुमतानें ठरवलें असल्यामुळें त्या प्रांताचा प्रश्न वाघाच्या पोटांत जाणाऱ्या शेळीसारखा निकालांत निघाला होता.

ब्रिटिश सरकारनें फाळणीच्या रेघा ओढण्यासाठीं सर सिरील रॅडक्लिफ यांचें नांव सुचविलें होतें. सर सिरील यापूर्वी कधींच भारतांत आलें नव्हते व यामुळें ते हिंदूंचे वा मुसलमानांचे पक्षपाती असण्याचा संभव नव्हता. मुस्लीम लीगनें व काँग्रेसनें या नांवाला मान्यता दिली होती.

सर सिरील ८ जुलै १९४७ ला भारतांत आलें. ३५ कोटी लोकांपैकीं जवळजवळ नऊ कोटी लोकांचें भवितव्य ठरविण्याची अवघड कामगिरी त्यांच्या शिरावर होती. त्यांची कामगिरी हलकी व्हावी म्हणून जीं दोन ( Partition Commissions ) विभाजन-मंडळें स्थापन करण्यांत आलीं त्यांचे सभासद पुढीलप्रमाणें होते.–

# स्वातंत्र्य जेव्हा मिळालें

इंग्लंडमधील केम्सले गटाच्या वृत्तपत्रांचे प्रमुख युद्ध-वार्ताहर म्हणून मोस्ले यांचा इटली, फ्रान्स, जर्मनी, मध्यपूर्व, भारत या सर्व देशांत अनेकदां संचार झालेला असून १९३९ ते ४५ या कालावधींत महत्त्वाच्या अशा सर्व मुत्सद्यांशीं व सेनापतींशीं त्यांचा चांगलाच संबंध आलेला होता. महायुद्धानंतरहि भारतांत त्यांचें अनेक दिवस वास्तव्य होतें व भारतीय राजकारणांतील सर्व प्रमुख व्यक्तींशी प्रत्यक्ष चर्चा करूनच त्यांनीं प्रस्तुत ग्रंथ लिहून पूर्ण केला.



ग्रंथकार लिओनार्ड मोस्ले

### बंगालसाठीं

| | |
|---|---|
| १ जस्टिस् सी. सी. विश्वास. | २ बी. के मुखर्जी. |
| ३ साले महंमद अक्रम | ४ एस्. ए. रहमान. |

### पंजाबसाठीं

| | |
|---|---|
| १ जास्टिस मेहरचंद महाजन. | २ तेजासिंग. |
| ३ दीन महंमद. | ४ महंमद मुनीर. |

या सर्वांनीं सर सिरील यांच्या नेतृत्वाखालीं विभाजन पुरें करावयाचें होतें. सर सिरील भारतांत आल्यावरची हकिगत मोस्ले सांगतो–

" ज्या दिवशीं सर सिरील रॅडक्लिफ भारतांत आले त्याच दिवशीं सायंकाळीं त्याची हिंवी पुढाऱ्यांशी व्हाईसरॉय साहेबांनीं भेट घडवून आणली. नेहरू, पटेल, जीना, लियाकत हजर होते. सर सिरील यांनीं विचारलें की, काम पुरें करावयास अवधि किती आहे? यावर माउंटबॅटन म्हणाले–

" पांच आठवडे–"

सर सिरील यांनीं आश्चर्योद्‌गार काढण्यापूर्वीच नेहरू म्हणाले–

" जर पांच आठवड्यापूर्वीच निर्णय करतां आला तर सध्यांच्या परिस्थितीत तें अधिक स्वागतार्ह आहे.–"

जीना आदी सर्वांनीं नेहरूंच्या म्हणण्याला मानेनें दुजोरा दिला.

## रॅडक्लिफ आले !

सर रॅडक्लिफ यांनीं मुख्य कचेरी दिल्लीत ठेवली व लाहोर व कलकत्ता येथें आपल्या कचेरीच्या शाखा उघडल्या.

सर रॅडक्लिफ यांना भेटण्याकरतां शिष्टमंडळें व हजारों व्यक्ती येऊं लागल्या. पहिली अडचण उत्पन्न झाली ती प्रांतांचे सशयातीत नकाशे कुठें मिळवायचे ? पंजाबाचें थोडें–फार निरीक्षण करताच सर रॅडक्लिफ साहेबाचें असें मत झालें कीं, पंजाबची फाळणी केवळ अशक्य आहे. बंगालमध्यें पश्चिम बंगालांत हिंदु बहुसख्य होते आणि पूर्व बंगालमध्यें मुसलमान बहुसंख्य असल्यामुळें फाळणीचें काम थोडें–फार सोपें होतें. परंतु पंजाबात शिखांचें आस्तित्व साऱ्या पंजाबभर होतें. ज्या नद्यांच्या कालव्यावर पंजाब हा गव्हाचें कोठार म्हणून ओळखला जाऊं लागला त्या नद्या पूर्व पंजाबांतून पश्चिम पंजाबांत जात असल्यामुळें ज्याची नदी त्याचा कालवा असें झाल्यास पाकिस्तानची नाकेबदी होणें शक्य होतें. त्यांनीं सूचना करून पाहिली कीं, फाळणीची हद्द कशीहि ठरली तरी कालव्यांवर दोन्ही देशांचा अधिकार रहावा परंतु जीना व नेहरू यांनी कसल्याहि तडजोडीपायी आतां एकत्र रहाणें नको असें स्पष्ट सांगितल्यामुळें सर रॅडक्लिफ निराश झाले.

सर रॅडक्लिफ यांनीं आपला अहवाल मुदतीच्या आंत पुरा केला. ९ ऑगस्ट ४७ ला बंगालच्या विभाजनाची व ११ ऑगस्ट ४७ ला पंजाबच्या विभाजनाची रूपरेषा तयार झाली.

पंजाबच्या विभाजन–मंडळाचे सदस्य तेजासिंग यांची मुलें व बायको यांचा रावळपिंडीच्या दंगलींत खून पाडण्यांत आला. या घटनेनंतर तेजासिंगांनीं क्रुद्ध अवस्थेंत पंजाबच्या फाळणीची रूपरेषा गुप्त ठेवण्याची शपथ कितपत पाळली असेल याचा वाचकानीं विचार करावा. पंजाबचे गव्हर्नर सर ईव्हॅन जेनकिन्स यांनीं रावळपिंडीच्या मुसलमानाना तेजासिंगांची माफी मागण्याचा केलेला आग्रह मुसलमानांनीं मानला नव्हता."

तेजासिंगांची मानसिक अवस्था विचारांत तरी घेतां येईल. परंतु मोस्ले स्पष्ट लिहितो–

**" सर रॅडक्लिफ यांचीं सहकाऱ्यांशी जीं खाजगी गुप्त बोलणीं होत त्यांचा सुगावा मुसलमान वृत्तपत्रांना अचूक लागत असे. व त्याचें इतिवृत्त जाड मथळ्यांत छापण्यांत येत असे. "**

त्यावेळी भारतांतील परिस्थिति लेखक सांगतो–

" पंजाबांत शिखांमध्यें लाहोर पाकिस्तानांत जाणार हें वृत्त फैलावलें होतें व निर्वासितांचे तांडे सरहद्द ओलांडण्यासाठीं गावें सोडून निघाले होते. तर लखनौच्या रेसिडेन्सीवर दीडशें वर्षें अविरत फडकणाऱ्या युनियन जॅकचें काय करायचें हा प्रश्न इस्मे यांच्यापुढें पडला होता. "

' दिल्लीला स्टेशनवर पाट्या लागल्या होत्या–" आपण पाकिस्तानात जात असल्यास आपलें रेशनकार्ड परत करण्यास विसरूं नका–"

" युक्त प्रांतांत सरकारी पत्रकान्वयें यापुढें इंग्रजांनीं केलेली चुकीची स्पेलिंग्स बदलण्याचा विचार सांगून गॅंजेस्‌ला गंगा, जमुना ऐवजीं यमुना आणि बेनारेस ऐवजी बनारस असे उच्चार रूढ करण्यांत येणार असल्याचें जाहीर झालें होतें "

भारताच्या राजधानीत १५ ऑगस्ट समारंभाची तयारी धुमधडाक्याने सुरू झाली होती. निरनिराळ्या कमिट्या स्थापन होत होत्या. मिरवणूक कमिटी, सास्कृतिक कार्यक्रम कमिटी, रहदारी नियंत्रक कमिटी, एक ना दोन ! अलवार संस्थानातून पळालेले चार हजार मेओ दिल्लीत दाखल झाले होते व उघड्या मैदानांतून तळ ठोकून होते. त्यांची खाण्यापिण्याची काय सोय लावावी या चिंतेंत अधिकारीवर्ग होता.


पंजाबांत जातीय द्वेष आतां धुमसूं लागला होता. व रॅडक्लिफ ॲवार्ड जाहीर होतांच पंजाब पेटेल याची सर ईव्हॅन जेनकिन्स या पंजाबच्या गव्हर्नरांना योग्य कल्पना असावी. त्यांनीं तांतडीनें इस्मे याची भेट मागितली. इस्मे ऐवजीं जॉर्ज ॲबेल यानीं १० जुलैला त्याची सिमल्याला भेट घेतली. त्याचें प्रतिवृत्त पुढीलप्रमाणें नमूद आहे–

## कर्तारसिंगांची मुलाखत

" माझें काल रात्रीं पंजाबचे गव्हर्नर जेनकिन्स याचेशी बराच काळ बोलणें झालें. पंजाबात शिखांची मन:स्थिती धोकादायक झालेली आहे. हिंदु–मुसलमानाचे व्यवहार कायदा गुंडाळूनच होत आहेत. लाहोर आणि अमृतसर या शहरांत आणि लाहोरमध्यें विशेषत: अशांति आहे. लाहोर सोडून जाण्याच्या मन:स्थितींत शीख व हिंदु नाहीत. लाहोरमध्येंच तळ ठोकून पंजाबची फाळणीच होणे कठीण करून टाकण्याचा त्याचा इरादा आहे. पटेल व नेहरु याच्या कानांवर या गोष्टी घालून, हिंदु शीखाना चार उपदेशाच्या गोष्टी सांगून लाहोरवरील हक्क सोडावयास लावणें अगत्याचें आहे–"

ही मुलाखत आटोपताच सर जेनकिन्स यांनीं माउंट बॅटन यांना १० जुलैलाच शिवाय पत्र लिहिलें, त्यांत ते लिहितात–

( पृष्ठ ३१ वर चालूं )



# नाटकाचीं तिकिटें

रामचंद्र हिंगणे

संध्याकाळीं सात-साडेसातच्या दरम्यान शहरांतली रहदारी जोरांत होती. चौकांतून सायकली धांवत होत्या. मोटारी भर वेगानें पळत होत्या. अबलख तरुणीं-सारख्या रिक्शा तुफान वेगानें क्षणाधींत दिसेनाशा होत होत्या. त्यांच्यांतून टांगे-वाल्याची टकटक चालली होती. या सगळ्या धांवपळींतून माणसं आपला जीव मुठींत धरून रस्त्याच्या कडेकडेनें चालत होतीं.

त्या चौकाला लागून एक ओटा होता. त्या ओटयावर ५५ वर्षांचा एक उग्रट चेहऱ्याचा मनुष्य बसला होता. मनुष्य कसला, राक्षसच होता तो. वयानें म्हातारा असला तरी त्याची शरीरप्रकृति चांगली दणकट होती. तरुण-पणांत मारलेल्या अनेक कुस्त्यांचा तो परि-णाम होता. काळ्याकुट्ट चेहऱ्यावर देवीचे वण होते. कांहीं दांत पडले होते. जे होते त्यांतले दोन चांगले बाहेर आले होते. पोट चांगलें गरगरीत आणि पुढें आलें होतें. पुढें आलेल्या दातांनीं त्याच्या एकंदर ठेवणींत उग्रता आली होती.

—त्याच्या चेहऱ्याची ठेवण उग्र होती यांत शंकाच नव्हती. पण त्याहिपेक्षां त्याचीं कृत्यें अधिक भीषण होतीं, असं लोक म्हणत असत. आतांपर्यंत त्यानें दोन खून केले होते. आणि त्यांच्यांतून तो कसा कोण जाणें पण सुटला होता. प्रसंग पडला तर कोणत्याहि माणसाला तो चांगला चोपून काढील आणि पोलीसखातें त्याला कांहीं करणार नाहीं अशी लोकांत कां कोण जाणें समजूत होती.

—आणि तें खरं असावं. कारण पंधरा—वीस तरणींबांड ताकतवान पोरं त्याच्या सारखीं दिमतीला असत. त्याच्या तोंडून शब्द निघा-यचा अवकाश कीं, तीं पोरं वाटेल तें करूं शकतील इतकी खात्री लोकांना होती.

—सज्जन संसारी लोक 'सुसरबाई, तुझी पाठ मऊ' या नात्यानें त्याच्याशीं वागत. जो-पर्यंत तो आपल्या वाटेल जात नाहीं तोपर्यंत आपल्याला काय करायचें आहे असें थोर लोक बोलत! आणि गरीब लोक भिऊन वागत! त्याच्याशी विरोध करणें महापाप आहे, अशी गरिबांची प्रामाणिक समजूत होती.

गरीबांची ती प्रामाणिक समजूत अना-ठायीं नव्हती. त्यांना रोजच्या तोंडमिळवणीचा जिथं प्रश्न पडत होता, तिथं त्या माणसाशीं खोडी काढून आपल्यावर संकट ओढवून घ्याच कशाला?—

थोरांनीं उपेक्षिलेला, सज्जनांनी भीति-युक्त आदराने दुर्लक्षिलेला, गरीबांनीं टाळलेला तो महापुरुष चौकाच्या कट्यावर आपले दोन दांत बाहेर काढून शांत बसला होता. त्याच्यापासून दूर अंतरावर त्याचा आदब राखण्यासाठीं चार तरणीं पोरं बसलीं होतीं. त्या पलिकडे दोन तरुण दोन बाजूला शांत उभे होते आणि कुणीतरी माणसें त्यांना

खुणेनेंच काहींतरी विचारीत होतीं. तीं विचारणारी माणसं त्या इसमाला–दादाला–नमस्कार करून पुढं जात होतीं आदबीनें.

दादा बसले होते त्या ओटयापासून थोडया बाजूला तीं माणसं वळून एका बोळांत जात होती. त्या बोळाच्या कोपऱ्याला एक कचऱ्याची कुंडी होती. आणि त्या बोळांत !!

हारीनें माणसें उभीं होती. त्या उभ्या माणसांत श्रीमंत होते. गरीब होते. म्हातारे होते. तरुण होते. अशिक्षित होते. सुशिक्षित होते. जगांत मान्यता पावलेले महापुरुष होते, तसेंच जगाच्या शेणात लोळणारे किडे पण होते. सर्व प्रकारचीं, सर्व दर्जाची सर्व जातीचीं माणसं तिथं आपला भाव, आपला दर्जा, आपली श्रेष्ठता विसरून उभीं होती. त्या बोळांत एक तरुण उभा होता. तो बाटलींतून काहीतरी ओतून देत होता, आणि ओळीने उभी राहिलेली माणसें आवाशासारखी तें पिऊन टाकीत होतीं. घाईनें, आवडीनें, घांदलीनें. एक प्रकारच्या भीतीनें.

चौकात उभ्या राहिलेल्या तरुणांना विचारणें, दादांना नमस्कार करणे आणि कचरा कुडीच्या शेजारी असलेल्या बोळांत उभे राहून काही तरी पिणें याची साखळी,एकाएकी तुटली गेली."पूना पोलिस' अशीं अक्षरं असलेली एक मोटारगाडी त्या चौकांत येऊन थांबली. त्या गाडीतून सात–आठ पोलिस खाली उतरले. बाटलीतून द्रव्य ओतणाऱ्या माणसाला त्यानी पकडले. आणि पुढें बरेच सोपस्कर झाले. हें सगळे होईपर्यंत ओटयावर बसलेला ' दादा ' शांत होता. रोजच्या धंद्यावर गदा आली होती तरी त्याची शांतता ढळली नव्हती. जसें कांही भोंवतालच्या वातावरणांत काहीच घडलें नाहीं असें तो भासवीत होता. त्याची ती धीरगंभीर शातता पाहून जमावाला मोठं आश्चर्य वाटलं.

आणि अर्ध्या तासानंतर पोलिसांची ती मोटार निघून गेली नाहीं तोंच पहिल्यासारखा प्रकार परत सुरू झाला. जसें काहीं अर्ध्या तासापूर्वी कांहीं घडलेंच नव्हतें. पोलिसांची मोटार त्या ठिकाणीं आलीच नव्हती. रस्त्यावरची रहदारी थांबलीच नव्हती. कुणाला तरी पोलिसानीं पकडून नेलेच नव्हतें. जसें कांहीं अर्ध्या तासापूर्वीचा एक तासाचा कालखंड जगाच्या हिशेबांतून पार वजा करण्यांत आला होता. जगाच्या हिशेबात तो कालखड धरण्याचं खरोखरीच कांहीं कारण नव्हतं.

आणि दादाला तें हिशेबांत धरण्याच काय कारण असावं ? सकाळीं रोज पोस्टमन नऊ वाजतां दारावरून जातो त्याचं आपल्याला नवल वाटतं कां ? काय कारण ? तसच आठ–पधरा दिवसांनीं पोलीसखातें धाड घालण्यासाठी येत होतें, धाड घालून जात होतें, काय व्हायचें तें होत होते. प्रत्येक वेळी नियमित, गरीब पोराचा पचनामा होत होता ! तो तुरुगांतून सुटून येईपर्यंत त्याच्या घराच पोषण दादा करीत होता ! जगाचं रहाटगाडगं सुरळीत चालल होतं ! सगळं कांही ठरल्यासारखं घडत होत !!

नित्याप्रमाणें आजहि घडलं. पोलीस आले पचनामा झाला. लोक पळाले. बघे जमले. सगळं नाटक पूर्ण झालं.

–पण त्या दिवशीं दादानें मनाशी एक निश्चय केला. आपल्या गिऱ्हाईकांची झालेली पांगापाग त्याना बघवली नाही. प्रतिष्ठित लोकाची, आपल्या आश्रयाखालीं आल्यास काही धोका नाहीं, या समजुतीनें आलेल्या लोकाची धांवपळ त्यांना पाहवली नाही. त्याच मन कुठं तरी नाराज झालं. आपण एवढें मोठें असतांना आपल्या दारीं आलेल्या लोकाची धांवपळ पाहून त्या निर्दय माणसाच्या पोटांतहि गलबलून आल्यासारख झालं.

––नव्हे प्रत्यक्ष कळवळून आलं. आतां आज पुढें काय ? या संभ्रमात दादाच्या पुढें चार–पाच तरुणीबांड पोरं उभीं होती. त्याना उद्देशून दादा म्हणाले, " उद्यांपासून विक्री माझ्या घरात सुरूं होईल ! –"

"दादाना वेड तर लागले नाही ना ?" अशा अर्थाने त्या तरुणांनी दादाकडे पाहिलें. दादांचा निश्चय त्यांच्या चेहऱ्यावर सुस्पष्ट दिसत होता.पोरानी मनाशीं खूणगाठ बांधली. दादाच्या एकदां मनात आल्यानतर दादा मार्गे-पुढें पहाणार नाहींत. दादानीं अजूनपर्यंत कुणालाच भीक घातली नाहीं. कुणाच्या पुढें नमले नाहीत. काय वाटेल तें सहन केलें पण एकदा घेतलेला निर्णय माघारी फिरवला नाहीं– 'असं करूं नका' असं सांगण्याची कुणाला छाती झाली नाही. तसं कुणीं सांगितलं असतं, तर आपला अपमान केला आहे, अशा समजुतीनें दादानें त्याच्या मुस्काडात अशी कांही जोरांत मारली असती कीं, त्याचे चार–सहा दांत सहज बाहेर आले असते. आणि ते दात पडल्यामुळें " तुम्हीं मला का मारलेत ?" असें विचारण्यासाठीं कुणाची बत्तिशी उचकटली नसती !!

––त्या दिवसानतर माल जरी बाहेर होता तरी विक्री प्रत्यक्ष दादाच्या घरांत सुरू झाली होती. सर्वसाधारण जनतेंत दादांचा जसा वचक होता, तस पोलीसखातेंहि दादाला जरा बिचकून होतं. जो तो पोलीस मनाशी म्हणत होता. कायद्याच्या आश्रयाखाली दादाचं आपण बरेंवाईट करूं शकू ?– पण उद्यां दादांच्या हस्तकाकरवी आपलं जर बरंवाईट झालं तर आपल्या कुटुंबाच पालनपोषण करणार कोण ?– सरकार थोडच आपला संसार सुरळीत चालवू शकणार आहे ? आणि आपला जीव फुकटच्या फुकट जाईल त्याचं काय ?–

त्या डिव्हिजनच्या फौजदाराची बदली झाली आणि नवीन फौजदार कोण येणार याची चौकशी पोलिस खात्याशी सबंध असणाऱ्या लोकांत जोरात सुरू झाली. नवीन दाखल होणारे फौजदार प्रत्यक्ष कामावर हजर होणाऱ्या अगोदर त्या फौजदाराच्या आवडीनिवडी, त्या फौजदाराच्या अंगात असलेल्या गुणावगुणांची माहिती त्या लोकात येऊन दाखल झाली. आणि अनेक ठिकाणी अनेक प्रकारचे बेकायदेशीर धदे करणारी जनता हवालदिल होऊन गेली !!

–कारण नवीन येणाऱ्या फौजदाराचं नांव माने होतें. गुंडापुढें आतापर्यंत त्याने आपली मान कधीच वाकवली नव्हती इतकेंच काय चार–पांच गुंडांच्या बरोबर एकटयानें मुकाबला करण्याची ताकद त्याच्या ठिकाणी होती. जिथ दहादहा पोलिस प्रवेश करण्यास घाबरत असता तिथ त्यानं एकटयानें अनेक वेळां प्रवेश केला होता. गुंडाना लोळवलें होतें. पान-सुपारीची त्याला हाव नव्हती. कारण घरात भरपूर पानं आणि सुपाऱ्या त्याच्या खानदानी पानाच्या डब्यात पडून होत्या !

–आणि ही सगळी हकीगत कळल्यानतर ती जनता मनांतल्या मनांत घाबरून गेली ! दोन दांत पुढें आलेल्या दादाच्या कानांवर ही बातमी गेली तेव्हा, दादा हसून म्हणाले, "आपला जम बसेपर्यंत फौजदार असाच दमात वागत असतो. एकदां आळीतल्या लोकात सामील झाला कीं, त्याची शान आपोआपच बदलून जाते. तेरडयाचे रग तीन दिवस !!"

—फौजदारसाहेब कागदोपत्री कामें पटपट उरकीत. निरपेक्षबुद्धीनें कामें करण्याची त्यांची हातोटी पाहून जगदाळे जमादार आश्चर्यचकित झाले. या वाघापुढें आपलं कांहीं चालणार नाहीं, याची त्यांना खात्री झाली. आणि ते सुतासारखे सरळ आले.

—मानेसाहेब कागदोपत्रीं कामें उरकीत तशीच त्याना अजून एक सवय होती. वेळीं अवेळीं गेटाच्या बाहेर खुर्ची टाकून ते बसत आणि जाणान्या-येणान्या माणसावर ध्यान ठेवीत. त्यातल्या एखादा मनुष्य विशेष वाटला तर त्याला ते अचूक निवडून काढीत आणि त्या इसमाबद्दलची माहिती जगदाळे जमदाराला विचारीत.

—गेटाच्या बाहेर आज मानेसाहेब असेच खुर्ची टाकून बसले होते. समोरून एक उत्तम प्रकृतीचा पण सामान्य सौंदर्यांचा तरुण येतांना त्याना दिसला. त्याच्या हातांत पुस्तकें होतीं, आणि अगदीं शातपणें रस्त्याच्या कडेने रहदारीचे नियम पाळून तो तरुण चालला होता वडिलांच्या दादागिरीचा उर्मटपणा त्याच्या ठिकाणीं नव्हता कीं, विनासायास मिळालेल्या अफाट सपत्तीचा गर्व त्याच्या चेहन्यावर नव्हता. त्याच्या चेहन्यावर होती विद्वत्ता आणि नम्रता. तो जवळ आला. फौजदारसाहेबानी जगदाळयाला बोलावून घेतलें. नजरेचा कटाक्ष त्या तरुणावर टाकून फौजदार म्हणाले, "तो येत आहे तो तरुण कोण?"

जगदाळे जमादार थोडे चमकले. थोडे शरमले. अपराध्यासारखा चेहरा करून ते म्हणाले, "हा त्या दादाचा थोरला मुलगा!"

"कोणत्या दादाचा?"

"परवा तुम्हांला सांगितल त्या दादाचा हा थोरला मुलगा—"

"कॉलेजमध्यें असतो?"

"असं वाटतंय्!"

"दारुधद्याशी यांचा कांही संबंध?"

"मुळीच नाहीं-"

स्वतःच्या मांडीवर हात मारून ते म्हणाले. "Good!"

—एके दिवशी सकाळच्या वेळीं माने फौजदारानीं त्या मुलाला गांठलं. गेटात त्याच्याशी ते मोठ्या आदबीनें वागले. त्याच्या हातावर नाटकाचे दोन पास ठेवले आणि माने म्हणाले, "तुमच्या अभ्यासक्रमाला आहेत ही नाटकं. मला दोन पास आले होते ते तुम्हांला देत आहे. नाटकाला मात्र जरूर जा!"

—दादांचा मुलगा नाटकाला गेल्याची खात्री माने फौजदारांनीं करून घेतली. थोडा वेळ जाऊन दिला आणि कशी काय कीं, अनेक शिपाई तिथें दाखल झाले एका क्षणांत. बिगर कपड्यांतले. त्यानी सरळ दादांच्या घराकडं मोर्चा वळवला. माने फौजदारानीं त्याच मोहिमेचं पुढारीपण आपल्या स्वतःकडं घेतलं होतं.

पण लोकांची गेटाच्या हालचालीवर अत्यंत तीक्ष्ण नजर आहे, हें मानं फौजदारांना माहीत नव्हतें. दादाचं डिपार्टमेंट पोलिस डिपार्टमेंट पेक्षां जास्त प्रभावी ठरलं. पोलिसाची धाड मात्र दादाच्या घरात जाण्याच्या वेळीं त्या घरांत एकटचा दादाशिवाय कुणीहि नव्हतं. आपल्या घरात धंदा सुरू केल्यापासून पोलीसाच्या हालचालीवर खास लक्ष ठेवण्यासाठीं दादानी माणसं ठेवल्याचा तो परिणाम होता. पोलीसखातं नाराजीने मागं फिरलं तर दादा म्हणाला. "मानेसाहेब, तुमच्यासारखी फार पोरं खेळवलीत मी.

"पण माझंहि नांव माने आहे. हें ध्यानांत ठेवा!" रिव्हाल्व्हरवर हात ठेवीत माने म्हणाले.

"आतां तुम्ही माझ्या वाटेला गेलाच आहांत. पुढें पाहूं काय तें—" या वाक्यासरशी माने फौजदार मागें वळले. त्याचे डोळे एकदम लाल झाले. सतापलेल्या क्रूर नजरेनें मान्यानीं त्याला आपादमस्तक न्याहाळलं. आणि ते एवढेंच म्हणाले, "मी कधीहि तयार आहे. पण बायकासारखा पाठीमागून वार करूं नकोस—"

खिडकीचा गज हातांत धरून आत्मविश्वासानें, धमकावणीच्या स्वरांत दादा म्हणाला, "जें काय काय होईल तें समोरासमोर होईल. सांगून सांगून होईल—"

दोन पोलादांच्या घासाघासीत ही जी ठिणगी पडली तिनें पोलिसखात निकडीला लागलं. दादांचे आश्रित तयारीला लागले.

—आणि दोन तासात दादाच्या घरावर परत धाड आली. त्यावेळी दादाच्या घराला कुलूप होत. दादा बाहेर ओटचावर बसून माने फौजदाराकड पाहून हंसत होता. दादानं किल्ली त्याच्या अगावर फेकली आणि ते म्हणाले, "खुशाल घरांत शिरा!"

—असं सांगण्यांत दादाचा कोणता डाव आहे हें न समजल्यानें मानेसाहेब शांत राहिले. माघारी फिरले.

—दादा आणि माने फौजदार याच्यामधली ठिणगी जास्त मोठं स्वरूप धारण करूं लागली. त्या ठिणगीचा वणवा कधीं होईल याचा नेम लागेनासा झाला. जे पोलिस व्यवहारी होते ते मनात म्हणत होते "हे माने भारीच कडक. इतकं तरी करून कसं चालेल! दादानं कुठ घात केला की, सपायचंच सगळं," दादाचे लोक आपसांत कुजबुजत. "आपल्यापैकी दहा-पांच लोकांना तरी खडी फोडायला जायला लागणार. कदाचित् एखादा फांशी पण जाईल."

—आणि एक दिवस उजाडला.

दादानें रात्री घेतलेली दारू पूर्णपणें उतरली होती. सकाळी दहाच्या दरम्यान ते घराबाहेर आले आणि ओरडून त्यानी दहा-पांच लोकाना हाका मारल्या. अपेक्षित माणस भोंवती जमली आहेत अशी खात्री होतांच गडगडाटी आवाजानें ते म्हणाले. "आजपासून आपला धंदा बंद. माझ्या घराच्या आसपास धंदा होणार नाही. ज्याला कुणाला धंदा करायचा असेल त्यानें आळीच्या बाहेर खुशाल करावा. पण इथं नाही—"

—सिहानें मांसाहार सोडून गवत खाण्याचें सुरू केले ही बातमी चार-पाच दिवसात आळींतल्या पोरानादेखील कळली. लोकानी आपआपल्या अकलेप्रमाणें पुष्कळ तर्क केले, पण दादानी आपला धदा बद कां केला हें मात्र कुणालाच कळलं नाहीं. मात्र सर्वसाधारण जनता दादाला कळणार नाही, ऐकू जाणार नाहीं एवढ्या बारीक आवाजात म्हणत होती. "दादानी शेवटी मानें फौजदारापुढं हार खाल्ली हेंच खरं—"

—लोकांत चाललेली ही कुजबुज दादाच्या कानांवर कुणींतरी घातली. प्रथम ते सतापले पण त्यांनी आपला राग आवरला. सागणान्या माणसाला ते म्हणाले "लोक काहीं का म्हणेन ० आपल्याला काय त्याचं?—पण त्याच्यासारखा चांगला फौजदार अजून आपल्या आळीत आला नाही—"

मान्याच्या जिवावर उठलेला दादा अस बोलतो आहे, हें ऐकून बोलणारा इसम म्हणाला "तुम्ही तर त्याला माराची धमकी दिली होती."

"म्हणून काय झालं?"

(पान ३० वर चालू)

# राजहंस प्रकाशन

४१९ नारायण पेठ, पुणें २

## आमचेकडे मिळणारीं निवडक पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| मुजऱ्याचे मानकरी | ब. मो. पुरंदरे | १.२५ |
| सहा साहसें | दा. सी. देसाई | २.०० |
| ग्रामदानाची प्रयोगभूमि | श्री. ग. माजगांवकर | २.५० |
| आम्ही विष्णुदास | " | ०.५० |
| स्वराज्याचे युगमंत्र | " | ०.२५ |
| विद्यालंकार | प्रभाकर इनामदार | १.३० |
| झांशीची राणी | प्रभाकर शिदोरे | १.०० |
| हेमा सात बुटके | भालचंद्र भिडे | १.२५ |
| रक्षाबंधन | गो. नी. दांडेकर | १.५० |
| सावित्री | ब. मो. पुरंदरे | ०.५० |
| परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २.०० |
| गुजरातेंतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७.०० |
| मडकोबा | भा. रा. भागवत | १.०० |
| बडबडमामा | लीलावती भागवत | ०.७५ |
| दयाळ | यदुनाथ थत्ते | २.०० |
| स्वैरविचार | ग. त्र्यं. माडखोलकर | ३.५० |
| वाङ्मयविलास | " | ५.०० |
| भारत आणि चीन | रा. कृ. पाटील | ८.०० |
| पायवाट ( काव्य) | बाबा मोहोड | ३.२५ |
| त्या तिथें पलिकडे | रॉय किणीकर | २.५० |
| असिधारा | दे. गो. उदापुरे | ३.०० |
| आम्ही भगिरथाचे पुत्र | गो. नी. दांडेकर | १०.०० |
| आनंदवनभुवन | " | ६.०० |
| पूर्णामायचीं लेकरं | " | ४.०० |
| कुऱ्हाडीचा दांडा (नाटक) | " | ०.५० |
| शितु ( " ) | " | २.०० |
| पवनाकाठचा धोंडी ( " ) | " | २.५० |
| उद्धव ( " ) | मंगेश पत्की | २.०० |
| मराठ्यांचें सिंहासन ( " ) | गो. कृ मुंगळीकर | २ ०० |
| गांजलेले जीव भाग १ ते ४ | भा. रा. भागवत | १२.०० |
| शिंगी | " | २.५० |
| पाताळलोकची अद्‌भूत यात्रा | " | ३.०० |
| चिटोऱ्याचा प्रताप | " | २.०० |
| हिंमतवान जासूद | " | ६.०० |
| कोल्होबाची करामत | वऱ्हाडपांडे | १.०० |
| जमिनीवरची माणसें | शांताराम | ३.५० |
| ऐकलेल्या गोष्टी भाग १, २, ३, | भवानीशकर पंडित | १ ५० |
| सत्तावनचा सेनानी | वसंत वरखेडकर | ४.०० |
| राजपुत्र | " | २.५० |
| डोंगर माथ्यावरील दिवा | ना. रा. शेंडे | ३.०० |
| संतसमागम | भ. श्री. पंडीत | ३.५० |
| वसंत फार दूर नाहीं | अंबादास अग्निहोत्री | ३.०० |
| जळांतील मासा | जयवंत दळवी | ४.५० |
| पतंगप्रीत | म. वि. कुलकर्णी | ४ ०० |

# धडा

प. त्रिं. सहस्रबुद्धे

तुम्हांला कदाचित् लहान मुलगी असेल ती हळूहळू उपवर होईल व तिला दाखविण्याची वेळ तुमच्यावर येईल. अशा वेळीं तुम्ही बरोबर असलांत तर कसं वागाल ? किती बोलाल ? प्रश्न साधा. उत्तर सहज सुचण्यासारखं. परंतु अशीच एक घटना चालू असतांना विचित्र अनुभव आला. अन् मला शहाणं करून सोडणारा धडा मिळाला.

तरुण मुलींचीं लग्नं जमवून देण्याचा मला हव्यास आहे. उपवर मुलींचीं लग्नं जमणं किती त्रासाचं होऊन बसलं आहे. भिरभिर हिंडून मुलीच्या बापाचे जोडे तर फाटततच पण निराशा, अपमान व निरुत्साह यांचे चटके वरचेवर बसून बिचारा टेकीस येतो. अशांच्याबद्दल नकळत मला सहानुभूती वाटते. मनःस्ताप देणारी वेळ कोणत्याच मुलीच्या बापावर येऊं नये या सोज्वळ भावनेनं स्थळ मिळवून देणं, नंतर लग्न जमवणं इ. कामांत मदत करण्यास सरसावतो. मनांत स्थिर झालेली सहानुभूती स्थळं शोधणं, टिपणं जमवणं, लग्न जमवण्यांत सहाय्यक होणं, या बाबतींत मला प्रोत्साहन देते. हा माझा उद्योग कित्येक दिवस सतत चालू आहे. धंद्याचं स्वरूप घ्यायचं नाहीं म्हणून. एरवी शेंकडों ठिकाणांची माहिती. अनेक टिपणांचा संग्रह. कित्येक वधुवरांच्या आवडी निवडी, आशा आकांक्षा इ. ची भरपूर माहिती मजजवळ सांचली आहे. मुलगी उपवर झाली की तिचा बाप माझ्या मदतीची याचना करतो. माझ्या प्रयत्नानं लग्न जमलं तर समाधानाचा निःश्वास मी सोडतो. हाच माझा आनंद हीच माझी अनन्य सुखाची कल्पना.

ज्यांचा माझा दूरचाहि संबंध नाहीं अशा अनेकांच्या जन्मगांठीं माझ्या मध्यस्थीनं बांधल्या गेल्या. मग शेजारच्या शकूबद्दल मी हिरीरीनं प्रयत्न करावा. स्थळ शोधावं. टिपण जमवावं व तिला दाखवायला न्यायला तयार व्हावं यांत कांहीं नवल नव्हतं.

मीं हा व्यवसाय सुरू केला तेव्हां शकू लहान होती. खेळतां खेळतां ती आमच्याकडे यायची. कांहीं खाऊं हातावर पडला कीं धांवतच परत जायची. तिचे वडील वारले व शकूवरचं मायेचं छत्र दैवानं हिरावून नेलं. आईवर दुःखाचा डोंगर कोसळला. शकूच्या या दुर्भाग्यामुळं माझ्या अंतःकरणाला चटके बसले. नकळत तिच्याबद्दल वात्सल्याची भावना वाढली.

आतां ती मोठी झाली होती. बाल्यांतल्या पोरकटपणाच्या खाणाखुणा लोपल्या. तारुण्याची झळाळी तिच्या सर्व हालचालींवर पसरली. आयुष्याशीं झगडत दिवस काढणाऱ्या तिच्या आईनं शकूचं लग्न करण्याचं ठरवल्याचं समजतांच मी नेटानं कामाला लागलों. शकूचं लग्न आपल्याच प्रयत्नानं ठरावं. ती सुखी होईल असंच स्थळ तिला लाभावं. याची खूणगांठ बांधून मी शोधाशोध करूं लागलों.

शकू सुंदर होती. सुस्वभावी होती. मोकळ्या मनाची. खेळकर स्वभावाची. तिचा मोकळेपणा क्वचित अतिरेक करतो कीं काय याची भीति वाटावी इतका अमाप होता. एकदां ती बोलायला लागली कीं तिला कशाची शुद्ध राहात नसे. ऐकणारालाच वाटें पोरगी किती वेळ बोलते आहे. दमत कशी नाहीं ? तिला मात्र त्याचं कांहीं वाटत नसे. तिचा बोलघेवडेपणा सगळ्यांना ठाऊक झाला होता. अभ्यासांतील हुशारी. खेळण्यांतील चपलता, वागणुकींतला गोडवा सर्वांना माहीत झाला होता. अशा शकूला योग्य स्थळ मिळणं सोपं मात्र नव्हतं. कारण तिच्या आईजवळ पैसा नव्हता. कांहींतरी उद्योग करून कसें तरी ती भागवीत होती. तिच्याजवळ सांचवलेली माया कांहींच नव्हती. अर्थात हुंड्याशिवाय योग्य ठिकाण मिळवून देणं हें जवळजवळ अशक्य होतं.

शकूबद्दलची जिव्हाळ्याची भावना, तिच्या आईचें दारिद्र्य व शकूच्या सुखासाठीं तिची घडपड मला स्वस्थ बसूं देईना. प्रयत्नांची शिकस्त करण्याचं मीं ठरवलं...आणि शकूचं सुदैव असं थोर कीं, तिच्या परिस्थितीला अगदीं योग्य, तिच्या भवितव्यांतील सुखी जीवनाची शाश्वती देणारं अन् निष्कांचन अवस्थेंत आधारभूत ठरणारं ठिकाणं मला आढळलं. धांवपळ करून मुलगी दाखवण्यापर्यंत सर्व जमवून आणलं...

काकासाहेबांचा मुलगा राजा याचं लग्न यंदा व्हायचं होतं. टिपण पाहायचं नाहीं. हुंडा घ्यायचा नाहीं, मुलगी मुलानं पसंत केली कीं झालं. बाकी मानपानाचा कसलाच मुद्दा शिल्लक राहायचा नव्हता. काकासाहेब, घरांतली मंडळी, उपवधू झालेला राजा, यांचे स्वभाव चांगले होते. या ठिकाणीं शकू पडली तर खूपशी श्रीमंती तिच्या हातीं लागणारं नव्हती खरी. पण ती सुखी, समाधानी होऊन शांततेनं संसार करूं शकेल याची खात्री होती. काकासाहेब शकूला

मुलीप्रमाणंच वागवितील. सुसंस्कृत राजा तिला खऱ्या अर्थानं सहकारी म्हणूनच वागवील...शकूच्या आईला स्थळ अर्थात पसंत पडलं अन् मुलगी दाखवायला नेण्यासाठीं तिनं अनुमती दर्शवली.

मुलगी पाहण्याचा सभारंभ, त्याचा सांचा, ठरल्यासारखा. काकासाहेबानी मात्र त्याचं स्वरूप बदलण्याच ठरवल होतं. मुला-मुलीला एकत्र आणायची. ओळख करून द्यायची व मग त्यांनी परस्परांचा परिचय करून घ्यायचा. आशा, अपेक्षा यांबाबत मोकळेपणानं बोलायच. उभयतांच्या मनावर कसलं दडपण राहूं नये म्हणून अशावेळी मोठ्या माणसांनीं शक्य तितकं बाजूला राहायचं, मोकळ्या वातावरणांत निःसकोच मनानं मुला-मुलीनं तास-दोन तास गप्पा माराव्यात, परस्परांच्या स्वभावाचा अंदाज घ्यावा. व निर्णय घ्यावा. त्यांची ही कल्पना मला एकदम पटली. त्यांच्या पद्धतीनं दाखवण्यासाठीं शकूला न्यायला मी आनदानं तयार झालों. पण प्रत्यक्ष निघायची वेळ झाली त्यावेळी अनपेक्षित घटना घडली—

शकू शक्य तितकी नटली होती. नेहमींपेक्षां ती अधिक आकर्षक दिसत होती. पण ती एकटीच आली नव्हती. तिच्याबरोबर एक वयस्क स्त्रीदेखील निघाली. शांताबाई तिच्या आत्या. आजच त्या अचानक भावजयीकडे आल्या. त्या घरच्या श्रीमत. शकूच्या आईला अडीअडचणीला त्या मदत करीत. आल्यानंतर शकूला चांगलं स्थळ मिळत असल्याचं कळतांच त्यांना उत्साह वाटला. लग्न शक्यतर स्वतःच्याच पुढाकारानं जमावं असंहि त्यांच्या मनानं घेतलं असेल. शकूची आई व शांताबाई यांचे ऋणानुबंध इतके निकटचे होते कीं, शकूबरोबर त्या निघाल्यावर जाऊं नका म्हणणं शकूच्या आईला जड जाणं स्वाभाविक होतं. मी तरी काय बोलणार? शिवाय त्या केवळ बरोबर आल्यान तसं बिघणार तरी काय होतं ?

ठरल्या वेळीं आम्ही तिघं काकांच्या घराची पायरी चढलों. आंत काकासाहेब वाटच पाहात होते. मधल्या खोलींत चार-पांच खुर्च्या मांडलेल्या होत्या. बिलोरी आरसा असलेल्या मोठ्या कपाटाजवळ एक वाटोळ्या आकाराची खुर्ची होती. तिच्याकडे बोट दाखवून ते शकूला म्हणाले, "बस तिथ." काहीं प्राथमिक बोलणीं झाल्यावर काकांनी राजाला हांक मारली. शकूच्या चटकन मनांत भरावा असाच तो होता. शकू सुदर होतीच. आतां हें लग्न नक्की जमणार. आपल्या प्रयत्नाला यशाच मधुर फळ लागणार याची कल्पना चटकन् माझ्या मनाला चाटून गेली. शाताबाई शकूच्या जवळच बसल्या. इतक्यांत काका शकूला म्हणाले, "हें पहा, मुलगी पहाण्याचा कार्यक्रम इतरत्र असतो तसा इथं व्हायला नको आहे..." या बद्दलची कल्पना विशद केल्यावर ते पुढें म्हणाले, "आतां तुम्हीं दोघानी कसला सकोच न धरतां, मनावर कसल दडपण न राहूं देतां ओळख करून घ्या. परिचय करून घ्या. स्वभावांचा अंदाज करा अं..." आणि त्यानीं मला बाहेर चलण्यासाठीं खुणावलं. मी चटकन् उठलों. बाहेर आलों. शांताबाईहि उठतील व आंत जातील. फार झालं तर त्या उठून दारात जाऊन कानोसा घेत राहतील. अशी माझी कल्पना पण झाल भलतच ! —

शेजारच्याच खोलीत आम्ही बसलो होतो. काका काहीतरी विचारत होतें. मी काहीतरी उत्तरं देत होतो. मी बाहेर होतो. पण माझं लक्ष आत होत. शकी खूप बोलणारी, धीराची. पण पहिल्यादाच दाखवायला आणलेली. प्रसगी तिचा धीर सुटणार नाही ना ? अशावेळी धैर्य खचत. अंगाला कप सुटतो. घामानं कपाळ डंवरतं. आपण एकट्या आहोत व बाकीचे आपल्याकडे पाहात आहेत या जाणिवेन मुलीच अतःकरण धडधडूं लागतं. एकाकीपणाची जाणीव तिचा धीर दूर उडवते. असहाय्यतेच्या कल्पनेनं तिचा मोकळेपणा मावळतो. खूप बोलक्या मुली अबोल बनतात. मोकळ्या वृत्तीच्या पराकोटीच्या संयमी भासतात. बेछूट मोकळेपणानं वागणाऱ्या कसल्यातरी दडपणानं खचून गेल्यासारख्या वागू लागतात.

मुलीच्यातला हा बदल मी नेहमीं पाहात होतों. शकूचं असंच काहीं होणार नाहीं ना म्हणून साशंकहि झालों होतों. पण शांताबाई जवळ असल्याची आठवण होऊन मला धीर आला. त्या शकूला धीर देतील, सांवरतील...

शांताबाई बरोबर आणल्या हें एका परीनं बरं झालं. नाहीतर शकू एकाकी पडली असती. कदाचित ती गोंधळली असती. अडखळली असती...

"तुमच नाव काय बरं—" आंतून राजानं विचारल्याचं कानांवर आलं. सुरुवातीचं शांताबाईचं बोलणं थांबलं होतं. प्रत्यक्ष कार्यक्रमाला आता सुरुवात झाली होती. कान टवकारून मी ऐकू लागलो. शकू ठसक्यात सांगणार की, माझं नांव शकुंतला...

"तिचं नांव आहे शकुतला" शांताबाईचा आवाज. "पाळण्यातलं नाव होतं ठकी. तिच्या आजीचं ते नाव फार आवडतं. म्हणून ठेवलं होतं. पण आजच्या काळात ठकी नाव कानाला बरं नाही वाटत. उगीच हंसायची सारीं म्हणून मींच वहिनीला हिचं नांव बदलायला सागितलं. म्हटलं, शकुतला म्हणत जा तिला. तेव्हांपासून तिला शकुंतला म्हणतो आम्ही. अलिकडे मात्र तिला लाडानं शकी म्हणूं लागलीं आहेत सगळी. नावाची ही मोडतोड मला मुळीच आवडत नाही पण करायचं काय ?—"

शांताबाईचं बोलणं तसंच किती वेळ चालू राहिलं असतं कोण जाणें. तोंच राजानं दुसरा प्रश्न विचारल्याच ऐकू आलं.

"तुम्हांला खेळांची आवड आहे कां ?"

आतां शकी काय म्हणणार याची खूणगाठ मनाशीं बाधून मी उत्सुकतेनं काकाच्या बोलण्यात वरवर सहभागी होत–ऐकूं लागलों.

"खेळाची आवड ना ? त्याचं कांहीं बोलूच नका–" शाताबाईच बोलू लागल्या ! "लहानपणी सागरगोटे इतके काहीं खेळायची की सांगता सोय नाहीं. तिच्या वडिलांना इतकं कांही खेळणं मुळींच आवडत नसे. ते म्हणत, कार्टे, अभ्यास कर अभ्यास कर ! पण शकीला त्याचं काहीं नसे. खेळांत इतकी गढून जायची कीं, कुणी येऊन फरपटत न्यायला लागलं तरी बिचारीला समजायचं नाहीं. आतांसुद्धां खूप खेळते ती. कसला ग तो खेळ ?–हं आठवलं. केरम- बरं कां ! शकी केरम खेळण्यांत पटाईत आहे. तिच्या घरीं बोर्ड नाहीं पण जिथं असेल तिथं जाऊन ती खेळते. बक्षीसंदेखील मिळवलीं आहेत तिन."

आणि हाच क्रम चालू राहिला. राजाभाऊंनीं प्रश्न विचारावें. शाताबाईंनीं लागलीच उत्तर द्यावं ! ते शकीला प्रश्न विचारीत आहेत. तिच्याकडून त्यांना उत्तरं हवीं आहेत मिळालेल्या उत्तरांतून शकीच्या स्वभावाचा, आवडी निवडीचा ते अदाज बांधतील व पसंती करतील. शांताबाईंच्या हें लक्षातच येत नव्हतं ! प्रश्नाला उत्तर

चांगलं द्यायला हवं तें फक्त आपणच देऊं शकतो. या अभिनिवेशानं त्या भराभर उत्तरांचीं भेंडोळी राजाभाऊपुढें टाकीत होत्या. जादूगारानं तोंडांतून भरभर कागदाची वेटोळीं बाहेर काढून प्रेक्षकाला आश्चर्यांत बुडवावं तसंच शांताबाईंनी आरंभल होतं, राजा भाऊलाहि तें जाणवलं असाव. त्यानच एकदां म्हटलं.

"इतका वेळ उत्तरं तुम्ही दिलीत. निदान आतां तरी यांना बोलू द्या.–"

आणि त्यान कांही प्रश्न विचारला.

पहिला प्रश्न विचारला तेव्हाच राजाचा आवाज अन् आताचा आवाज यातला फरक मला जाणवला. पहिलं माधुर्य आतां लोपलेल भासलं. उलट त्रासिकपणाची गर्द छटा आढळली. मीदेखील या फरकानं अस्वस्थ झालों. मनांत आलं उठावं अन् शांताबाईंना बाहेर बोलवावं पण काकासाहेबांनीं बाहेर बसवून ठेवण्याचा निर्धार केल्यासारखा भासला. त्याच्या दृष्टीनं राजा व शकू यांना एकाकी ठेवणं इष्ट. मी आंत गेल्यानं उगीच दडपण पडेल. मोकळेपणाला आळा पडेल. कांहींतरी प्रश्न विचारून ते मला गुतवून ठेवीत होते. राजा–शकूला जितका वेळ मिळेल तेवढा काकांना हवा होता... विचाऱ्यांना माझ्या अस्वस्थतेची कल्पनाच नव्हती !

राजाच्या त्रासिक आवाजान सावध होऊन तरी शांताबाई सावध होतील व उत्तर द्यायचा उत्साह आवरतील अस वाटलं होतं. पण व्यर्थ ! त्यांनीच मोठ्या आवाजात लांबलचक माहिती सांगायला सुरुवात केली! ... मी अगदी सुन्न झालों. काहीतरी करून काकांना उठवावं. ते दूर गेले तर आत जायची निदान दारातून डोकावायची संधि मिळेल. मग आपण शाताबाईंना खुणेनच इकडे बोलवूं

"काकासाहेब ! जरा थंडगार पाणी आणा बुवा !" मनांतला गोंधळ किंचित्हि व्यक्त न करता म्हटलं.

"नुसतं पाणी काय पिता नानाजी..." असं बोलून त्यानी आमच्यासाठीं काय काय तयारी केली आहे, स्टेशनवरून मुद्दाम तयार झालेली फळ कशीं आणली आहेत. दळून घेतलेली कॉफीची पूड कशी मुंबईहून मागवली आहे. इ. माहिती द्यायला सुरुवात केली. त्यानी उठावं व आंत जावं हा हेतु, पण काकांनीं तसं काहींच केलं नाही. उलट बसल्या बसल्या गड्याला हाक मारून पाणी आणवलं आणि तहान बिलकूल लागलेली नसतांना तें पिणं मला भाग पडल !

इतक्यात शांताबाईंचे शब्द कानीं पडले. "आणखी कांहीं विचारायचं नाहीं ना ? विचारा वाटलं तर काहीं राहुला नको. लग्नाआधी सगळी माहिती मिळालेली बरी"

"मिळाली माहिती तेवढी खूप झाली!" राजाचं हें उत्तर. उत्तरांतली निराशा, चीड, व काहीसा तिरस्कार मला स्पष्ट जाणवला. निदान आतां तरी मधें पडावं याचा विचार करणार तोच राजाच बाहेर आला.

राजाचं मूळचं गौरवर्ण मुख कमालीचं आरक्त झाल होतं. किंचित पिंगट वाटणाऱ्या नेत्रांतून रागाच्या ठिणग्या फेकल्या जात असल्याचा भास होत होता. त्याच्या गोंडस डौलदार व रुबाबदार व्यक्तित्वांतून झाल्या प्रकाराबद्दलचा अतीव तिरस्कार सळसळून उफाळत होता.

"*कायरे राजा ! आटोपलं इतक्यांत ?* अरे, जन्माच्या गाठी आहेत या. अशा वेळीं मुळीच घाई उपयोगी नाहीं. शातपणानं धीरान व्हायला हव सगळं–" काका म्हणाले

*राजा त्यावर काहीच बोलला नाही. नतर* फलाहार, पेयपान, निरोप इत्यादी सगळे प्रकार झाले पण राजा तेथें थांबलाच नाही. त्यानं कुठेंतरी जायच असल्याचं सांगून पाय काढला.

पांच–सात दिवसांनी निकाल कळवण्याच काकांनीं आश्वासन दिल्यावर आम्ही निघालों. वाटेंत शांताबाई राजाभाऊबद्दलच सारख्या बोलत होत्या. त्याच सौंदर्य, बाणेसूदपणा, गौरवर्ण याबद्दल घोळून घोळून त्या बोलत होत्या. अशा सुंदर मुलाच्या पदरी शकू पडावी अस तळमळीनं त्याना वाटत होत. राजाला हवी ती सर्व माहिता विस्तारान दिल्याच्या समाधानात त्या धुद झाल्या. अखेर शकूचं लग्न आपल्याच कौशल्यान जमलं याचा समाधानाच्या कल्पनेनं त्या मोहरून गेल्या होत्या.

काकांच्याकडून काय उत्तर येईल या विवचनेत मी तो दिवस घालवला. दुसरा गेला. तिसरा गेला. नंतर शकू जी दडी मारून घरांत बसली ती एकदाहि दिसली नाहीं. तिची आईहि *मला भेटली नाही.*

निराशेनं भारावलेल्या या वातावरणात मला एकच आशेची जागा दिसत होती ती म्हणजे शकू...तिच सौंदर्य...

राजाभाऊच्या शरीरसौष्ठवाला आकर्षित करणारं तिचं सौन्दर्य अखेरीस विजयी होईल याचा मला विश्वास वाटला. शांताबाई वावटळीप्रमाणं आल्या व गेल्या. वावटळी वाऱ्यानं वेल थरारतें, मोडत नाहीं. त्यांच्या अप्रस्तुत बोलण्यानं कांही परिणाम केला तरी शकूचं आकर्षक स्वरूप अखेर राजाला मोहित करीलच करील. शिवाय शकू मूळची इतकी बोलणारी. समजा राजाचा काही गैरसमज झाला. शकूला फार बोलायला हवं असा *त्यान ग्रह करून घेतला तर तो काढता येईल.* त्याच लग्न जमेल. होईल व आपल्या मोकळ्या खेळकर. बोलक्या स्वभावानं शकू राजाला सुखी करील !

*अखेरीस सातवा दिवस उजाडला. काकांचा* करारीपणा व शिस्त माहीत असल्यानं मी त्यांच्याच उत्तराची वाट पाहात राहिलों.


आणि अपेक्षेप्रमाणं पोस्टमननं एक कार्ड *टाकल. उत्सुकतेनं मी तें हातांत घेतलं अन्–*

"चि. शकुतला सुदर आहे. यात शका नाहीं. परंतु तिला बोलता येत नसावंस वाटल्यानं आम्हांस स्वीकारता येत नाही–"

दोनच ओळी ! थोडेच शब्द ! पण माझ्या डोळ्यासमोरून पुन्हा शाताबाई दिसूं लागल्या. त्याची बडबड कानावर येऊ लागली. मुलीला दाखवायला नेतांना बरोबर गेल्यास संयम किती पाळावा याचा त्याच्या कल्पना निकाळचा फोडूं लागल्या. अन् मीं दोन्ही हात कानावर ठेवून, डोळे गच्च मिटून घेतले !

म्हणून म्हणतों, तुमची मुलगी मोठी होईल उपवर होईल. तिला दाखवायला न्याल. त्यावेळी तुम्ही बरोबर असाल तर कसें वागाल ? किती बोलाल ? प्रश्न सावा. उत्तर सहज सुचण्यासारखं. पण मनाचा निर्णय कायम करण्यापूर्वीं माझा अनुभव ध्यानात घ्या नि मग काय तें ठरवा ! तसं केलंत तर फार मोठा धडा शिकल्यासारखं होईल.

●●●



# मोह

सौ. कमलिनी अभ्यंकर

संध्याकाळचे सात वाजून पंचेचाळीस मिनिटें झालीं होतीं. मद्रासमेल सोलापूर स्टेशनवरून सुटायला फक्त पांच मिनिटें अवकाश होता. रघुनाथ घाईघाईनें आला आणि सेकंड क्लासच्या डब्यांत चढला. पाठोपाठ येणाऱ्या तरुणीचं सामान त्यानं घेतलं आणि मग तीहि त्याच डब्यांत चढली.

गाडी चालूं झाली. त्या सेकंडच्या छोटयाशा डब्यांत तीं दोघंच होतीं. रघुनाथच्या समोरच्या बांकावर ती तरुणी बसली. आपला होल्ड् ऑल् पसरीत रघुनाथ तिला म्हणाला, "हें पहा, कुणी विचारणार नाहींच पण विचारलंच तर तुमचं नांव सौभाग्यवती सुनीति कर्वे आणि वय अठ्ठावीस असं सांगायचं"

त्यावर ती चारुगात्री हंसत म्हणाली, "होय तें मी विसरायची नाहीं, पण माझं वय अठ्ठावीस सांगून खरं वाटेल कां ?"

रघुनाथ तिच्या बालिश तुकतुकीत चेहऱ्यावरचा मिष्किलपणा पहातच राहिला ! सतरा–अठरा वर्षांच्या सडसडीत बांध्याला, त्या कोवळ्या पोरीला, अठ्ठावीस वर्षांची म्हणून सांगणं धाडसाचं होतं. "वयाची एवढी चिकित्सा करण्याच्या भानगडींत कुणी पडणार नाहीं–" रघुनाथ म्हणाला,

गाडी भरवेगांत धांवत होती.

रघुनाथ 'ट्रु स्टोरीचा' एक जुना अंक वाचूं लागला. 'ब्लॅक्मेल' नांवाच्या एका सत्यकथेनं त्याचं हृदय अगदीं पिळवटून टाकलं... एक संसारी, सरळमार्गी आणि पापभीरू कारकून एका नीच जोडप्याच्या जाळ्यांत सांपडतो...आपल्या अप्रतिम सुंदर बायकोकडून तो त्या कारकुनाला मोहांत पाडतो ..एकांतांत शृंगारिक चाळे करणाऱ्या त्या दोघांचे तो चोरून फोटो घेतो...नंतर ते फोटो पाहून त्या कारकुनाला वेड लागायची पाळी येते... चार पोरें असलेल्या त्याच्या साध्या–भोळ्या पत्नीला ते फोटो दाखवण्याची धमकी देतात व त्यांच्याकडून पैसे उकळतात... आधींच हलाखीच्या परिस्थितीनं गांजलेल्या त्या कारकुनाचे मानसिक व आर्थिक हाल पाहून डोळ्यांत पाणी उभं राहतं......बायकोनें मुलाच्या औषधासाठीं दिलेले पैसेसुद्धां त्याला त्या माणसाला द्यावे लागतात व पैसे चोरीला गेले असं खोटंच बायकोला सांगून तो आजारी मुलाला जवळ घेऊन रडतो. पंधरा वर्षें सुखांत सुरळीत संसार केल्यावर मोहाच्या एका ठिणगीनं भडका उडणार या जाणिवेनं तो कासावीस होतो आणि मग...

रघुनाथनं वाचन थांबवून त्या तरुणीकडे पाहिलं. तो कपाळाला बाम लावीत होती.

रघुनाथनं विचारलं, "डोकं दुखतंय् कां ?"

ती म्हणाली, "होय, परवां आई फारच आजारी असल्याचं भावाचं पत्र आल्यापासून मला स्वस्थ झोंप नाहीं. लग्न झाल्यापासून माहेरी गेलें नाहीं. आत्तांसुद्धां ते पाठविणार नव्हतेंच, पण मी अगदीं जेवणसुद्धां सोडलं तेव्हां म्हणाले 'माझ्याजवळ पैसे नाहींत, तुझ्याजवळ असले तर जा !' माझ्याजवळ तरी एवढे पैसे कोठून असणार ?"

त्यावर काय बोलावं हेंच रघुनाथला सुचेना. तीच पुन्हा म्हणाली, "पण सुनीतिबाईनीं आपलं जाणं रहित करून मला तुमच्या पासावर पाठविलं. तुमच्या दोघांचे उपकार मी कध्धीं विसरणार नाहीं. तुमच्यामुळेंच मला आईला भेटायला मिळतंय्."

"त्यांत उपकार कसले !" रघुनाथ म्हणाला, 'आमचा पासच आहे, ती उगीचच येणार होती. त्याऐवजीं तुम्हांला आणलं, आम्ही कांहीं पैसे खर्चून तुम्हांला नेत नाहीं"

"पण स्वतःची बायको म्हणून मला नेणं धोक्याचच नाहीं कां ?"

"चालायचंच ! थोडा धोका स्वीकारलाच पाहिजे, तुम्ही आतां झोंपा" रघुनाथनं दिवे बंद केले आणि एकच बारीक दिवा लावला. गाडी हलके हलके कुर्डुवाडी स्टेशनांत शिरत होती.

गाडी थांबताच रघुनाथ खालीं उतरला. आणि सिगारेट ओढीत प्लॅटफॉर्मवर हिंडूं लागला. तेवढ्यांत त्याला आपल्या सेकंडच्या डब्यासमोर कुणीतरी तरुण सूटकेस घेऊन उभा राहिलेला दिसला. रघुनाथनं निरखून पाहिलं आणि मग तो स्वतःशींच म्हणाला 'होय शंकाच नको, कृष्णमूर्ति कुलकर्णीच आहे तो !'

कृष्णमूर्ति कुलकर्णीनं त्या सेकंडच्या डब्यांत पाहिलं. एकटी स्त्रीच त्या डब्यांत झोंपल्याचं पाहून तो शेजारच्या सेकंड क्लासच्या डब्यांत शिरला.

कृष्णमूर्तीनं आपल्याला पाहिलं नाहीं म्हणून रघुनाथनं सुस्कारा सोडला.

कृष्णमूर्ति कुलकर्णी हा एक विलक्षण बडबड्या माणूस होता. त्याचं बोलणं एक तासभर ऐकलं कीं श्रोत्याचं डोकं हमखास दुखे, हें त्याच्या वक्तृत्वाचं वैशिष्ट्य् होतं. त्याला गप्पा मारायला कुणीहि चाले. कोणत्याहि विषयावर तो अस्खलितपणें बोले, त्याबद्दलची सारीं खरीं खोटीं विधानें तो दडपून देई. अनेक प्रकारच्या आख्यायिका, थोरामोठ्यांचीं लफडीं, सिनेमा, नवकाव्य, चित्रकला, अध्यात्मवाद, वगैरे विविध विषयांवर तो तासन्तास बोले. त्यांत भर म्हणून तो पान तंबाखूचा तोबरा भरे आणि स्वतःच्याच एकाद्या रटाळ विनोदावर तो इतका खदखदून हंसे कीं, त्याच्या तोंडांतून उडणारे लाल तुषार चुकविता चुकवितां श्रोता बेजार होई !

अशा या व्यक्तीला चुकविल्याबद्दल रघुनाथला समाधान वाटलं.

गाडी काळोखांतून पुन्हा पिसाटासारखी धांवूं लागली. बोंचरा वारा अंगाला झोंब

लागला. रघुनाथनं खिडक्या बंद केल्या व तो स्वस्थ पडून राहिला. पण बराच वेळ झाला तरी त्याला झोंप येईना. अर्धा पाऊण तास तो उगीचच तळमळत होता. झोंप येणार नाहीं याची खात्री पटल्यावर तो उठून बसला व सिगारेट ओढूं लागला...

सिगारेटचे दीर्घ झुरके घेतल्यावरोबर त्याची थंडी कमी झाली. घशापासून छातीपर्यंत गरम प्रवाह वाहूं लागला. शरीराला एक प्रकारची मस्त सुस्ती येऊं लागली आणि डोळ्यांवर मंद धुंदी आली.

त्या विलक्षण सुखासीन अवस्थेंत रघुनाथनं त्या तरुणीकडे पाहिलं.

मंद श्वासोच्छ्वासावरोबर तिची छाती वर-खालीं होत होती. तिच्या गोल गुलाबी चेहऱ्याभोंवतीं काळ्याभोर केंसांची महिरप झाली होती. त्यांतून कानांतले लाल लाल खडे चमकत होते. आपला उजवा हात तिनं कपाळावर आडवा ठेवला होता. तो गोरापान हात, निमुळतीं बोटें, लालसर तळवा आणि हिरव्या बांगड्या...

रघुनाथ जास्तच जोरांत सिगारेटचे झुरके घेऊं लागला. तिच्याकडे जास्तच रोखून पाहूं लागला. तिच्याकडे बघतां बघतां त्याला वाटलं, मौल्यवान माणिक माकडाला लाभावं तशी ती तेजस्वी तरुणी एका नालायक आणि व्यसनी माणसाला लाभली होती. पत्ते-जुगार-सिगारेट यांपलिकडे तिच्या नवऱ्याला कांहींच माहीत नव्हतें. रघुनाथला वाटलं, हिला आपल्यासारखा नवरा हवा होता! तो वेडावांकडा विचार त्याच्या मनांत सारखा सलूं लागला. तो निराळ्या दृष्टीनें तिच्याकडे पाहूं लागला. त्याचे विचार स्वैर सुटले...समोरच झोंपलेली ती लावण्यवती, तिचं गोरपान शरीर, भरदार अवयव, आणि झोंपेंत अस्ताव्यस्त झालेला पदर पहाता रघुनाथ गोंधळला, मोठ्या प्रयासानं कोंडून ठेवलेली विषारी वाफ वेगानं बाहेर पडली.

बघता बघतां त्यानं सिगारेट फेकून दिली. तो उठला आणि तिच्या उशाशी बसला. हलकेंच त्यानें आपला थरथरणारा हात तिच्या हातावर ठेवला. त्या उबदार गुबगुबीत स्पर्शानं तो सुखावला. त्याच्या त्या स्पर्शानं तिची मुळींचं झोंपमोड झाली नाहीं. रघुनाथनं हात आणखी जरा दाबला. त्याबरोबर तिनं एकदम डोळे उघडले आणि आपला हात तिनं काढून घेतला. रघुनाथनं तिच्या कपाळावर आपला हात ठेवला आणि विचारलं "डोकं दुखायचं थांबलं कां?" आपला आवाज कांपरा व घोगरा कां यावा याचं त्याला आश्चर्य आटलं! घसा खांकरून त्यानं पुन्हा तोच प्रश्न विचारलं. "आतां ठीक आहे" असं म्हणत ती चटकन् उठून बसली. त्याच्या डोळ्यांत तिला कांहीं निराळीच चमक दिसली. ती एकदम उभी राहिली आणि तिनं पदर सारखा केला. डब्यांतले सगळे दिवे लावून तिनं खिडकी उघडली. उभी राहूनच ती दाराच्या खिडकींतून बाहेर पाहूं लागली.

रघनाथ एकदम शरमला. आपल्या बांकावर येऊन बसला. आणि त्यानं तिलाहि बसायला सांगितलं. पण ती बसेना.

रघुनाथनं पुन्हा सिगरेट पेटवली.

त्यानं घड्याळांत पाहिलं. फक्त साडेदहा वाजले होते......आतां सकाळीं साडेपांच वाजेपर्यंत ही उभीच रहाणार कां? या विचारानं तो कासावीस झाला.

"तुम्ही रागावलांत कां?" त्यानं थोड्या वेळानं विचारलं.

पण ती कांहींच बोलली नाहीं.—

फक्त एकदां तिनं त्याच्याकडे वळून पाहिलं आणि ती पुन्हा बाहेर पाहूं लागली. तिच्या त्या नजरेंत रघुनाथला भय, तिरस्कार व असहाय्यता यांचं भयंकर मिश्रण दिसलं,

"माझा कांहीं त्यांत वाईट हेतु नव्हता, तुम्हांला ताप आलाय कीं काय हें मला पहायचं होतं."

"मी रागावलें नाहीं" एवढं म्हणून ती पुन्हा बाहेर पाहूं लागली.

"मग तुम्ही आतां झोंपा, किती वेळ उभ्या रहाणार? पुन्हा डोकं दुखेल!"

पण ती तशीच उभी राहिली, काय करावं हेंच रघुनाथला समजेना. आपल्याला असा मोह व्हावा याचा त्याला भयंकर पश्चाताप होत होता...सुनीतीनं किती विश्वासानं तिला आपल्याबरोबर पाठविलं...आपलं मुंबईला जाणं रहित करून आजारी आईला भेटायला जायला सुनीतीनं तिला संधि दिली...तिचा लहानसा त्यागसुद्धां त्या तरुणीला जन्मभर सुखावणारा ठरेल...सुनीति माणुसकीला जागली आणि आपण मात्र......या विचारांनीं त्याचं हृदय विदीर्ण झालं...

गाडी दौंड स्टेशनांत उभी राहिली. रघुनाथ स्वतःचा होल्ड ऑल् गुंडाळूं लागला.

ती म्हणाली. "हें काय?"

रघुनाथ म्हणाला "मी पलिकडच्या डब्यांत बसतो, तुम्हीं आंतून दाराला बोल्ट लावून झोंपा. मी दादरला येईन."

"नको, तुम्ही जाऊं नका, मला भीति वाटते एकटीला!"

"मग तुम्ही दादरपर्यंत अशा उभ्याच राहणार कां? मला तें बघवत नाहीं!"

"मी आतां झोंपतें" असं म्हणत ती पुन्हा झोपली. सर्वांग चादरीनें लपेटून सशासारखी थरथरत ती स्वस्थ पडून राहिली.

रघुनाथ खालीं उतरला, पलिकडच्या डब्यांत जाऊन त्यानं कृष्णमूर्ति कुलकर्णीला हांक मारली. त्याचं सामान घेऊन त्यानं त्याला आपल्या डब्यांत आणलं.

डब्यांत आणखी कुणीतरी आल्याचं ऐकून तिनं चादरीबाहेर तोंड काढून पाहिलं.

कृष्णमूर्ति तिच्याकडे पहात म्हणाला, "नमस्कार वहिनी, माझ नांव कृष्णमूर्ति कुलकर्णी"


"अरे, ही तुझी वहिनी नाहीं, या आमच्या शेजारी रहातात. त्यांना मुंबईला पोंचवायचं आहे."

"ओऽ सॉरी हं!" असं म्हणत कृष्णमूर्तीनें चंची सोडली.

तिनं उठून खिडक्या बंद केल्या आणि ती पुन्हां शांतपणें झोंपली.

...आणि पानतंबाखूचा तोबरा, भरून सांगितलेल्या कृष्णमूर्तीच्या खऱ्याखोट्या अख्यायिका, त्याचे रटाळ विनोद, त्यांचं गदगदून हंसणं, आणि त्याच्या तोंडांतून उडणारे लाल तुषार......हें सारं सहन करीत रघुनाथ बसून राहिला—

• • •



# कविता

## बंगला

छोटासा मी बांधिन बंगला
नदीकिनारीं, गांव शिवेवर
बाग भोंवतीं कमान द्वारा
वरती फुललेला गुल्मोहर

मागिल दारीं तुळसमंजिरी
प्राजक्ताची तशीच पखरण
रातराणिच्या मधुर सुवासें
रात्रीं दरवळणारें अंगण

पुढती असतील सुवर्णचंपक
जय-विजयापरि प्रवेशद्वारीं
निशिगंधाची पंगत कोठें
गुलाब कोठें कुठें मोगरी

फिकट पोपटी असेल रंग
आतिल बाजूस शीतल स्वप्निल
खिडक्यांवरील तसेच पडदे
तलम जाळीचे निळसर शामल

भिंतीवरती निसर्ग-चित्रें
मोजकींच पण अतीव सुंदर
ज्ञानेशाची प्रसन्न प्रतिमा
दिवाणखान्यांतिल मेजावर

वस्तू वस्तू असेल येथिल
मम पत्नीचें कलाप्रदर्शन
कौतुकांतुनी घुमतिल माझ्या
कलावतीचे कानीं कंकण

माझी म्हणुनी असेल खोली
नदी प्रवाहा कडील बाजुस
नदीकांठचा मंथरवारा
पुरविल तेथें सुमन सुवास

पुस्तक संग्रह असेल माझा
छोटासा पण अभिनव सुंदर
फुलदाणी अन् तीन माकडे
सदैव असतिल अन् मेजावर

उभी कोपऱ्यामधें सतार
हितगुज करण्या सदैव आतुर
एकांतीं कधिं छेडिन तिजला
कधिं पत्नीच्या इच्छेखातर

कधि काळीं बांधलाच तर
असेल माझा असा बंगला
खिडकीमधुनी मजला उठवित
किरण रवीचा येईल पहिला

नांव तयाचे काय असावें
अजुनीं मजला सुचलें नाहीं
नांवाच्या चौकटींत फोटो
अजुन तयाचा बसला नाहीं

—श्री

* * * * * * * * * * * * * * * * * * * * * * * *

## रूपवंती

भांग तांबडी रेखली
शामलीच्या रम्य माथीं
पानांचा चुडा हिरवा
रंग बावरीच्या हातीं

अंधार काजळ नयनीं
चंद्रम्याचा टिळा भालीं
गुलाबाच्या पाकळ्यांची
मोहरली लाली गालीं

आम्रमंजिरी पिवळी
शोभते सांवळ्या शिरीं
चाल पायीं चांदण्यांचे
नखरत चाले गौरी

मनीं फुललें चांदणें
शहारली लाजवंती
मोरपिशी डोळे भैर
मिटविते रुपवंती.

—नरेन्द्र पराडकर



## वेध

सुटलेल्या वादळांत
रक्त चोंच गाणारी
रात्रीच्या पोकळींत
एक हांक विझणारी

कोसळून अंतरांत
तोल जरा ढळलेला
शब्दहीन पावलांत
नाद तुझा चुकलेला

जळणारी राख अता
छंद तिला लपण्याचा
थकलेल्या सावलीस
वेध पुन्हा डोळ्यांचा

—सुधाकर देशमुख



लेखक
प्रा.
पंढरीनाथ
विष्णुपंत
रानडे

# — कौ ण्ड ण्य पू र —

## ( विदर्भातील एक उत्खनन )

अमरावती जिल्ह्यांत वर्धा नदीच्या कांठीं वसलेल्या कौंडण्यपुर या गांवीं महाराष्ट्र शासनाच्या उत्खनन विभागातर्फें जें उत्खनन नुकतेंच झालें त्यानें प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासावर नवा प्रकाश टाकणारा बराच पुराव उपलब्ध झाला आहे.

विशेषत: विदर्भातील कौंडण्यपुर या नगराच्या प्राचीनत्वावर या उत्खननानें आगळा प्रकाश पडला आहे.

उत्तर हिंदुस्थानांत मौर्यांच्या राजवटींत ज्याप्रमाणें भारतीय जीवनाच्य अंगोपांगांत उमेदीचें आणि विभवाचें भरतें आलें होतें तद्वतच दक्षिण भारतात आणि विशेषत: महाराष्ट्रांतील सातवाहन राजकुळाच्या आमदानींत दक्षिण हिंदुस्थानांतील नागरी जीवन संपन्नता आणि समृद्धि यांनीं गजबजून गेलें होतें.

सातवाहनकालीन महाराष्ट्राच्या विभवाचें दर्शन आतांपावेतों प्राचीन शिलालेख, नाणीं, हाल सातवाहनानें संपादन केलेली गाथासप्तशती, लीलावती हा प्राकृत ग्रंथ आणि पेरिप्लस ऑफ् अरेबियन सी हा प्रवास वृत्तांत यांतून आपणांस घडत असे.

प्राचीन काळासंबंधीं सर्वांत प्रभावी दर्शन घडविणारें जें उत्खननकार्य तें महाराष्ट्रांत म्हणावें तसें झालेलें नाहीं.

सातवाहनांच्या इतिहासाशीं निगडित असलेलीं अनेक स्थळें महाराष्ट्रांत आहेत पण त्या ठिकाणांकडे अजून लक्ष गेलेलें नाहीं.

आजवर झालेली उपेक्षा लक्षांत घेतां नुकतेंच अमरावती जिल्ह्यांत महाराष्ट्र सरकारनें कौंडण्यपुर येथें जें चांचणी स्वरूपाचें उत्खनन केलें तें खचित अभिनंदनीय होय.

हें उत्खनन नागपूर विद्यापीठाच्या प्राचीन भारतीय - इतिहास आणि संस्कृति या विभागांतील प्राध्यापक डॉ. मोरेश्वर ग. दीक्षित ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं झालें.

डॉ. दीक्षित याच्या प्रेरणेनेच महाराष्ट्र शासनानें विदर्भांतील कौंडण्यपुर हें गांव उत्खननासाठी निवडलें.

विदर्भांतील पौराणिक काळांतील अनेक दंतकथा कौंडण्यपूर या गांवांशी निगडित आहेत. नल आणि दमयंति, अगस्ति आणि लोपामुद्रा, विदर्भनृप भीष्मक व त्याची कन्या आणि श्रीकृष्णाची प्रिय पत्नी रुक्मिणी अशा एक नव्हे अनेक पौराणिक कथांचें साहचर्य विदर्भांतील ज्या नगरीशी निगडित होतें तें कुंडिनपुर म्हणजेच सध्यां अमरावती जिल्ह्यांत वर्धा नदीचें काठीं उभें असलेले कौंडण्यपुर होय असें मत विदर्भांतील अनेक विद्वानांनीं माडलें होतें

## श्री. आ. रा. दशपाडे याच मत

श्री. डॉ. यशवंत खुशाल देशपांडे ह्यांच्या संपादकत्वाखालीं निघणाऱ्या "शारदाश्रम" वार्षिकांत सुमारे तीस वर्षांपूर्वी श्री. आ. रा. देशपाडे उर्फ कवि अनिल ह्यांनी एक लेख लिहून या विषयाला बोलकें केलें होतें.

पौराणिक वाङमयांत आणि महाभारतांत विदर्भदेशची राजधानी कुंडिनपुर याविषयीं जे भौगोलिक उल्लेख आले आहेत ते सध्यांच्या कौंडण्यपुरला बव्हृतांशी लागू होतात असे मत श्री. आ. रा. देशपांडे ह्यांनी माडलें होतें.

कौंडण्यपुर येथें उत्खनन झाल्यास या मतास बळकटी आणणारा पुरावा मिळेल असेहि श्री. देशपांडे ह्यांनीं सुचविलें होतें.

कौंडण्यपुर येथें नुकत्याच झालेल्या उत्खननामुळें श्री. आ. रा. देशपांडे ह्याच्या प्रतिपादनाचा काही भाग खरा ठरला आहे. कौंडण्यपुरचें प्राचीनत्व या उत्खननांतून निश्चितपणें सिद्ध झालें आहे.

आधुनिक कौंडण्यपुरच्या वास्तूखालीं या नगराच्या प्राचीन वैभवाचे अवशेष दडून पडले आहेत या श्री. आ. रा. देशपाडे ह्यांच्या प्रतिपादनाच्या मुख्य आशयाला वरील उत्खननामुळें उजाळा मिळाला आहे. परंतु पुराणांतील रुक्मिणीच्या माहेरघराची वास्तूच कौडण्यपुर गांवांतील ढिगाऱ्यांच्या आणि टेकड्यांच्या खालीं दडली आहे. याचा निश्चित पुरावा या उत्खननातून पुढें आलों असें म्हणता येत नाही.

थोडक्यांत म्हणजे पुराणांतील रुक्मिणीचें ऐतिहासिकत्व या उत्खननांतून सिद्ध झालेलें नाहीं, अर्थात झालेलें उत्खनन हें चांचणीच्या स्वरूपाचें होतें. मुख्य उत्खननाचें कार्य डॉ. दीक्षित याच्या मार्गदर्शनाखालीं येत्या नोव्हेंबर महिन्यात होणार आहे. होऊ घातलेल्या उत्खननातून कौडण्यपुरच्या प्राचीन इतिहासावर अधिक विस्तृत प्रकाश पडणार आहे.

श्री. आ. रा. देशपांडे ह्यांच्या मतातील तथ्यांश तेव्हाच अधिक कसोटीला लागणार आहे.

आधुनिक कौंडण्यपूर रुक्मिणीचें माहेरघर ठरो अथवा न ठरो एवढें बाकी खरें कीं, डॉ. दीक्षित ह्यांनीं केलेल्या उत्खननांत जे विभिन्न थर सांपडले त्यातून महाराष्ट्राच्या गेल्या पाच हजार वर्षांच्या इतिहासाचें सातत्य बोलकें झालें आहें.

कौंडण्यपूर नगराच्या प्राचीन इतिहासाची पुन्हा नव्यानें जुळवाजुळव करतां येईल इनपत सामुग्री या उत्खननांत खचितच मिळालेली नाही. मोठ्या प्रमाणांत होऊ घातलेल्या उत्खननांत ती उपलब्ध होऊ शकेल अशी उमेद मात्र निश्चितच निर्माण झाली आहे.

## अश्मयुगीन लोकजीवनाचें दर्शन

या उत्खननांतील सर्वांत खालचा थर हा भारतीय इतिहासातील अश्मयुगीन लोकजीवनाचें दर्शन घडविणारा आहे.

कौडण्यपुरच्या परिसरांत सर्वांत प्राचीन वसाहत ही अश्मपेटिकेंत दफन करणाऱ्या लोकसमुदायाची होती ( Megalithic Folk ) या उत्खननात सांपडलेल्या वस्तूवरून निर्विवादपणें सिद्ध होते.

हे अश्मयुगांतील लोक मातीचीं काळी आणि लाल भांडीं वापरीत. या मातीच्या भांडयांना ते उपडीं करून भाजून काढीत असत.

काळया-लाल रंगांच्या मातीच्या थाळया आणि कटोऱ्या यांचा वापर दक्षिण हिन्दुस्थानांतील अश्मयुगीन लोकसमुदाय करीत असत. दक्षिण भारतीय अश्मयुगीन लोकजीवनाच्या प्रसाराचे कौंडण्यपुर हें उत्तरेकडील शेवटचें टोंक आहे.

या मातीच्या भांड्यांव्यतिरिक्त हे अश्मयुगीन लोक एका विशिष्ट मण्यांचा उपयोग विशेष बाहुल्याने करीत असत असें दिसते. या मण्यांवर काही विशेष रसायनें टाकून पाढऱ्या रेषांचीं वलयें कोरलेलीं असत.

दक्षिण भारतातील अश्मयुगीन लोकसमूह ह्या मण्याची निर्मिति विशेष कौशल्यानें आणि बाहुल्यानें करीत असत.

भारतांतील अश्मयुगाची कालमर्यादा अजून निश्चित झालेली नाहीं. परंतु एवढें मात्र निर्विवादपणें म्हणता येईल कीं, हे अश्मयुगीन लोक मौर्य काळापूर्वी या भागात वस्ती करून राहत असत.

## मौर्य-सातवाहन युगाचें दर्शन

कौंडण्यपुर येथील उत्खननात सांपडलेला या नंतरचा थर म्हणजे मौर्य-सातवाहन कालीन थर होय. सुबक मातीच्या भांडयांचा वापर हें या कालखडातील वैशिष्टय आहे. येथें आढळलेल्या मौर्यकालीन थरांत एक गोष्ट विलक्षण आढळून आली आणि ती म्हणजे ही कीं, गंगेच्या खोऱ्यांतील उत्खननांत मौर्यकालीन अवशेष जितके विपुल सांपडतात तसेच येथेहि सापडले आणि दोन्हीहि अवशेषाचा सास्कृतिक पातळीचा दर्जा एकच आहे.

या थरात स्त्रियांनीं कानांत घालायचीं कर्णफुलें मिळालीं. हीं कर्णफुलें मण्याची आणि स्फटिकांची असून त्यांवरील चकाकी आणि कलाकुसर ही उच्च प्रतीची आहे.

याच थरांत स्फटिकाचे असख्य मणी मिळाले असून या काळांतील कारागिराच्या कौशल्याचीं तीं स्मृतिचिन्हेच होत.

मौर्यकालाच्या मागोमाग सातवाहन काळांतील थरांतहि या नगराच्या प्राचीन वैभवाच्या खुणा सागणारे अवशेष सापडले.

मान उंच करून डौलानें चालणाऱ्या एका कोंबडयाचें चित्र एका मुद्रेवर असून त्यावर ब्राह्मी लिपींत दोन अक्षरें आहेत. या शिवाय कांहीं नाणी, डोळयांत काजळ घालण्यासाठी वापरायची कांडी, स्वयंपाकघरातील पाटा-वरवंटा, कुलूप इत्यादि स्थिरावलेल्या नागरी जीवनाची खूण पटविणाऱ्या अनेक वस्तु सातवाहन थरांमध्यें आढळल्या.

१ : जे कां रंजले गांजले

२ : त्यासी म्हणे जो आपुले

३ : तोचि साधु ओळखावा

४ : देव तेथेंची जाणावा

अर्थात्

चार भागांतील

भा. रा. भागवत

यांची

गाजलेली कलाकृति

• • •

गांजलेले जीव

मूल्य बारा रुपये

• • •

महाराष्ट्र प्रकाशन

राजकमल चाक,

अमरावती.

एकूण कौंडण्यपुर हें मौर्य-सातवाहन काळांत एक भरभराटीला आलेलें व्यापारी नगर होतें एवढें निश्चित.

### पुढचे दुवे खुंटले

सातवाहन काळापासून तो मुसलमानी काळापर्यंतच्या थरांत कांहींहि स्मृतिचिन्हें सांपडलीं नाहींत. चौदाव्या शतकांत मुसलमान सत्ताधिकाऱ्यांनीं हा भाग व्यापल्यानंतर त्यांनीं आपले महाल, राजवाडे बांधण्यासाठीं मातीचे बरेचसे ढिगारे अक्षरशः भुईसपाट केले आणि त्यांत जुन्या काळांतील अवशेष नाहींसे झाले असावेत.

सातवाहन काळानंतर मधले वामाटक, चालुक्य, राष्ट्रकूट यादव, आदि काळांतील अवशेष न सांपडता एकदम चवदाव्या-पंधराव्या शतकांतील मुसलमानी वास्तूंचे अवशेष या उत्खननांत सांपडले.

या काळांतील एका विशाल प्रासादाच्या पायऱ्याचे आणि विटांच्या भिंतीचे अवशेष वरील थरांत आढळून आले. या प्रासादांतील फरसामध्यें (Flooring) शंख शिंपल्यांचा वापर केलेला आढळला.

या काळांतील मुस्लिम वास्तु थोडयाच दिवसांत नाहींशा होऊन हा भाग निर्जन झालेला दिसतो. मुसलमानी अमलांतील धांवपळीच्या जीवनाची ही खूण दिसते.

### इतिहासाचें सातत्य बोलकें झालें.

पूर्व महाराष्ट्रांतील पांच हजार वर्षांच्या इतिहासाच्या क्रमवद्ध विकासावर एक प्रकाशझोत कौंडण्यपुर येथील उत्खननामुळें पडला आहे.

हें उत्खनन चांचणीच्या स्वरूपाचें होतें. तरी पण शास्त्रीय पद्धतीनें झालेलें विदर्भांतील हें पहिलेंच उत्खनन होय. याच ठिकाणीं अधिक विशाल प्रमाणावर उत्खनन केलें गेल्यास कौंडण्यपुरच्या आणि तद्अनुषंगानें महाराष्ट्राच्या प्राचीन इतिहासावर अधिक प्रकाश पडणार आहे. • • •



# कविता

## सांजवात

क्षितिजांत उसळती
छटा गुलाबी जांभळ्या
क्लान्त श्रान्त धरेवर
छाया शामल लांबल्या !

दिसे डोंगर दूरचा
निळा-सांवळा धूसर
गूढ संधिप्रकाशांत
झांकळला परिसर !

धूळ उधळत गेलीं
गाई-गुरें घरोघरीं
पाखरांची किलबिल
आली परत कोटरीं !

शांत, संथ सरितेचें
जळ चुंबितात छाया
लवूनिया वृक्षवेली
पाहतात पडछाया !

किनारीच्या झाडींतून
शीळ घुमवितो वारा
गर्द निळ्या आकाशांत
चमकतो शुक्रतारा !

प्रभा विजेच्या दिव्यांची
उजळली नगरांत
दूर झोंपडींत मंद
पाजळली सांजवात !

—विश्वनाथ जोशी

## चंद्रिका ही जणूं

रौप्य रसाचें भांडें फुटलें
तेंच चहूंकडे आज सांडलें ॥ १ ॥
प्रीति रसाच्या या राजावर
डाग कशाचा दिसे मुखावर ॥ २ ॥
दृष्ट टाळण्या तव मातेनें
तीट रेखिली सावधतेनें ॥ ३ ॥
युगुल दमलें विहार करूनि
जगा विसरलें मधुर मीलनीं ॥ ४ ॥
चिरयौवना राणि रोहिणी
शशी वक्षावरीं निजली गगनीं ॥ ५ ॥
तिच्या रेशमी कचभाराचा
हाच डाग शशीवक्षावरचा ॥ ६ ॥

—मुकुंद वि. वैद्य

## याचना

अज्ञाताच्या गहनामधुनि
छेडित कोणी सतार सुंदर
अनंत आणिक क्षण सोन्याचे
करण्याला हो जर साकार

नील नभाच्यां अव्यक्तांतुन
नक्षत्रांच्या दिव्य पर्यातून
आणिक स्वप्नांच्या तेजांतून
जर भूवर घेईल अवतार

दिव्य दीप्तीच्या उल्केसम, वा
धूमकेतुच्या गतिमत्वानें
युगपुरुषांची दिव्य विभूति
देइल जर मज साक्षात्कार

अन तेजाच्या अधरांवरति
झालें जर तें मधुमय कंपन
अलौकिकाचें 'अचूक चित्रण'
पुसावयाला मम अंधार

अंतरींच्या मम देव्हाऱ्यांत
दीन व्यथांचें अविरत कंपन
परि कवितेच्या स्वरकारांचें
होईल तेथें चिंतन पूजन

वदेल कदाचित मम भाग्यानें
सत्य-चिरंतन मजला प्रभूकर
" उठ साधका, प्रसन्न वदनें
माग हवा तो देईन तुज वर "

" अखंड माझ्या अंतरांत ह्या
कोटि सुरांचा ऋण-संभार
हीच याचना त्यांतिल कांहीं—
करी प्रभो, तूं हलका भार

तव दीप्तीनें यामिनींत ह्या
पळभर चपला चमकावी
आणि व्यथेची माझ्या कविता
नित शब्दांतुनि उमटावी. "

—प. यू. सोनांबेकर



मुलगा मिळवता झाला. सून आली. आतां ताईंचं आमच्या घरीं स्वैंपाकपाणी करणं बरोबर नव्हतं. तरीसुद्धां त्या लेकाकडून ओढीनं आमच्या घरीं धांवत आल्या. पोटच्या पोरापेक्षां त्यांची आमच्यावरची माया पाहून ' आंतड्याची माया ' खोटी की काय असा प्रश्न पडला—

# आ धा र

ना. स. करंदीकर

**हा**तांत एक जुनी, मोडकी, दोरानें बांधलेली ट्रंक, एक तांब्या व पिशवी घेऊन त्या पहिल्यानें आल्या. चिठ्ठी वाचत असताना त्याचा चेहरा घाबरल्यासारखा झाला होता. "स्वयंपाकपाणी, कपडे धुणें, भांडीं घासणें, केरवारा करणें, सणासुदीस पक्वान्न करणें— सर्व पडेल तें करावें लागेल—" मी चार कामें जास्तच सागत होते व मनांत म्हणत होते—' हो, सांगितलेलीं बरीं. मी हात-भार लावीन पण अगोदर सोडवलेलें बरें—' माझें बोलणें पुरें व्हायच्या आंतच त्या म्हणाल्या, "वैनी, पडेल तें काम करीन हो— पहा तर खरं— पण नाही म्हणूं नका. तुम्ही द्याल त्यात मी संतुष्ट राहीन. पण मला यावेळी आसरा द्या—"

लगेच ओचा पदर खोवून केरसुणी घेऊन त्या कामाला लागल्या-देखील——

त्या दिवसानतर आज पाच वर्षें झालीं. गुणाताई आमच्या घरीं रावराब राबल्या. त्याच्या हाताला उसंत नाहीं. आल्यागेल्याचें, पै-पाहुण्याचे सर्व व्यवस्थित करून पुन्हा भांडीं लखलखीत, कपड्या-लत्त्याची, धान्या-धुन्याची सर्व देखरेख त्या पहात. सांड-लवड नाही. स्वयंपाक मधुर, रुचकर व वेळेवर. बोलणें नाहीं, धुसफूस नाहीं. बोलल्या तर मोजकें व गोड.

मी काम करूं लागले कीं, त्यांनीं माझा हात धरायचा व म्हणायचें, "वैनी, नका हो तुम्ही कामाला लागूं. तुमची प्रकृती नाजूक. तुम्हीं काम करूं लागलात कीं, मला कसेसेंच होतें. नुसतें माझ्याकडें पहात बसा. घरची लक्ष्मी नुसती जवळ असली म्हणजे कामाला कसा हुरूप येतो."

कुठलेंहि काम त्यांना अवघड नसे. पुरणावरणाचा स्वयंपाक असो कीं साधा असो, शेंवया, पापड, कुरड्या, लोणची, मसाले तिखट, सर्व करायला तयार. एखादा नवीन जिन्नस मीं सांगितला कीं, "वैनी, आपण करूं या हो रविवारी—— मला आणून द्या सामान—" असा त्यांचा आग्रह.

गुणाताई इतक्या जीव लावून कशा काम करतात याचें आम्हाला आश्चर्य वाटे. पूर्वी आमच्या घरीं आत्तापर्यंत एक स्वैंपाकी, दोन स्वयंपाकीणबाई काम करीत होत्या. पण काही फार दिवस टिकल्या नाहीत. काय काय त्याच्या अटी— काय त्यांची मिजास—! शेवटच्या बाईनीं तर कमालच केली, त्या आमच्या घरीं कामाला आहेत कां मीच त्यांच्या घरीं कामाला, सेवेला आहे हें समजेनासें झाले. 'वैनी, मला शिधा काढून द्या, काय मेले भिकार गहू आणले आहेत, मला उद्यांला यायला नाहीं व्हायचं हो——' वगैरे वगैरे तक्रारी सदा चालूच. ह्या सर्व अनुभवांशी तुलना करतां ह्या गुणाताई आम्हांला कशा लाभल्या याचें मला राहून राहून आश्चर्य वाटे.

गुणाताई गांव सोडून मुंबईला कां आल्या, त्या एवढ्या कोणा-साठीं खस्ता खातात— याची बातमी त्याचेच तोंडून आम्हांला हळूं हळूं मिळत गेली.

एखाद्या वेळीं खिडकींतून आकाशाकडे टक लावून त्या उभ्या रहात. मग लक्षांत येई कीं, त्याचें लक्ष वरसईतील आपल्या छोट्या घराकडे लागलें असावें. तेथील आपलें पूर्वायुष्य, आपल्यावर आलेल्या आपत्ती, दारिद्र्यानें गांजलेलें जिणें, आपला 'आनंदा' त्यावेळीं सारा दोन वर्षांचा तेव्हां हें आपल्या सोडून निघून गेले—मिलिटरीत जातो म्हणून पण या वेळेप 'त पत्ता नाही. आपण ह्या अशा अनाथ झालों. ह्या पोराला घेऊन कसें उभें आयुष्य काढणार— ह्या खेडेगांवांत?...

"ह्या पोरासाठीं धांवत, धडपडत आले हो वैनी, मी एवढें धाडस करून—" एके दिवशीं काम आटोपल्यावर थोडा निवातपणा मिळाला त्यावेळीं त्या म्हणाल्या——

"आनंदाच्या वडिलांना परागंदा होऊन इतकीं वर्षें झालीं. मीं एवढ्या पोराला घेऊन कसे दिवस काढले असतील तें माझें मीच जाणें— नाही म्हणायला ह्या पोराचा आधार मला व माझा त्याला त्याच्या वडिलांची पहिल्या पहिल्यानें कांहीं बातमी येई. पण गेलीं ७–८ वर्षे चिठ्ठी नाहीं, चपाटी नाहीं— निरोप नाही, भेट नाहीं कीं काहीं नाहीं. त्यांना मुबलक पैसे मिळतात असे ऐकलें मीं— पण आम्हांला काय त्याचें—? त्यांनीं आम्हांला असे हवेंत सोडलें नसतें! पण काय करणार— जेथें अब्रूनें इतके दिवस काढले तेथें रहाणें मुष्कील झालें.

"आईवडील मरून गेलें. माहेर तुटलें. सख्खे भाऊ, बहिणी कोणी नव्हतेच. या दिवसांत ज्याचें त्यालाच थोडें झालेंयू मग लांबच्या नात्याच्या माणसाना कोण विचारतो? शिवाय लोकांचीं उणीं—दुरीं उत्तरें, घालून पाडून बोलणीं. 'हिच्या नवऱ्यानें हिला टाकली, त्यानें दुसरें लग्न केलें. तो हिला आतां कसचा विचारतो—? ही वाईट चालीची आहे. ही एके दिवशी गुण उधळणार—' असेदेखील बोला-यला लोकांनीं कमी केलें नाहीं. लोकांच्या तोंडाला कोण लागणार—! गरिबी मोठी कठीण आहे! एक ना दोन किती गोष्टी मीं सहन कराव्या वैनी——? कोणी नाहीं म्हणायला गिरिधरभटजी तेवढे आस्थेनें, मायेनें विचारपूस करायचें! 'पोरगा हुषार आहे. त्याला खूप शिकवलास तर पांग फेडील गुणाताई—!' ते मला म्हणायचे; त्यांनीच आनंदाला शाळेंत घातलें; त्याच्या अभ्यासावर देखरेख ठेवली. वेळीं फी पण त्यानींच भरली. आतां त्याला हायस्कुलात दाखल केले पाहिजे; त्याची फी, पुस्तकें कपडेलत्ते सर्व खर्च कसा काय निभावणार—? आनदा हुषार, पुढें दिवस कसा काय जाणार हीं सव चित्रें डोळ्यांपुढें येत होतीं, पण आजचा दिवस कसा काय जाणार ही जिथें भ्रांत तिथें इतक्या दूरच्या गोष्टीवर—— विसंबून काय चालणार——? कोणाच्या घरी कामाला जा, पापड करून दे—— लग्नकार्यांत मदत कर, बाळ-बाळंतिणीचें काम कर, अंगाला लावायचं काम, वेळीं भांडी घासायची व धुणी धुवायचीदेखील कामें केलीं पण आमच्या वरसईत तीं काय असणार——? थोरामोठ्यांच्या बायका-देखील घरातील कामें स्वतः झटून करीत. आनंदा मॅट्रिक झाला. गिरिधरभटजी म्हणाले, "त्याला कॉलेजात घालायचा."

आनंदाच्या पुढील शिक्षणाच्या काळजींत मी दिवस काढत होते. काय करावे असा माझ्यापुढें पेंच पडला व शेवटीं उठले आणि गिरिधरभटजींच्या घरीं त्यांना भेटून सागितलें, "गुरुजी, आतां पुढं कसं करायचं हो ? ह्या गांवांत कशी राहू, पैसे कसे व कोठून आणू ? व आनंदाचें पुढचें शिक्षण तरी कसें करूं ? मी ही अशी अनाथ. धड सघवाहि आणि विधवाहि नाहीं. कसे उजळ माथ्यानें वावरूं आणि कोणाचा आधार घेऊं ?" मी एवढें शब्द कसेबसे उच्चारलें व हुमसून रडू लागले. गिरिधरभटजींनीं मला धीर दिला. म्हणाले, "गुणाताई तूच जर असे हातपाय गाळलेस तर त्या पोराने ग काय करायचे ? असं वेडयासारख करूं नको– मी तुला चिठ्ठी देतो." तीच चिठ्ठी घेऊन तुमच्या घरीं आलें—"

मधून मधून गुणाताईना पत्रें येत. गिरिधर भटजीकडून. तें पत्र आलें म्हणजे माझ्या मुलांकडून किंवा माझ्याकडून तें त्या वाचून घेत. पुन्हा पुन्हा वाचून घेत. एखादी मौल्यान वस्तू जपून ठेवावी तसें जपून ठेवीत. एके दिवशीं एकटयाच विचारमग्न खिन्न, असल्या म्हणजे मी विचारावें, "गुणाताई, कसला एवढा विचार करतां–?" त्यांनी लगेच हसून उत्तर द्यावें–"नाहीं हो वैनी, कसला विचार नि काय ? आनदाचें शिक्षण कधीं पुरे होतें याकडें माझें सर्व लक्ष. दुसरें काय असणार माझ्या चिमुकल्या जगांत ? त्यांची तर आशा करायलाच नको. मग मीं तरी कोणाच्या आशेवर दिवस काढायचे–?"

मीं मग म्हणावें, "गुणाताई, तुमचे श्रम वायां जायचे नाहीत. घागरी घागरींनीं गाळले श्रम आहेत तुम्ही. परमेश्वर कांहीं झोंपला नाही. जग विरुद्ध झालें तरी तुम्ही डगमगू नका. कोणीतरी विठ्ठलासारखा उभा राहीलच राहील."

त्यांना आमच्या घरी राहून पांच वर्षे पूर्ण झाली. सहावें सुरू होतें गिरीधरभटजीचा समाचार आला होता आनंदा बी. ई. च्या परिक्षेला बसला आहे तो आतां लवकरच इंजिनिअर होईल, तुमचे कष्टाचे दिवस संपत आले. हें पत्र आलें त्यादिवशीं माझेजवळ त्या निवात बसल्या, कृतज्ञतेनें त्यांचे डोळे भरून आले होते. त्या म्हणाल्या "वैनी, तुमचे व दादासाहेबाचे उपकार मी कसें फेडू ? माझ्या पडत्या काळांत तुम्हीं सावरलेत. आधार दिलात. घरच्यासारखें वागवलेंत. परमेश्वर तुमच्या रूपानें उभा राहिला. जसा जनाबाईला विठ्ठल ! हा जून महिना संपला कीं मी तुमचा निरोप घेईन म्हणते–"

मी म्हणाले, "तुम्ही आमचे उपकार ते कसले मानतां ? अहो, आम्हांला तुमच्या रूपानें अन्नपूर्णा मिळाली. तुम्हीं अतोनात कष्ट उपसलेत, आमच्या घरची सर्व व्यवस्था पाहिली, खाण्यापिण्याचें, आल्यागेल्याचे, सणावाराचें, सर्व संभाळलेंत. आतां आम्हाला अवघड जाणार–!"

आतां मात्र मलाच अवघड वाटत होतें. आम्ही दरवर्षी उन्हाळयात माथेरान, खंडाळा अगर महाबळेश्वरला गेलों कीं गुणाताईंच्यावर खुशाल घर टाकून निवांत जात होतों. लग्नकार्यास अगर काही प्रसगीं बाहेरगावीं गेलो तरी आम्हाला कसलीच काळजी नसे. गुणाताईनीं घर संभाळावें, स्वच्छ राखावें, पुन्हा आम्ही परत आलों कीं लगेच गाडी सुरूं. आमच्या खाण्यापिण्याच्या, कपडयालत्त्याच्या आवडीनिवडी व देखरेख त्यांच्या इतकें अंगवळणीं पडलें होतें कीं आम्हांला कांहीं म्हणून पहावें लागत नसें. कोठें कांहीं हरवलें कीं त्यानीं हुडकून सांपडवून द्यावें. एकदां तर माझा कंठा व तन्मणि हरवला होता. आम्हांला वाटलें, चोरला कोणीतरी. गुणाताईचा सशय स्वप्नांतहि येणें शक्य नव्हते, पण त्या विचारीचा जीव चोरटयासारखा झाला. त्या बेचैन झाल्या व त्यानी त्रिखंड शोधले. त्या दिवसापासून त्यांच्या मनाची शांति ढळली अभावी. एक-दोन वेळां मध्यरात्रीं उठून मीं चाहूल घेतली तर त्या देवघरात नदादीपासमोर डोळे मिटून ध्यान धरून बसलेल्या. दुसऱ्या खेपेस मी त्यांना जाग देऊन विचारले, "गुणाताई, हें काय ? एवढं काय मनाला लावून घेतां ? आम्हीं कधी चुकून तरी म्हटलें का तुम्हाला ?" उलट ह्यांनीं तर मला बजावलेदेखील, "पहा हं, तूच वेंधळेपणानें हरवले असशील कोठेंतरी दागिने, आणि बोभाटा करशील. आडून कांहींतरी बोलशील आणि गुणाताईंना दुखावशील—"

गहिंवरून मला त्या म्हणाल्या, "वैनी तुमचें मन मोठें, पण इतर काय म्हणतील ? म्हणून पांडुरंगाचा धावा करीत होते. जनाबाईवर पांडुरगाच्या गळयांतील कठा चोरल्याचा आळ आलाच ना ? मग माझें काय होईल ? आनंदाचें काय होईल ?"

शेवटी गव्हाच्या डब्यामागें तो कंठा पंधरा दिवसांनी सांपडला, त्यावेळी माझ्यापेक्षां त्यांनाच आनंद झाला. व त्यांनी आपल्या पैशाचे पेढे आणून वाटले व जोगेश्वरीला खणानारळांनीं ओटी भरली. मलाच तेव्हां लाजल्यासारखें झालें !

गिरिधरभटजींकडून रिझल्टची व आनंदाच्या पत्राची त्या वाट पहात होत्या. त्यांना अजून हुरहूर वाटत होती. पास होतो कीं नाही ? मन चिंतीं तें वैरी न चिंती ! कांहीं भलतेसलते विचार त्यांच्या मनांत येत. व मग त्या मला म्हणत, "वैनी, आनदा पास होईल ना हो ? त्याला नोकरी मिळेल ना लवकर ?"

मी त्यांना धीर देऊन "म्हणें, परीक्षेंत एक मुलगा पास व्हायचा झाला तरी तो आनंदाच पास होईल गुणाताई– देव इतका काही झोपलेला नाहीं. आणि नोकरीचें म्हणाल तर, इंजिनीअर झाल्याबरोबर नोकरी लागली नाहींतर सांगाल तें देईन."

फारच अधिर्या झाल्या म्हणजे मी मुद्दामच रागावून म्हणें, "मग समजा एखादं वर्ष आणखी लागले तर तुम्ही कांहीं उघडयावर नाही ना पडला ? तुम्हांला आणखी एक वर्षच काय पण जन्मभर सभाळण्याची आमची तयारी आहे; मग तर झाल ना ?"

ह्यावर त्या म्हणत–"तसं नव्हे हो वैनी, पण तुमच्या उपकाराचा फायदा तरी किती आतां घ्यायचा !

त्यांच्या मुलाचा परीक्षेचा निकाल आठवडयावर आला. तो आठवडा गुणाताईचा गडबडीत गेला. दरमहा नियमितपणें पैसे पाठवीत असल्यामुळें त्याचेजवळ फार पैसे शिल्लक नव्हते. त्याची अडचण ओळखून मीच त्यांना महिन्याचे पैसे आगाऊ दिले. ते हातात पडल्यावर त्या म्हणाल्या, "वैनी, आज माझ्याबरोबर बाजारांत याल काय ? मला कांही जिन्नस खरेदी करायचे आहेत." त्यानीं आनदासाठी कांही व इतर कोणासाठीं कोण जाणें बऱ्याच वस्तु खरेदी केल्या. फ्लॉवर पॉट, ट्रे, शर्टचें कापड, एक जरीचा खण, एक पातळ.

शेवटीं एके दिवशीं एक तार आली. ती वाचेपर्यंत गुणाताईचा जीव कासावीस झाला. त्या जीव मुठीत धरून ऐकत होत्या, "आनंदा पहिल्या वर्गांत बी. ई. ची परीक्षा उत्तीर्ण झाला." हे ऐकलें मात्र ताईच्या डोळयांतून आनदाश्रू वाहूं लागले. त्या थरथरत होत्या.

माझे दोन्ही हात धरून वेड्यासारख्या कितीतरी वेळ पाणी काढीत होत्या.

आनंदा हा आतां इंजिनिअर झाला होता. उत्तर हिंदुस्थानांतील धरणावर त्याची नेमणूकदेखील झाली होती गुणाताईचा जाण्याचा दिवस उजाडला. आम्हां दोघांना फारच अवघड वाटत होतें. पण आई लेंकराला भेटायला जात होती. त्यांच्या जाण्यांत वियोग होता व आनंदहि होता.

जातांना ह्यांनीं नमस्कार केला. फ्लॉवरपॉट ह्यांना भेट म्हणून दिला. माझ्या हातांत एक जरीचा खण व लुगडें दिलें. म्हणाल्या, " वैनी, गरीबाची आठवण ठेवा. तुमच्या घरीं मला आसरा मिळाला माझे कष्टाचे दिवस संपले.

दोन वर्षांनीं उत्तर हिंदुस्थानांतून आनंदाचें एक आग्रहाचें पत्र व लग्न निमंत्रण-पत्रिका आली. आनंदाच्या लग्नाला आम्हांला कांहीं जातां आलें नाहीं. आम्हीं आहेर व शुभाशीर्वादपत्र पाठविलें. गुणाताईंना सून आली तर ! ! कष्टलेला जीव आतां थोडा विसावेल ! !

यानंतर सुमारें तीन वर्षें लोटलीं असतील. एके दिवशीं सकाळीं गुणाताई पुन्हा पूर्ववत् ट्रंक, वळकटी घेऊन आमचें बिऱ्हाडीं हजर झाल्या. हे ऑफिसांत गेले होते. मीं विचारलें.

" पत्र नाहीं, अचानक कशा आलांत--?"

त्यांच्या तोंडांतून शब्द येईना. मग सांगेन एवढेच म्हणाल्या आणि कामालापण लागल्या. मीं आणखी विचारलें नाहीं. लगेंच कां आल्या वगैरे चौकशी करणें ठीक नव्हतें. जेवणेंखाणें झालीं. त्या आपण होऊन बोलल्याशिवाय कांहीं विचारायचें नाहीं असें मीं ठरवलें होतें. बाईचें मन मुलाच्या व सुनेच्या संसारांत रमलें नाहीं कीं काय ? सासु-सुनांचें भांडण, नव्या व जुन्याचे संघर्ष होणारच, असा आपला विचार माझ्या मनांत ! मुलगा काय कितीहि चांगला, समजुतदार असला तरी नव्या नवलाईच्या संसारांत व आपल्या कामांत गढलेला. आई म्हातारी, कष्टलेली याची जाणीव असली तरी पत्नीच्या तंत्रानेंच वागणार-असें कांहींबाही माझ्या मनांत चाललें. तों पांच वाजले. गुणाताई मला म्हणाल्या, " वैनी, दादासाहेब येण्याची वेळी झाली ना हो ?" मी म्हणाले, " हो, येतील आत्तां अर्ध्या पाऊण तासांत— टाकतेंच मी चहा व करते थोडें फराळाचें." असें मीं म्हणायचा अवकाश. गुणाताई उठल्या व लगबग करून म्हणाल्या, " नाहीं वैनी, आज मी तुम्हांला नाहीं करूं देणार-- माझ्या हातनं होईल सगळं आज--"

मीं कांहीं मोडता घातला नाहीं. मात्र शेवटच्या वाक्यानें हादरलेच, तापलेल्या तव्याला थंड होऊं देणें व तुडुंब भरलेल्या तळ्याला आपोआप प्रवाही होऊं देणें ठीक असतें.

हे आले. चहा, फराळ झाल्यावर गुणाताईनीं सांगितलेली सर्व हकिगत समाधानकारक होती. खटकण्यासारखें कांहीं नव्हतेंच, आनंदाचा संसार आतां छान रांकेस लागला होता. त्याच्या संसारवेलीला एक सुंदर फूल आलें होतें. नातवाचें कौतुकहि झालें होतें. ताई सांगत होत्या -

" आनंदाकडे अगदी ताटावरून पाटावर आहे.पण खरं सांगूं कां — माझं कांहीं तिथें मन रमेना— ! घरांत स्वैंपाकाला बाई, नातवाला घ्यायला ऑफिसचा शिपाई, हा महिन्यांतून पंधरा दिवस फिरतीवर सूनबाईस मंडळ असतं. क्लब असतो. मला वेडचासारखं होई. सूनबाई मला स्वैंपाकाला हात लावूं देत नाहीं. म्हणाली साहेबांची आई स्वैंपाक करतें हें लोकांना कळलं तर लोक काय म्हणतील कॉलनींतले— ? — दांत पडल्यावर वडे खातां येत नाहींत तसं झालंय् माझं. सुखाला देखील चव असते. आतां मला ती समजतच नाहीं— "

" आनंदाला वाईट वाटेल, त्याला एवढा पगार असतांना तुम्ही आमच्याकडे स्वैंपाकपाणी केलेंत तर ...... ! "-हे म्हणाले.

" आनंदाजवळ मी कबूल करून आलेय मीं स्वैंपाक केला तरी पैसे घेणार नाहीं. उलट माझेच पैसे तो पाठविणार आहे महिन्याच्या महिन्याला—"

मीं म्हटलं—" असं कांहींच्या कांहींच नका बोलूं. कांहीं घेणार नाहीं हें नाहीं चालायचं आणि आम्ही पण पैसे नाहीं घेणार — "

गुणाताई खालीं मान घालून बसल्या. कांहीं बोलेनात. हे म्हणाले— " इतकं काय कठीण वाटतं यांत तुम्हांला — ? "

" इतकीं वर्षें मीं स्वैंपाक केला. पैसे घेतले. शिवाय आधार घेतला. आतां मी पैसे घेणार नाहीं. माझा कुणालातरी आधार वाटतो एवढंच सुख कांहीं वर्ष मिळालं तरी पुरेल मला. आनंदाकडे मला कांहीं कमी नव्हतं. पण हें सुख मला तिथं मिळत नव्हतं. मीच नकोशी झाले कां तुम्हांला—"

ताईचा आवाज भरून आला होता.

या प्रश्नाचें उत्तर आम्हीं कुणींच कधीं दिलें नाहीं. सध्यां ताई आमच्याकडेच असतात. कुणी विचारतात—

" स्वैंपाकाची बाई पुनः आली वाटतं ?"

मी सांगते—" नाहीं. त्या माझ्या चुलत चुलत सासूबाई ! त्यांच्या मुलाला आतां कांहीं कमी नाहीं. पण तिथली हवा मानवत नाहीं त्यांना—! ! "

●●●




## समाज प्रबोधन संस्था

**१२४२, सदाशिव पेठ, पुणें २.**

| | |
|---|---|
| आर्थिक विकासाचा प्रश्न : दे. अ. दाभोळकर | १·५० |
| लोकशाहीचा कारभार : सदाशिव आठवले | २·०० |
| विश्वरचना : ना. वा. कोगेकर | १·२५ |
| आपला महाराष्ट्र : पन्नालाल सुराणा | २·५० |
| अपंगत्वावर विजय : उषा मोहनी | २·६० |
| भारतीय शेती : स. ह. देशपांडे | २·०६ |
| राजकीय पक्षांसाठीं आचारसंहिता : ( सं. निबंध ) | २·०० |

# दलाल

लेखक : माधव आपटे

"केम बाबूभाई केम चले " हॉस्पिटलच्या फाटकाच्या प्रवेशापाशींच एका कंपाउंडरनं बाबूभाईला विचारलं.

बाबूभाईनं प्रथम त्याकडं लक्ष दिलं नाहीं. पण नंतर त्यानं " डॉक्टरसाब, इधर आवो जरा " म्हणून बोलावलं व " अवे तो आटलो वघो चालतो नथी. " म्हणून सांगितलं. व " डॉक्टरसाहेबांना " चहाचा आग्रह करून रस्त्यापलीकडच्या हॉटेलांत नेऊन एक " त्रण नंबर " स्पेशल चहा पाजला व धंद्याची साद्यंत हकीकत सांगितली.

तसं पाहिलं तर बाबूभाई एक साधा दलाल होता. पायांतल्या चपला व झब्ब्याच्या खिशांतली चोपडी-पेन्सिल एवढंच त्याचं भांडवल होतं. कुणाला कांहीं माल विकायचा असला तर 'सॅंपल्स' घेऊन फिरून गिऱ्हाइक आणायचं व कमिशन दलाली घ्यायची किंवा कुणाला कांहीं माल हवा असेल तर मिळवून देऊन दोघांकडूनहि दलाली उकळायची. विकणारीं व विकत घेणारा या दोघा गरजवंतांना एकत्र आणायचं सत्कार्य करणारी संस्था म्हणजे दलाल अशी त्यानं खुद्द त्याची व्याख्या केली होती.

डॉक्टरसाहेबांकडून मिळालेल्या माहितीचा विचार करत तो परत फाटकांत शिरणार एवढ्यांत दरवाज्यांत मोसंबीं विकत बसलेल्या माळणीनं त्याला हटकलं. हॉस्पिटलमध्यें रोग्याला भेटायला जायचं म्हणजे हातांत मोसंबीं असणं आवश्यक आहे अशी तिची ठाम समजूत असावी. डझनाच्या भावांत पाव डझन मोसंबीं बाबूभाईनें खरेदी केली व पैसे देऊन तो आंत शिरला. वॉर्डांत ओढू देत नाहींत. म्हणून त्यानं विडी बंडल काढून विडी पेटवली. (चपला व चोपडी-पेन्सिलीखेरीज विडी बंडल हाहि त्याच्या भांडवलाचा एक भाग धरण्यास वस्तुतः हरकत नव्हती.) विडी संपली आणि तो जनरल वॉर्डांत शिरला. भेटण्याची वेळ संपायला अद्याप बराच अवकाश होता.

बहुतेक सर्व रोग्यांना कोणी ना कोणी भेटायला आलंच होतं. त्यांची गर्दी जाणवत होती. कोणी रोग्यांच्या उशा पायथ्याशीं व जवळच्या स्टुलावर बसलीं होतीं, तर कांहीं लोक नुसते उभे होते. प्रकृतीची विचारपूस चालली होती. चौदा नंबरच्या खाटेवर मात्र एक म्हातारा रोगी पडून होता व कण्हत होता. त्याला बाबूभाईखेरीज कोणीच भेटायला आलं नव्हतं. बाबूभाईनं त्याला " केम काका " म्हणून हांक मारल्यावर तो बसता झाला व कण्हायचं थांबला. बाबूभाई त्याच्या पायाशीं बसत म्हणाला " काका, प्रकृति कशी काय आहे ?"

काकांनीं त्याच्याकडं एकवार निरखून पाहिलं. ओळखलं असं वाटलं नाहीं. तरी उत्तर दिलं, " अरे, कसली प्रकृति घेऊन बसलास, आतां थोडे दिवसाचे सोबती आम्ही " " असं बोलूं नका काका " बाबूभाई म्हणाला, " जगांत चांगले लोक पण आहेत. त्यांना जाण आहे चांगल्याची "

बोलता बोलता बाबूभाईनं त्यांना मुसुंब सोलून एक फोड खाऊं दिली व त्यांची पुढं चौकशी करत आणखी एक फोड दिली. काकांनीं आपली इत्यंभूत हकीकत सांगितली व आपण कां व कसें एकाकी हॉस्पिटलमध्यें येऊन पडलों तेंहि सांगितलं. ते सांगत असतांना अनेक वेळां चकचक असा आवाज काढून बाबूभाइनं सहानुभूति दर्शविली. काकाप्रमाणं बाबूभाईलाहि जगाच्या निर्दयपणाबद्दल कमालीची चीड व संताप होता. शांतपणें सर्व ऐकून घेणारा श्रोता मिळाल्यामुळं काकांना जरा बरं वाटलं व त्यांनीं आपल्या मनांतलं सगळं ओकून टाकलं. तें सर्व ऐकून घेऊन बाबूभाई म्हणाला, " काका जास्त बोलून त्रास हुईल, बोलूं नका, टपाल घालायचं का कुणाला ? अगदीं, एक्सप्रेस घालतो किंवा टेलीग्रामच करतो "

" कुणाला कांहीं लिहायला नको " असं काका प्रथम म्हणाले, परंतु नंतर त्यांनीं एका लांबच्या भाच्याला पत्र लिहिण्यास सांगितलं. बाबूभाईनं चोपडींतलं पान फाडून पेन्सिलीनं मजकूर लिहून घेतला व पत्ताहि लिहून घेतला व जरूर टाकतो म्हणून आश्वासन दिलं. भेटीची वेळ संपेपर्यंत बाबूभाई काकांच्या बरोबर गप्पा मारत बसला. रोज इतरांना भेटायला येणाऱ्यांचा काकांना अतिशय राग येई व त्रास होई. परंतु आज त्यांना तो झाला नाहीं व त्यांनीं बाबूभाईंना तसं बोलूनहि दाखवलं. बाबूभाई त्यांना म्हणाला, " यापुढं मी तुम्हांला रोज भेटायला येणार. बरे झालांत म्हणजे तुम्ही माझ्या घरीं चला "

परंतु बाबूभाईची ही भविष्यवाणी खरी ठरत नव्हती. एक-दोन दिवसांत काकांची प्रकृति अधिकच खालावली. दूरच्या भाच्याकडून कांहीं निरोप पत्रसुध्दां आलं नाहीं. तेव्हां तिसरे दिवशीं बाबूभाईनं काकांच्या सांगण्यावरून त्याला तार केली.

काकांना तर काय, भाचा आला काय आणि न आला काय दोन्ही सारखंच वाटायला लागलं होतं. त्यांना बाबूभाईबद्दल अतिशय प्रेम व आदर वाटायला लागला होता. ते म्हणाले, " बाबूभाई, माझी कांहीं म्हणजे कांहींसुध्दां इस्टेट नाहीं. नाहींतर ती सर्व तुमच्या नांवानं केली असती "

बाबूभाई म्हणाला, " काका, परमेश्वराच्या कृपेनं खूप प्रेम मिळालं मला म्हणजे बस. "

काकांचं हृदय अगदीं भरून आलं. ते म्हणाले,

" बाबूभाई आतां माझी कांहीं आशा राहिली नाहीं. आतां सुखानं मरतो "

भावनेचा तो क्षण बाबूभाईनं तसाच जाऊं दिला. थोडचा वेळानं थांबून तो म्हणाला, " काका, मरण कुणालाच चुकलं नाहीं. पण मरणानंतर सद्‌गति मिळायची असली तर तर्व क्रियाकर्म यथासांग व्हायला हवं. काका, रागावूं नका पण तुमचं क्रियाकर्म मला करूं द्या "

काका न पाहूं शकणाऱ्या डोळयांनीं त्याच्याकडे पहात राहिले. थोडा वेळ विचार करून ते म्हणाले, " कुणातरी धर्मार्थ संस्थेनं तें करायचंच तूं कर. तूं मला मुलासारखा आहेस.

बाबूभाईनं खिशांतून एक कागद काढला. काकाची त्यावर सही घतली व जवळच्याच दोघा इतरांची साक्ष पण घेतली. मृत्युनंतर देहाची विल्हेवाट लावण्याचा अधिकार त्या अन्वयें बाबूभाईला मिळाला होता.

दोनच दिवसानंतर काका वारले. बाबूभाई उशाशी बसून होता. काकांच्या मृत्यु-सर्टि-फिकेटावर डॉक्टरची सही झाल्यावरोबर त्यानं एक दीर्घ उसासा टाकला.

आतांपर्यंतचं नाटक ठीक जमलं होतं. आतां धंद्याला सुरुवात करणं आवश्यक होतं. पिशवींतून त्या दिवशीं आणलेलं डुप्लिकेट बुक काढून बाबूभाईनं एक इन्व्हॉइस तयार केला.


" मृतदेह नग १ किंमत रु.---

पैसे चेकनें त्वरित द्यावेत " आणि मेडिकल कॉलेजला माल पाठवत असल्याबद्दल टेलि-फोन करायला तो उठला.

बाबूभाईच्या मुलाला कुणीं विचारलं. " बापा सूं काम करे ?" तो उत्तर देत असे, " दलाल छे, हॉस्पिटलमा काम करे छे ! "

●●●


# राजा शिवछत्रपति



भाग एक ते दहा

ब. मो. पुरंदरे

एक : जन्म आणि पूर्वस्थिती

दोन : स्वराज्याची प्रतिष्ठापना

तीन : अफजलखान-मोहीम

चार : सिद्दीजौहर-मोहीम

पांच : शाइस्तेखान आणि सुरत

सहा : मिर्झा राजे जयसिंह-मोहीम

सात : आग्रा : कैद आणि सुटका


आठ : सुराज्याची प्रतिष्ठापना

नऊ : राज्याभिषेक

दहा : दक्षिण दिग्विजय

मूल्य :: सोळा रुपये

राजहंस प्रकाशन : ४१९ नारायण पेठ, पुणें २.



**रमेश सुळे**

ट्रींग–ट्रींग– ऽ ऽ ऽ कंडक्टरनें डबल बेल दिली आणि रामजीच्या बसनें स्टॉप सोडला. त्याची नजर सहज वरच्या आरशांत गेली. ऑफिसांत जाणारे बहुतेक पॅसेंजर या स्टॉपला उतरले होते नि गाडींत फक्त एक-दोनच शिल्लक होते. रस्ता रुंद होता पण भर रहदारीचा होता. त्या गजबजाटांतूनसुद्धां रामजी सफाईदारपणें बस चालवीत होता. समोरून एक भली मोठी निळी स्कूल-बस भर वेगांत येत होती. तिला जागा देण्याकरितां रामजीनें आपल्या गाडीचा वेग कमी केला आणि बस रस्त्याच्या कडेला घेतली. तो आणखी कडेला आला. आणखी कडेला आला. पण दुसऱ्याच क्षणीं ती प्रचंड बस त्याच्या गाडीवर आदळली. खूप मोठा आवाज झाला. आगीचा प्रचंड लोळ उठला, किंकाळ्या धांवपळ नि आरडाओरडा यांनीं सारं वातावरण भरून गेलं.

रामजी शुद्धीवर आला तेव्हां त्याच्या सर्वांगावर पांढरं शुभ्र बँडेज गुंडाळलं होतं. एक नर्स त्याच्या शेजारीं बसून होती. आणि दरवाजांत दोन पोलिस उभे होते. रामजीला कळून चुकलं, आपण पोलिसांच्या ताब्यांत आहोंत. आपल्याला अटक झालीय्. त्यानं हळूंच नर्सला विचारलं.

"अपघातांत कुणी दगावलं कां हो ?"

"छे, हो, तुम्हीं मुळींच बोलूं नका–बरं वाटलं म्हणजे आपोआप कळेल तुम्हांला सगळं."

पण रामजीला धीर निघत नव्हता कुणीतरी यावं...पारू कशी आली नाहीं अजून. तिनं तरी यावं असं त्याला फार फार वाटत होतं. आपल्या सहकाऱ्यांपैकीं कुणी तरी दिसेल म्हणून तो उघड्या दरवाज्याकडे टक लावून पहात होता. दादावर त्याचा फार विश्वास होता. दादा तरी नक्की येईल असं त्याला फार वाटत होतं. तो प्रसंग त्याला पुन्हा पुन्हा आठवत होता. वास्तविक आपली कांहींच चूक नव्हती. त्या रूटवर ती स्कूल-बस अनेकवेळां दिसली होती. पण इतक्या भरवेगांत ती कधींच अंगावर आली नव्हती. बरं, आपली तर कांहींच चूक नव्हती. पास ऑन होण्याकरितां वेग कमी करून आपण त्याला पुरेशी जागा दिली होती. असं असतांना त्या गाडीच्या ड्रायव्हरचा गाडीवरचा कंट्रोल कसा सुटला होता हेंच रामजीला समजत नव्हतें. नर्स कसल्यातरी कामासाठीं बाहेर गेली होती. इतक्यांत एका शिपायानें आंत डोकावलें. रामजीनं खूण करून त्याला जवळ बोलावलं.

"काय बरं वाटतंय् कां ?" हवालदारानें विचारलें.

"हां, आतां बरं आहे जरा.पण हवालदार साहेब कोणी दगावलं कां हो अपघातांत ?"

आपले दोन्ही हात हवेंत उडवून हवालदार म्हणाला.

" वा ऽ राव, तुम्हीं तर रेकॉर्ड केलत. "

" रेकॉर्ड म्हणजे...?" रामजीनं घाबरून विचारलं.

" चौदा पोरं मारलींत चौदा...! "

" चौदा पोरं? अरेरे ऽ ऽ निष्पाप कोवळे जीव "

" हो हो. निष्पाप कोवळे जीव. मुंगी-सारखे चिरडलेत " हवालदार आणखी काही सांगत होता पण रामजीचं तिकडें लक्षच नव्हत. त्याच्या डोक्यांत असख्य वर्तुळें फिरत होतीं. त्या दोन गाड्यांची टक्कर पुन्हा पुन्हा दिसत होती. तो आगीचा प्रचंड लोळ पुन्हा पुन्हा उठत होता. शरीर कापसासारखं हलकं हलकं झालं होत, नि खूप जोरात ओरडावसं वाटत होतं. आणि बघतां बघता तो ओरडत सुटला, "मीं चौदा पोरं मारली. मी राक्षस आहे, मी राक्षस आहे!"

# शिक्षा

उघड्या दरवाज्यांतून तो धांवत सुटला. क्षणभर गोंधळ झाला, धांवपळ झाली. कुणीं-तरी डॉक्टरांना बोलावून आणलें. रामजी ओरडतच होता, "मी राक्षस आहे. मी राक्षस आहे!"

दुसऱ्या क्षणीं दवाखान्याची बस रामजीला घेऊन मेंटल हॉस्पिटलला भरवेगाने धावत निघाली.

कंट्रोलरूममध्यें किल्ली ठेवून दादा दारा-बाहेर पडणार होता. इतक्यांत फोनवर संभा-षणात गुतलेल्या कंट्रोलरनें त्याला थांबण्याची खूण केली. कंट्रोलर फोनवर बोलत होता.

" काय? वेड लागलं? रामजीला?

......

कुठें आहे तो! मेंटल हॉस्पिटलमध्यें-?"

पुढचं ऐकण्याकरितां—दादा थाबला नाहीं.

कॅंटिनच्या दारात सखाराम कंडक्टर थांबला होता.

दोघांनीं मिळून दवाखान्यांत रामजीला भेटायच ठरवल होतं.

"सख्या, अरे रामजीला वेड लागलं—" दादा कातर सुरांत म्हणाले,

" वेड लागलं—, बापरे—आतां कसं व्हायचं दादा?"

" सगळंच विचित्र झालय सख्या—" दादा काळजीनं म्हणाला,

"पोलिस रामजीवर आरोप ठेवणार नव्हते. त्या स्कूलबसचा ड्रायव्हर दारू प्यायला होता म्हणे. पोलिस चौकशींत बाहेर आलंय् पण आतां हा आणखी घोटाळा झालाय्."

मोठ्या मिनतवारीनें दादा आणि सखा-राम त्याच्या कोठडीशीं पोंचलें. रामजी अजूनहि ओरडत होता.

" मी राक्षस आहे—मी राक्षस आहे."

रामजीची दुर्दशा पाहून त्या दोघांच्याहि डोळ्यात पाणी उभें राहिले.

" रामजी इकडे ये, तुझी चूक नाहीं. त्या ड्रायव्हरची चूक आहे—तू निर्दोष सुटणार आहेस—" दादा बाहेरून त्याला समजावीत होता. पण रामजी ऐकण्याच्या परिस्थितीतच नव्हता. तीच ती दोन वाक्यं तो पिसाटा-सारखा ओरडत होता. वेळ संपली आणि त्या दोघाना बाहेर पडावं लागलं. जाण्यापूर्वी दादानीं डॉक्टरांची भेट घेतली.

" काळजी करण्याच काहीच कारण नाही. बातमी त्याला हळहळूं सांगायला पाहिजे होती, ती एकदम सागितल्याने त्याच्या डोक्या-वर परिणाम झालाय्—सात-आठ दिवसांत त्याला बरं वाटेल—" डॉक्टरानीं आश्वासन दिलं,

दादाला दारात पहातांच पारूनें हुंबरडा फोडला. रामजीला वेड लागल्याची बातमी शेजाऱ्यापाजाऱ्यानी तिला सागितली होती. तिची कशी समजूत घालावी हेंच दादाला समजत नव्हतं. मग दादाने तिला हळूहळूं सारं सांगितलं. चूक रामजीची नव्हती. दुसरा ड्रायव्हर दारू पिऊन गाडी चालवीत होता. पोलिस रामजीवर आरोपसुद्धां ठेवणार नव्हते. रामजीच्या डोक्यावर थोडासा परिणाम झालाय् पण एक-दोन दिवसांत त्याला नक्कीच बरं वाटेल असं डॉक्टरांनीसुद्धां सांगितलं. मग कुठें पारूचा शोक कमी झाला.

" हे बघ पारूवहिनी, आम्ही ड्रायव्हर म्हणजे काय राक्षस आहोंत! आम्ही राक्षस नाहीं. आम्ही चालवतों तें इंजिन राक्षस आहे. इंजिनला हात घालतांना आम्ही दगडाचं काळीज करतों—पण दगडांतसुद्धां गार पाण्याचा झरा वहात असतोच ना"—दादाचं साधंसुधं तत्त्वज्ञान पारूला समजत नव्हत. पण त्याच्यावर तिचा पूर्ण विश्वास होता.

आणि एका आठवड्यांतच रामजीला मेंटल हॉस्पिटलमधून डिस्चार्ज मिळाला.

दुसऱ्या ड्रायव्हरनें दारू पिऊन गाडी चाल-विण्याचा गुन्हा कबूल केल्यानें खालच्या कोर्टीतच रामजी निर्दोष सुटला.

रामजी सुटल्यावर दादानें साऱ्या डेपोला दहा रुपयांचे पेढे वांटले. स्टाफ कमी अस-तानासुध्दां जनरल मॅनेजरशी भांडून दादानें रामजीला एक महिन्याची रजा मिळवून दिली.

आज रामजी जॉईन होणार होता. कंट्रोल-रूममध्यें जाऊन त्यानें बसनंबर व रूटनंबर घेतला व तो डेपोत गाडी ताब्यांत घेण्या-करितां गेला. किल्ली लावून त्यानं पेट्रोल सोडलं. इंजिन सुरू झालं. घर्र ऽ ऽ ऽ घर्र ऽ ऽ ऽ आवाज येऊं लागला आणि दुसऱ्याच क्षणीं रामजीच्या डोक्यांत सणसणून कळ आली. त्याला तो अपघात दिसू लागला. तो प्रचंड आवाज—त्या चिल्या पिल्यांच्या किंकाळ्या, तो आगीचा लोळ डोळ्यांपुढें नाचूं लागला. कसबसं इंजिन बद करून तो बाहेर आला. " क्या हुआ रामजीभाई?" सिंधी कंडक्टर धावून आला. त्यानं एक ग्लास पाणी आणलं—मग त्या दिवशी पुन्हा रामजीने रजा घेतली.

दुसऱ्या दिवशीं दादा मुद्दाम रामजीच्या पाठीमागें उभा होता. पण पुन्हा कालच्या-सारखच घडलं. इंजिनाची घरघर सुरूं झाली की रामजीचा स्वतःवरचा ताबा सुटत होता. त्याला काहीं सुचेनासं होत होतं. दरदरून घाम सुटत होता. चक्कर येत होती. शेवटीं त्यानं दादाला निक्षून सांगितलं.

"दादा, आतां मला आयुष्यांत मोटार चालवता येणार नाहीं. मला भीति वाटते, भयकर भीति वाटते.

"असं म्हणून कसं चालेल रामजी! बायकापोरांना काय उपाशी मारणार आहेस तू?

" त्यांच्यासाठीं हवं तर हमाली करीन मी. पण ही मोटार नको."

" हमाली करायचं मग बघू, अजून काही दादा मेला नाहीं."

दादा परत जनरल मॅनेजरकडे गेला. रामजीसाठीं पुन्हा सात दिवसाची रजा मागि-तली. यावेळी जी. एम्. नीं स्पष्ट नकार दिला.

# नवें वाचन

## पुनवेचा थेंब

प्रा. मधुकर केचे

‘पुनवेचा थेंब’ या मधुकर केचे यांच्या यंदाच्या महाराष्ट्र सरकारच्या बक्षिसपात्र संग्रहांत लहान-मोठया ९१ कविता समाविष्ट आहेत. “दिंडी गेली पुढें” नंतर संग्रहरूपानें ‘पुनवेचा थेंब’ घेऊन केचे मराठी शारदा दरबारांत परत अवतरले आहेत.

गेलीं पाच-चार वर्षें श्री. केचे यांच्या कविता निरनिराळया मासिकांतून वाचनांत आल्या आहेत. केचे हें नांव वाचतांच वाचकांच्या भावविश्वांत जे केचे उभे रहातात ते म्हणजे २५ ते ३० वयाचे एक सश्रध्द उमदे कवि. तुकाराम म्हटलें की,जसा त्याच्या पाठोपाठ अभंग अवतरतो तसेंच काहीसे केचे याच्या बाबतींत होतें.

श्रुतित पण अपुरा नव्हे, भावसघन पण भावगीत नव्हे, अशा अभंग छंदाचें केच्यांना वेड आहे. आणि त्याचें हें वेड औचित्यपूर्ण आहे. केच्यांची कविता अभंगाचें वाण लेऊन येते. इतर कोणताहि साज तिला आवडत नाहीं. अर्वाचीन काळीं अभगात रचना करणारे कांहीं कवि झाले, पण अभंगाशी अभंग नातें जोडण्याचें भाग्य त्यांना लाभले नाहीं. केच्यांचे मात्र अभंगाशी अभंग नातें जडलें आहे.

सध्यांच्या कवितेच्या युगांत अनेक वाद आहेत. नवकाव्य, जुनेंकाव्य. वास्तविक पहातां कविता ही कधीच जुनी नसते. नित्य नियमानें येणाऱ्या उषेप्रमाणें ती नित्य नवीन रूपांत प्रगट होत असते. जुन्या कवितेंत कांहीं अर्थ नाहीं आणि नवकाव्य मात्र आशयाची परार्धें घेऊन अवतरतें अशा व अशा तऱ्हेच्या वादांत पडण्याची केच्यांची इच्छा नाहीं. त्यांना एकच माहीत आहे कीं, गाणे गावयाचें माझें काम आहे. माझ्या गाण्यांत भक्ति आहे. माझ्या अंतःकरणांतून तें फुलतें आहे. त्याला निश्चित अर्थ आहे. ‘गाणें’ या कवितेंत ते म्हणतात—

“भक्तिमाजीं नाहीं देव,
जळीं जळाचा न ठाव।
ऐसें नाहीं नाही होणें,
वाचे, सोडूं नये गाणें।”

केच्यांचा पंथच स्वतंत्र आहे. म्हणूनच कुठल्याहि पंथांत त्याना जागा नाहीं. याचें दुःखहि त्यांना नाहीं. कुठल्याहि पथाशीं वादविवाद करण्याची त्यांची इच्छा नाहीं. जियून त्याची

---

## ( शिक्षा )

“हें बघ दादा, त्याला होत नसलं तर राजीनामा द्यायला साग. पण हें असं किती दिवस चालायचं?”

रामजीच्या मनांतली भीति घालवली पाहिजे, पण भीति घालवण्याकरितां नेमकं काय करायला पाहिजे हें दादाला सुचत नव्हतें. दोन दिवस असेच विचार करण्यात गेले. आणि दुसऱ्याच दिवशीं त्यानं सखाराम बरोबर निरोप पाठविला. दादाची शेवटची ट्रीप होती. गाडी डेपोंत टाकून तिघांनीं सिनेमाला जायचं ठरवलं.

ठरल्याप्रमाणें चार वाजता रामजी स्टेशनवर हजर होता. सखारामनें कंट्रोलरला कॅश मोजून दिली. तिकिटांचा हिशोब दिला आणि तिघेजण गाडींत बसले. दादानें गाडी डेपोकडे घेतली. स्टेशनपासून डेपो तीन-चार मैल दूर होता. नेहमींचा रस्ता टाकून दादानें गाडी गावाबाहेरून घेतली. दादाच्या मनात काय आहे याचा सखारामला पत्ता नव्हता. तो मनांत उगीचच बेचैन होता. रामजी आपल्याच दुःखात चूर होता.

गाडी गावाबाहेर मैल-दीड-मैल गेली नसेल तोंच दादानें कर्रकन ब्रेक दाबून थांबवली. समोरासमोर बसलेले सखाराम नि रामजी एकमेकांच्या अंगावर आदळले. आणि त्यांनीं स्वतःला सांवरून आश्चर्यानें दादाकडे पाहिलें. दादा छाती दाबून व्हीलवर पडला होता.

“काय झाल दादा?” सखारामनें घाबरून विचारलें

“सख्या, मी मरतोय् आतां– छातीतून कळा येतायत.”

“बापरे! आतां काय करायचं रामजी?”

“जा पळ, डॉक्टर घेऊन ये–” रामजी दादाकडे धांवत जात म्हणाला.”

“वेड लागलं काय रामजी, गांव दोन मैल लाब. डेपो दोन मैल लांब—”

दादा ओरडतच होता–“रामजी, सखा, अरे, मेलों रे मी––पाणी पाणी–”

त्याची पाण्याबाहेर पडलेल्या माशासारखी तडफड दोघानाहि पहावेना.

“सख्या, दादाला मागें घे. मी गाडी दवाखान्याकडे घेतों. दोघानी मिळून दादाचा धिप्पाड देह कसाबसा मागें घेतला. रामजीनं गाडी स्टार्ट केली. सफाईदारपणें वळवून मागं घेतली नि सिव्हिल हॉस्पिटलच्या रोखानें भरधांव सोडली. वेगाचा काटा सरसर वर चढत होता. दहा तीस, चाळीस पन्नास–हां हां म्हणता गाडी हॉस्पिटलच्या आवारांत थांबली नि रामजीनें मागें वळून पाहिलं तर दादा आणि सखाराम त्याच्याकडे पाहून हंसत होते.

“कां रे दादा, कळ गेली का?” रामजीनं विचारलं.

“हो कळ गेली–” दादा हंसून म्हणाला. “माझ्या छातीतली आणि तुझ्या डोक्यातली.”

“म्हणजे?”रामजीनें आश्चर्यानें विचारलं

“अरे गाढवा, तूं गाडी चालवलीस–नुसती चालवली नाहींस तर पन्नासच्या स्पीडनें हाणलीस”

जनरल मॅनेजरच्या समोर दादा आणि सखाराम खालीं मान घालून उभे होते. मग दादा हळूच म्हणाला “गाडी डेपोवर एक तास उशिरा आणण्याबद्दल माझ्यावर भरलेल्या चार्जशीटच हें उत्तर–साहेब आतां तुम्ही मला हवंतर कसलीहि शिक्षा करा. चार दिवस झाले रामजी व्यवस्थित गाडी चालवतोय्. माझं काम झालय्––”

दादाची सारी हकिगत ऐकून जी. एम्. साहेब खूष झाले होते. ते चटकन् उठून दादाजवळ आले “छे, छे, दादा आम्ही कसली तुम्हाला शिक्षा करणार. तुम्हीं तर देवमाणूस आहात–खरच देवमाणूस आहात!”

●●●

कविता निघाली तिथेंच ती परत उभी रहाते. आणि अनंत पंथाच्या या पांगलेल्या वाटा जिथें मिळतात तेथला आनंदसोहळा पहाण्यांत रमून जातें.

अवघ्या पंथांनीं, उगारल्या झेंड्या,
देऊन गच्यांड्या, दूर केलें
कोणत्याहि मेळीं, असा उणा वाण
निघालों जेथून तेथें उभा
पुढल्या पताका गेल्या विखरून
समजेना कोण कुठें गेलें
पांगलेल्या वाटा जेथें होती गोळा
तेथचा सोहळा पाहूं दे गा !

ऋतुचक्रांत तरुवेलींना जसा नैसर्गिक फुलोरा प्राप्त होतो, त्याप्रमाणे केच्याची कविता स्वाभाविक आहे. त्याच्या कोमल भावपुष्पांतून प्रीतगंधाची उधळण झालेली आहे. त्याची कविता उन्मद आहे. पण उत्तान नाहीं. त्याच्या प्रीतीला सर्व समर्पणाची ओढ आहे. नुसती भक्ति त्यांना पसंत नाहीं. भक्तीमध्यें आदराबरोबर भीतीहि असते. त्यांना प्रियकराबरोबर बरोबरीचें नातें हवें आहे. ते म्हणतात—

तुझ्याच मापाचें मज हें शरीर
भक्तीहून थोर रती व्हावा
आलिंगाया मज येशील जेधवा
झांकूनहि देवा उसळेन
हुंगण्यास तुझ्या अंगींचें फुलोल
माझेंहि जन्मेल नाक तेव्हां
देई असा दिव्य कोमळाचा स्पर्श
ज्यात वीर्यनाश सभवेना

अशा दिव्य कोमल स्पर्शाची त्यांना ओढ आहे कीं, ज्यात वीर्यनाश न होतां वृद्धि होईल. वीर्यनाशानें विरक्ति येईल ती त्याना नको आहे. अखंड रतीसुख अनुभवण्याकरतां त्यांची भावरती सदैव आतुर आहे.

त्यांच्या पार्थिवाला सदैव अपार्थिवाची ओढ आहे. आकाशींचा मल्हाराचा मृदंग ऐकून मातीचा अकुर सदैव आकाशात झेंपावत आहे आणि तो आकाशाला मिठी मारील याबद्दल त्याना खात्री आहे.

मातीमोल जिणे जाईल सरून
बियामध्यें मन ठेवोनिया
मग मल्हाराचा वाजता मृदंग
अकुराचें अंग झेपावेल.
इवली पापटी त्याची चुळबुळ
कवेंत आभाळ घ्यावयाची
तेव्हां न करावी आदळ आपट
त्याचे पटापट मुके घे जो

त्यांना जें आनंदाचें पिसें लागलें आहे तें अनादी अनंत आहे पण तें त्याचें आहे. त्यांना सदैव जाळीत आहे, अनोळखी राख बनून !

धोंडा ना बुडूखा
असें माझें दु:ख
अनोळखी राख
अनोळखी, तरी
वाटे आपलेसें
मज तुझें पिसे

त्यांच्या ह्या वेडांत अद्वैताची ओढ नाही. अद्वैताच्या ठायीं सर्वच सपतें. तें त्यांना नको आहे. त्यांना दु:ख आहे तें दुराव्याचें—

एकपणासाठीं नोहे तळमळ
दु:ख हें केवळ दुराव्याचें
हवें मला जरी भेटण्याचें बळ
मासोळीच जळ होऊं नयें

केच्यांना हवी आहे अमृत झरत्या कोंवळ्या क्षणांतली भेट—

अमृत झरत्या कोंवळ्या क्षणांना
भेटत असतो आपण दोघें

केच्यांची ही भेट खरी आहे. त्यांची तगमग खरी आहे. त्याचा प्रियकर खरा आहे. आणि हें सारें असें आहे म्हणून केच्यांची कविता हें अमूल्य साहित्य आहे. 'काय खरें मग' या कवितेंत केचे सांगतात कीं, मी खोटा असेल तर माझा देवहि खोटाच !

ग्रीष्म ऋतूची जळती माती,
मिथ्या का ही ?
ती खोटी तर खोटा तूही !
खोटें जर हें जळणारें जग,
काय खरें मग ?
तहानलेल्या मातीमधली
खोटी कारे, माझी तगमग ?
वर्षा आतुर नभासारखी
मीलनवेडी, कोसळणारी
खोटी कारे तुझ्यातली रग ?
काय खरें मग ? काय खरें मग ?

केच्याची प्रत्येक कविता हृदयस्पर्शी आहे. थोडक्यांत सागावयाचें झालें तर आमच्या मनातील भावच केचे बोलले आहेत.—

चाललो तयाची वाहून शपथ
पुढचा मी पथ दाखवीन
असें त्यांनीं आम्हाला वचन दिलें आहे.

विज्ञानाच्या युगात देवळें खचलीं तरी अजून भक्तिभाव खचलेले नाहीत असा गजर करीत त्यांची दिंडी पुढें चालली आहे—

रेशमी प्रेमकोशांतील त्यांची कविता नवीन रंगपखांनी रसिकाला मोहित करते. त्यांच्या या सग्रहांत विठ्ठल, पांडुरग या नांवांचा बराच पसारा आहे. केच्यानीं आपल्या ह्या प्रियकराची कक्षा कित्येक ठिकाणीं निश्चितच वाढविली आहे. या कवीची श्रद्धा भक्त प्रीति ही मर्यादित नसून अत्यत व्यापक आहे हें सहज दिसून येतें. त्याच्या कवितेंत आर्द्रता तर आहेच, त्याशिवाय नाविन्यपूर्ण चमत्कृतीहि अनेक ठिकाणी पहावयास मिळेल. केच्याचा विठ्ठल जसा अट्टल आहे तसेच केचे हेहि त्याच्या सहवासांत राहून बनले आहेत. त्यांनीं जो आरोप विठ्ठलावर केला आहे तोच आम्ही त्यांच्यावर करतो. ते म्हणतात.—

मुगीच्या भुकेने खातां मी विठ्ठल
परी तो अट्टल अंग चोरी.

या सग्रहांतील सर्वच कविता आपापल्या परी सुदर अहेत. नावेंच सांगावयाचीं झाल्यास विशेष म्हणून पुढील कविताकडे अंगुलीनिर्देश करतां येईल.

तुझी माझी भेट, परत, ओंभ, देणगी, मीरा, रंग, भूक, अभिसार, वारी, चुळबूळ, गाणें, काळ, गौरव आणि ठेंच.

अभंगांव्यतिरिक्तहि आणखी निरनिराळ्या छंदातील रचना या संग्रहात आहेत. 'झिंग्याभोई" ही एक काव्यकथाहि या संग्रहात उल्लेखनीय आहे.

"साय पाघरून दूध गेले झोपी" अशा सुंदर कल्पनाची पखरण करणारे केचे आपल्या या कवितासग्रहानें रसिकमान्य आणि राजमान्यहि झाले यात नवल नाहीं. मराठी काव्यरसिकानी आता हें मानलें आहे कीं, या नव्या ताऱ्याचें तेज आगळें आहे.

श्रीकृष्ण पोंक्षे

• • •

---

## पुनर्वेचा थेंब

लेखक : प्रा. मधुकर केचे
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
मूल्य रुपये चार

---

## कौटुंबिक हितगुज :

लेखक : श्री. वा. काळे किर्लोस्कर प्रकाशन पुणें २. किं. ३ रुपये.

किर्लोस्कर मासिकांत प्रसिद्ध झालेले हे लेखाक पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें जास्त सोपें झालें आहे. विभक्त कुटुंब पद्धतीमुळें आजकाल प्रत्येक घरीं वडील मडळींचा सल्ला-अनुभवांचें ज्ञान दुर्लभ होऊं लागलें आहे. अशा वेळीं या पुस्तकाच्या मदतीने ससारांतील अडचणीना यशस्वीपणानें तोंड देण्याचं सामर्थ्य आलें तर तें कोणास नको वाटेल ?

'कौटुंबिक हितगुज' वाचतांना नव-विवाहितांपासून आयुष्याच्या उताराला लागलेल्या दांपत्यापर्यंत प्रत्येकाला काही ना काहीं जिव्हाळयाचे मार्गदर्शन लाभेल अशी आशा आहे. आयुष्यातील कडु, गोड प्रसंगांच्या जाळयांतून अलगद सुटका करण्यासाठीं किती कौशल्यानं वागणें जरूर आहे, त्याच्या बारीकसारिक बाबींचा लेखकानें विचार करून त्यांवरील उपाय मानसशास्त्राच्या दृष्टिकोनांतून सांगितले आहेत. त्यामुळेंच ते वाचनीय व उपयुक्त झाले आहेत. वाचकांनीं त्याचा जरुर फायदा घ्यावा.

●●

## दाणे आणि खडे :

ले. श्री. वा. काळे : प्रकाशन : स. कृ. पाध्ये, व्हीनस प्रकाशन, ४१० शनिवार पेठ, पुणें पृष्ठें ११२ किंमत २ रु. ५० न. पै.

कुटुंबांत तसेच समाजांत वावरतांना कडवटपणा टाळण्यासाठीं किती विविध प्रकारची काळजी घ्यावी लागते हें या पुस्तकांत श्री. काळें यांनी सागितलें आहे. सूक्ष्म निरीक्षणामुळेंच इतके आडाखे बांधले जातात. हें पुस्तक वाचून आपलें कोठें चुकतें हें नेमकें समजूं शकेल. त्या दृष्टीनें पुस्तक वाचनीय आहे.

●●

## सम्राट अकबर :

लेखक, प्रकाशक : सय्यद अमीन
किंमत चार रुपये

मोंगल राज्याला साम्राज्याचें स्वरूप ज्यानें प्राप्त करून दिलें त्या बादशहाचें हें चरित्र. राष्ट्रीयत्वाची भावना सर्वप्रथम भूमीपासूनच निर्माण होते. आपला देश, आपले लोक, आपली संस्कृति अशा चढत्या पायरीनें तिचा विकास घडत असतो. मोंगलापूर्वीं अफगाण, पठाण, तुर्क वगैरे लोकांनीं भारतांवर अनेक स्वाऱ्या केल्या. पण इथें कोणीहि स्थाईक झाले नाहीत. समृद्ध भारताची लूट करणें या एकमेव उद्देशानेंच ते इथें आले. मोगलाच्या बाबतीत हीं लुटारू अक्रमकाची वृत्तीच केवळ नव्हती. आपली बायकामुलेंहि ते बरोबर घेऊन आले आणि येथें स्थाईक झाले. अकबराच्या राज्यांत सर्वांना सारखा न्याय, सारख्या सवलती होत्या. हिंदू, मुस्लिम असे दोन पक्ष त्याच्या राज्यात नव्हते. ज्यांच्या अंगीं पुरुषार्थ त्याच्या गुणाचें चीज सारख्याच रीतीनें होत असे. प्रजेच्या सामाजिक आणि सांस्कृतिक उत्कर्षाकडे अकबराचें विशेष लक्ष होतें. मोंगल साम्राज्यास नवीन भूभाग जोडतांना अकबरानें तेथील शास्त्र, संस्कृति नष्ट न करतां ती जशीच्या तशी आपले राज्यांत विलिन करण्याकरतां प्रयत्न केल्याचेंच दिसून येतें. नुसत्या तलवारीच्या जोरावर राज्यशकट चालणार नाही, प्रजेची मनें जिंकलीं तरच तें शक्य आहे याची पूर्ण जाणीव त्याचें ठिकाणीं होती. अशा बहुगुणी सम्राटाचें चरित्र सय्यद अमीन यांनीं मराठींत लिहितांना निःपक्षपाती दृष्टि ठेवली आहे. हें चरित्र वाचतांना त्यांच्या विचारांची विशालताहि सहज नजरेंत भरतें. श्री. अमीन यांची भाषा भारदस्त आणि ओघवती आहे. भल्याला भलें आणि बुऱ्याला बुरें म्हणतांना ती कुठेंहि अडलेली व मागेंपुढें झालेली दिसत नाहीं. विषानें मांडतांना उपलब्ध साहित्याचें त्यांनीं दिलेले आधार पाहिले म्हणजे या चरित्राच्या शुद्धतेच्या दृष्टीनें त्यांनी घेतलेल्या परिश्रमाची कल्पना येईल. हें चरित्र जितकें उद्बोधक तितकेंच रंजक आहे.

श्रीकृष्ण पोंक्षे.

●●

## भारतरत्न टण्डनजी—व्यक्ति और कार्य

ले. रंजन परमार : शैलजा प्रकाशन, ४१ बुधवार पेठ पुणें १. किंमत—दीड रुपाया.

भारतरत्न टंडनजींचं व्यक्तिमत्व सर्वांगानं कसं होतं हें या चरित्रांत सविस्तर पहावयास मिळतें. हें संपूर्ण चरित्र हिंदींतून लिहिलेलें आहे. श्री. टंडनजींचा स्वभाव, त्यांची दिनचर्या, त्यांच्या निःस्पृहपणाचे, सत्यप्रियतेचे अनेक प्रसंग लेखकानें विस्तृतपणें सांगितलें आहेत. प्रयाग नगरपालिकेच्या चेअरमनपदापासून तों कॉंग्रेसचे अध्यक्षपदापर्यंत त्यांनीं केलेल्या कामाचं दिग्दर्शन माहितीपूर्ण आहे. लेखकाचा श्री. टंडनजीं बद्दलचा अभिमान जागोजाग पहायला मिळतो. सरळ सोप्या हिंदीतलें हें पुस्तक शेवटपर्यंत वाचनीय असें आहे.

●●●

( नाटकाचीं तिकीटें......पान १७ वरून )

"आणि आतां त्याला तुम्ही चांगलं म्हणतां?—"

"अरं, त्याला नुसतं चांगला म्हणतों असं नाहीं तर त्याला पोरासारखा सभळणार आहे मी. त्याच्या अंगाला कुणीं हात लावला तर खुव्यांतनं हातच उपटून काढीन त्याचा मी—"

"आवं दादा, हें सगळं खरं पण इतकं पारडं फिरलं तरी कसं ?—कांहीं जादू तर केली नाहीं त्यानं तुमच्यावर ?—"

दादा म्हणाले, "जादू केली पण चांगली केली. तुम्हांला सांगितलं तर नवल वाटेल. पण दारूचा धदा मोडून काढीन म्हणून मला दम देणारा फौजदार माझ्या पोराला माया लावीत होता. अभ्यास कसा करावा, कुठं करावं, कोणत्या क्लासला जावं हें तो त्याला सागत होता. आणि त्याच्या मनावर वाईट परिणाम होऊं नये म्हणून धाड घालायच्या दिवशीं माझ्या पोराला नाटकाची तिकिटें देऊन घराबाहेर ठेवत होता. त्याला सारखं सांगत होता—बापासारखा तूहि या धंद्यांत पडू नकोस. आतां तुम्हींच सांगा. फौजदार म्हणून मला त्यानें भीति दाखवली त्याचा कशाला मी राग धरूं ?—त्याचं काम त्याला केलंच पाहिजे. मला पण माझं काम केलं पाहिजे. तो जर माझ्या पोराला पोरासारखी माया लावतोय् तर मलासुद्धां त्याच्यावर पोरासारखी माया केलीच पाहिजे. काहीं झालं तरी माने फौजदार पोरगच आहे. दूरच्या गांवाहून आलय्. म्हणून तर त्याची काळजी बापासारखी मला घेतली पाहिजे—"

●●●

# रणावीण स्वातंत्र्य जेव्हां मिळालें

( पृष्ठ ४ वरून चालू )

"प्रिय लॉर्ड माउटबॅटन,

माझें नुकतेंच गियानी कर्तारसिंग याचेशी जें संभाषण झालें त्याचें इतिवृत्त तुम्हांला कळणें अगत्याचें आहे. गियानी यांनीं शिखाचे पुढील बेत काय आहेत ते स्पष्टपणें सांगितले. त्यांनीं जें सांगितलें त्यावरून माझी अशी खात्री पटली आहे कीं, जर बाउंडरी कमिशनचा निर्णय त्यांच्या मनासारखा लागला नाहीं किंवा हा निर्णय जाहीर होण्यापूर्वीच भारत व पाकिस्तान हीं राष्ट्रें आस्तित्त्वांत आलीं तर पंजाबांत दंगल करण्याचा त्याचा विचार आहे."

याच पत्रासमवेत अत्यंत गुप्त म्हणून जें निवेदन सर जेन्‌किन्स यांनीं जोडलेलें आहे, त्यांत ते सांगतात–

"गियानी कर्तारसिंगांनीं स्पष्टपणें विचारलें, कीं पंजाबांत लोकसंख्येची अदलाबदल मोठ्या प्रमाणांत करावी लागेल. ब्रिटिश सरकारची याला तयारी आहे काय ? जर तयारी नसेल तर पंजाबात यादवी अटळ आहे. यावर मीं त्यांना सांगितलें कीं, दंगल करणें हें मूर्खपणाचें होईल. तेव्हां गियानींनीं सांगितलें कीं, जर उद्यां इंग्लंडवर परकीयांचें प्रत्यक्ष आक्रमण झालें तर मला जें वाटेल तेंच पजाबच्या फाळणीचें आज शिखांना वाटत आहे. शिखांच्या संबंधांत आज मुसलमान जरा नरमाईने बोलतात. परंतु पंजाबांतून हिंदूची हाकलपट्टी झाल्यावर ते शिखांकडे वळल्याखेरीज रहाणार नाहीत. गियांनींनीं शेवटीं सांगितलें कीं, जर सरहद्दीचा प्रश्न नीट सुटला नाहीं तर पजाबांत रक्ताचे आणि अश्रूंचे पाट वहातील. हे सांगतांना गियानी कर्तारसिंगांच्या डोळ्यांत अश्रू आले. शिखांची त्रास देण्याची शक्ति कमी लेखून चालणार नाहीं."

सर जेन्‌किन्स यांनीं पुन: १३ जुलैला माउंटबॅटन यांना पत्र लिहून विनंती केली कीं, कांहींहि करून रॅडक्लिफ रिपोर्ट १५ ऑगस्टपूर्वी प्रसिद्ध करा म्हणजे तूर्त उडालेली बजबजपुरी कमी होईल.

अखेर २० जुलैला माउंट बॅटन स्वतः लाहोरला गेले. त्यानीं सर जेन्‌किन्स व पजाबच्या विभाजन-मंडळाशी बोलणीं केलीं. दिल्लीला परतताक्षणीच त्यांनीं सर ऑचिनलेक–जन्माला येणाऱ्या भारत व पाकिस्तान या देशांच्या सैन्यांचे सुप्रिम कमांडर–यांच्याशीं बोलणीं करून "पंजाब बाउंडरी फोर्स" (पजाब सीमा सैन्य–विभाग) पंजाबमधील शांतता राखण्यासाठीं पंजाबांत ठेवण्याचें निश्चित केलें. एक ऑगस्टला हा सैन्य–विभाग निर्माण करण्यांत आला. त्यांत पन्नास हजार सैनिक होते. बरेचसे वरिष्ठाधिकारी ब्रिटिश होते. केवळ शांतता राखण्यासाठीं एवढें मोठें सैन्य कुणीं क्वचितच एकत्र केलें असेल.

पटेल, राजेंद्रप्रसाद, जीना, लियाकत व बलदेवसिंग यांच्या सह्यानिशी शांततेला आवाहन करणारें पत्रक माउंट बॅटन यानीं काढवलें. त्यांत खालील गोष्टी नमूद आहेत—

"सत्तादानानंतर कॉंग्रेस व मुस्लीमलीग याच्या वतीनें सर्व अल्पसंख्याकाना असें आश्वासन देण्यांत येत आहे की, त्याना दोन्ही देशात समान व औदार्याची वागणूक दिली जाईल. जात, धर्म, या गोष्टी विचारांत न घेतां सर्वांना योग्य संरक्षण मिळेल."

"या आश्वासनाचा अर्थ असा आहे की, दोन्ही देशांची सरकारें काय वाटेल तें झालें तरी आपआपल्या प्रदेशांत दंगली चालू देणार नाहीत–"

"पंजाबांत शांतता रहावी म्हणून दोन्ही सरकारानी एक ऑगस्टला पुढील जिल्हे लष्करी अधिकाऱ्याच्या ताब्यात ठेवण्यास मान्यता दिली आहे.

"सिल्हट, गुजरानवाला, शेखपुरा, लैलापूर, माँटगोमेरी, लाहोर, अमृतसर, गुरुदासपूर, होशीयारपूर, जालदर, फेरोजपूर आणि लुधियाना. मेजर जनरल रीझ हे या सैन्याचे अधिपत्य करतील. आणि त्यांना सल्लामसलतीसाठीं भारताच्यावतीनें ब्रिगेडिअर दिगबरसिंग व पाकिस्तानच्या वतीनें कर्नल अयुबखान (सध्याचे पाकिस्तानचे अध्यक्ष) यांची नेमणूक केली. आहे. जर आवश्यकता वाटली तर बंगालमध्येंहि अशीच योजना करण्याचा दोन्ही सरकारांचा विचार आहे–"

मोस्ले या घटनेसबंधी लिहितो–

"If ever there was confidence misplaced, this was the occasion. Rarely had a military force of such strength worked so hard or fought so bravely to achieve so little. ......... from this moment on, the history of the transfer of power to India is one of over-confidence, half thought-out enthusiasms, blunders, stupidities, carelessness and mistake after mistake."

**(हें पत्रक म्हणजे भलत्याच गोष्टींवर भरवंसा टाकण्याचा एक प्रकार ठरला. एवढ्या मोठ्या सैन्यानें जिवापाड श्रम करून आणि शौर्यानें लढा देऊन अगदीं क्षुल्लक यश मिळविल्याचें दुसरें उदाहरण क्वचित्‌ सांपडेल......या क्षणापासून हिंदुस्थानांतील सत्तादानाचा इतिहास हा–चुकीच्या विश्वासाचा, अर्धवटपणाचा, मूर्खपणाचा, निष्काळजीपणाचा आणि एका मागन एक केलेल्या चुकांचाच इतिहास आहे.)**

यावेळी व्ही. पी. मेनन यांनी अशी सूचना केली होती कीं, लाहोरपासून वीस मैलांवरील नानकसाहेबांचें जें मोठें शीख पूजास्थान आहे तें पाकितानांत गेलें तरी त्याचें महत्त्व 'व्हॅटिकन' प्रमाणे राखलें जाईल असें जाहीर आश्वासन जीना याचेकडून माउंटबॅटन यानीं मिळवावें. वस्तुतः या नानकसाहेबाच्या पूजास्थानाकरतां रक्तपात करण्याची भाषा शीख बोलत आहेत असा २७ जुलैचा रिपोर्ट व्हाईसरॉयना मिळाला असताना, मेनन यांची ही सूचना दुर्लक्षिलीच गेली.

परंतु माउंट बॅटन यानीं कांहींच हालचाल केली नाहीं. बहुधां आतां खासगीरीत्या कसलीहि आश्वासनें देण्या–घेण्याच्या मनःस्थितीत पटेल व जीना नव्हते.

पंजाबांत जातीय दंगल पसरूं लागली होती. मार्चमध्ये रावळपींडीला मुसलमानांनीं जवळजवळ दोन हजार शिखांची कत्तल उडवली होती. त्या गोष्टीचा बदला शिल्लक होता.

"तारासिंगांना पंजाबांत शिखिस्तान हवें होतें. अमृतसरच्या सुवर्णमंदिरांतून त्यानी या बदल्याची उघड चिथावणी दिली." असा मोस्ले यानी आरोप केलेला आहे.

पांच ऑगस्टला माउंट बॅटन यानी (Partion Council) विभाजन समितींच्या बैठकीत पंजाबातून हातीं आलेल्या गुप्त परिपत्रकांना वाचा फोडली. या पत्रकांन्वयें कालव्यांची नासधूस करून पश्चिम पंजाबचें पाणी तोडावयाचें; पूर्व पंजाबांतून मुसलमानांना हुसकावयाचें व जीना याचा १४ ऑगस्ट १९४७ च्या समारंभांत खून करावयाचा अशा तऱ्हेचीं कारस्थानें शिजत असल्याचें उघड होत होते.

मोस्ले सांगतो–

"जिना व लियाकत अल्लींनीं तावडतोब तारासिंगांच्या अटकेची मागणी केली. परंतु सरदार पटेलांनीं या गोष्टीला संमति नाकारली. त्यांचें म्हणणे, कीं, तारासिंगांच्या अटकेमुळें शीख अधिकच खवळण्याचा संभव आहे–"

"सर ईव्हॅन जेनकिन्स यानीं माउंट बॅटनना सल्ला दिला कीं–आज आपल्या अधिकारांत आपण या थेरड्या हरामखोराला– (The old rascal) पकडले आणि १५ ऑगस्टला त्याला नव्या सरकारनें पुनः सोडलें म्हणजे आपली काय पत राहिली?"

यापुढच्या घटना मोस्ले याच्या शब्दात सांगणेंच इष्ट आहे–

"आतां पंजाबांत काहीं करण्यास वेळ उरला नव्हता. ६ ऑगस्ट १९४७ ला दिल्लीच्या लाल किल्ल्यांत भारतीय सैन्याच्या वतीनें पाकिस्तानांत निघालेल्या सैन्याधिकाऱ्यांना थाटाचा निरोप देण्यांत आला. नव्या भारताचे सरसेनापति जनरल करीअप्पा यांनीं भाषण करून यापुढेंहि दोन्हीं सैन्यें एकमेकांची मित्र रहातील असा आशावाद प्रगट केला आणि ब्रिगेडियर रेझा यानी पाकिस्तानच्या वतीनें या भावनेला दुजोरा दिला."

"या निरोपसमारंभानंतर तीन दिवसांनीं या समारंभाला हजर असलेले चार पाकिस्तानी लष्करी अधिकारी ज्या गाडीनें पाकिस्तानाकडे निघाले होते त्या गाडीवर शिखांनी हल्ला चढविला व त्यांत ते मारले गेले. या चार व्यक्तीरिक्त सुमारें दीडशे पाकिस्तानी अधिकारी, आपल्या बायकामुलांसमवेत या हल्ल्यांत यमसदनाला धाडण्यांत आलें—"

## जीना निघाले ! सरदार बोलले !

"दि. ७ ऑगस्टला जीना विमानानें कराचीला जाण्यास निघाले. माउंट बॅटन यांनीं आपलें खासगी डाकोटा विमान या प्रवासासाठीं जीना याना दिलें. एक रोल्सराईस गाडी खास भेट म्हणून त्यांना नजर करण्यांत आली व आपला मुसलमान ए. डी. सी. लेफ्टनंट अट्सन याला त्यांनीं जीनाच्या नोकरींत सुपूर्त केलें. निरोप देण्यासाठीं स्वतः माउट बॅटन विमानतळावर हजर होते—"

"विमानतळ सोडण्यापूर्वी महंमदअली जीना यांनीं हिंदु व मुसलमानांना झालें गेलें विसरून जाण्याचा उपदेश केला आणि भारताला यश व उत्कर्ष लाभो असा आशावाद प्रगट केला."

आठ ऑगस्टला पटेलांनीं दिल्लींत जें सांगितलें त्यामुळें जीनांच्या या शुभेच्छांवर बोळा फिरला. सरदार म्हणाले—

"The poison has been removed from the body of India. We are now one and indivisible. You cannot divide the sea or the water of the river. As for the Muslims, they have their roots, their sacred places and their centres here. I do not know what they can possibly do in Pakistan! It will not be long before they return to us."

(भारताच्या शरीरांतील वीष आतां बाहेर निघून गेलें आहे. आतां आपण एक आहोंत व अविभ फाटाफूट आतां संभवत नाही. कारण समुद्राचें किंवा नदीच्या पाण्याचें तुम्ही विभाजन करूं शकत नाहीं. मुसलमानासंबंधीं बोलायचें तर त्यांचीं श्रद्धास्थानें, पूजास्थानें, मानबिंदु हें सर्व भारतांतच आहेत. पाकिस्तानांत जाऊन तें काय करणार हें त्याचें त्याना ठाऊक, नजिकच्याच काळांत तें आपल्यांत परत येतील—!")

"हें सर्व घडत असतांना पंजाबांत परिस्थिति चिघळतच होती. गांधीचे यत्नहि फुकट गेले होते. पूर्वेकडील मुसलमान आणि पश्चिम पंजाबकडील हिंदु शीख कुटुंबें आपलीं घरेंदारें सोडून सुरक्षित गांवांकडे धांवत होतीं. गाधीजींनीं विनंति केली कीं— "पळापळ करूं नका. जियें असाल तियेंच रहा."

"लाहोरमधील हिंदूंना त्यांनीं सांगितलें— "

"When something they love is dying people do not run away but die with it, when you suffer from fears you die before death comes to you. This is not glorius."

(ज्या गोष्टीवर आपला जीव असतो त्या गोष्टी जेव्हां नाश पावत असतात तेव्हां त्यांच्यापासून पळून न जातां त्या नाशाबरोबर आपणहि जीवन संपवलें पाहिजे. जेव्हां भीति माणसाला ग्रासते तेव्हां प्रत्यक्ष मरण येण्यापूर्वीच तो माणूस मेलेला असतो. अशा मरणांत सौभाग्य नाहीं—!)

परंतु प्रत्यक्ष दंगलीच्या ज्वाळा ज्यांना चटके देत होत्या त्यांना ही भाषा कानांवर आली तरी डोक्यांत शिरणें कठीण होतें. कंटाळून गाधीजींनीच पंजाबांतून काढतां पाय घेतला. गांधी, नेहरू, पटेल, जीना, व्हॉईसरॉय यांपैकीं कुणीतरी पंजाबांत घट्ट पाय पाय रोवून येणाऱ्या काळ्या संकटाशीं मुकाबला करावयास हवा होता. फक्त लष्करी उपाय अपुरे पडतील ही गोष्ट काय यांना समजत नव्हती?

## एका माणसाची सरहद्द सेना

कलकत्ता मात्र यावेळीं शांत होतें. कारण गांधीजी तेथें आपलें सर्वस्व पणाला लावून ठाम उभे होते. पंजाबांत प्रचंड सेना जें साधूं शकत नव्हती तें बंगालांत एक सैनिक साधत होता. मोस्ले या अहिंसेच्या सैनिकाला– One man boundary force (एका माणसाची सरहद्द सेना) असें संबोधतो.

गाधीजीचा मूळ विचार १५ ऑगस्टला नोखालीत रहाण्याचा होता. गांधीजींच्या दृष्टीनें स्वातंत्र्योत्सवाला अवसर नव्हता. नोखालींत हजारों माणसें अश्रू गाळीत होती ते कोण पुसणार?

बंगालचे गव्हर्नर सर फ्रेडरिक बरोज व इतर काहीं मुसलमान पुढारी यांनीं गांधीजीची गांठ घेऊन त्यांना कलकत्त्यांतच थांबण्याचा



खेळ राजकारण्यांचा ! जीव जनतेचा ! पंजाबांतील प्रचंड हत्येचा एक मासला.

आग्रह चालवला होता. गांधीजी कलकत्त्यांत राहिले तर कलकत्ता शांत राहील व ज्या दिवशीं आपली कारकीर्द संपणार त्या दिवशीं रक्तपात होणार नाहीं असा सर फ्रेडरिक बरोज यांचा गांधींना होणाऱ्या आग्रहांत हेतु होता.

परंतु मुसलमानानाहि गांधी हवे होते कां ?

याचें उत्तर मोस्ले देतो–

" कलकत्त्यांतून सुरावर्दींची राजवट संपत होती. कांग्रेसची राजवट आल्यास गेल्या वर्षी मुसलमानांनीं जे अत्याचार केले त्याचा बदला घेण्याचा विचार हिंदू लोकांत वावरत असणें शक्य होतें. या पापाला मुसलमान भीत होते. म्हणून ते गांधीजींना आळवत होते कीं, तुम्ही इथें रहा ! "

गांधीजींनी मुसलमानांनीं अट घातली–

" नोआखलींत शांतता राहील याची हमी देत असाल तर मी कलकत्त्यांत रहातो. जर नोआखलींत हिंदूंना त्रास झाला तर मला उपोषण करून प्राण समर्पित करणें भाग पडेल– "

जमलेल्या व भेटायला आलेल्या मुसलमान पुढाऱ्यांत चर्चा सुरू झाली. त्यांनीं नोआखलींत आपले खास दूत पाठवले. निरोप दिला–– कुणाला ? ज्यानें नोआखलीच्या हत्याकांडांत असंख्य हिंदु बायकांची अब्रू घेतली आणि अर्भकांचे प्राण घेतले. त्या मियाँ गुलाम सरवारला! निरोप काय ? तर नोआखलींत शांतता राखीन असें अश्वासन दे; म्हणजे गांधीजी कलकत्त्यांत रहातील आणि आमचे प्राण शाबूत रहातील."

मोस्ले यांचें हें निवेदन वाचतांना मनांत मात्र प्रश्न येतो––अखेर कलकत्त्यांतील गांधीचें यश याच जातीचें होतें कां ? तिकडच्या हिंदूंना त्रास दिलांत तर इकडे मुसलमान हकनाक मरतील या भीति-पोटीं बंगालांत शांतता होती ना ? मग हा विजय असलाच तर बदला घेणाऱ्या प्रवृत्तीचा नाहीं कां ?

## सुरावर्दी वांचले


जीनांच्या दृष्टीनें सुरवर्दींचा उपयोग आतां संपला होता. बंगालच्या हत्याकांडांत सुरावर्दींचा वांटा मोठा होता. या हत्याकांडामुळेंच पाकिस्तान मिळविण्यांत जीनांना यश लाभलें. यामुळें अर्थातच सुरावर्दी नाकापेक्षां मोती जड होणें शक्य आहे. ही गोष्ट जीनांनीं ओळखली व पूर्व पाकिस्तानचे गव्हर्नर म्हणून त्यांनीं सुरावर्दींचे विरोधक ख्वाजा नासिमुद्दीन यांची नेमणूक केली.

सुरावर्दी आतां बेकार होते. बंगालची मुख्यप्रधानकी संपली होती. रस्त्यांत एकटा हातीं लागला असता तर लोकांनी ठेंचून मारला असतां एवढीच पत शिल्लक होती. परंतु त्याला आधार दिसला–

सुरावर्दींनीं महात्माजींच्या पायांवर लोळण घेतली. अगदीं घालीन लोटांगण वंदीन चरण– सैतान धर्म सांगू लागला.

मोस्ले सांगतो– " गांधीजी सुरावर्दींची जात ओळखून होते. त्यांनीं त्याला अट घातली कीं, सुरावर्दींनीं कलकत्त्यांत गांधीजींच्या जवळ राहिलें पाहिजे– "

आंधळा मागतो एक डोळा आणि देव देई दोन. सुरावर्दींना तेंच हवें होतें. कलकत्त्यांतील गलिच्छ दलित वस्तींत (slums) वेलियाघाट या भागांत 'हैदरी मॅन्शन' या मुसलमान मालक पळून गेल्यामुळें रिकाम्या पडलेल्या घरांत गांधीजींनीं रहाण्याचें ठरवलें. गांधीजींच्या बरोबर सुरावर्दी रहाणार आहेत ही बातमी जाहीर होतांच हिंदूंचा बराच मोठा जमाव हैदरी मॅन्शनभोंवतीं गोळा झाला होता. मोस्ले लिहितो–



मुसलमानांची दिल्लींतून हकालपट्टी– छोडो भारत ! गाड्या भरभरून निर्वासित दोन्हीकडून येत–जात होते ! मारले जात होते !

" या जमावांतून आरोळ्या उठत होत्या– मुसलमानांच्या रक्षणाला इथें कां रहातां–? नौखालींत जा–! इतक्यांत सुरावर्दी येऊन पोंचले. गर्दीत वाट काढीत हैदरी मॅन्शनकडे जात असतांना जमावांतून हैवान–डुक्कर–चोर अशा शिव्यांची लाखोली त्यांना मिळत होती. ' सुरावर्दीना फांशी द्या ' अशी मागणीहि जमाव मध्येंच करीत होता. सुरावर्दी व इतर मुसलमान मंडळींना गांधीजींनीं हैदरी मॅन्शनमध्यें नेलें, आणि जमाव क्षुब्ध होत होता. खिडक्यांवर दगडविटांचा मारा सुरूं झाला."

" सुरावर्दी बाहेर या–" असा गिल्ला सुरूं होता. त्या दिवशीं गांधीजींनीं सुरावर्दीना बाहेर खिडकीशीं जाऊं दिलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं पुनः तोच प्रकार सुरूं झाला तेव्हां गांधीजी सुरावर्दीसह खिडकींत आले. गांधीजींचा हात सुरावर्दीच्या खांद्यावर होता. सुरावर्दीनीं भाषण सुरूं केलें–

" बंगालचें हें भाग्य आहे, कीं आज गांधीजी आपल्यांत आहेत. याचें महत्त्व जाणून आपण सर्वजण संयमानें वागणार नाहीं काय ?"

जमावांतील एकजण ओरडला–

" कलकत्त्यांतील हत्याकांडाला तुम्ही जबाबदार आहांत–"

सुरावर्दी उत्तरले– " होय आपण सर्वच आहोंत–"

जमावानें विचारलें– " प्रश्नाचें सरळ उत्तर द्या–"

सुरावर्दी म्हणाले,

" हो. ती सर्वस्वी माझी जबाबदारी होती–"

परंतु गांधीजींच्या प्रभावामुळें जमाव शांत राहिला.

यानंतर पांच हजार हिंदु–मुसलमानांची कलकत्त्यांत बेलियाघाट भागांतून मिरवणुक निघाली. मिरवणूकींत घोषणा होत होती–

" हिंदू-मुस्लीम ऐक्याचा विजय असो–! हिंदू-मुस्लीम भाई भाई– !"

मोस्ले गांधीजी-सुरावर्दी या दुकलीचें वर्णन लॉरेल–हर्डी असें करतो. या दुकलीने बंगालमधील धोका टाळला अशी माउंट बॅटननीं प्रशस्ती केली.

## जीनांचा माउंटबॅटनवर आरोप

माउंटबॅटन यांच्या खिशांत नऊ ऑगस्टपासून रेडक्लिफ अॅवार्ड होतें. या इतिवृत्तांतील निर्णय अत्यंत प्रक्षोभक होते.

(१) चितागाँगच्या टेकड्या पाकिस्तानांत गेल्या होत्या.

(२) शिखांच्या श्रद्धांतून जें जोपासलें वाढलें तें लाहोर शहर पाकिस्तानांत गेलें होतें.

(३) परंतु गुरुदासपूर जिल्हा जरी तिथें मुसलमान बहुसंख्य असलें तरी भारतांत समाविष्ट करण्यांत आलेला होता. गुरुदासपूरचें महत्त्व फार मोठें होतें. काश्मिरशी खुश्कीचा व रेल्वे मार्ग भारताला याच जिल्ह्यांतून उपलब्ध होता व त्यामुळें पाकिस्तानचें काश्मिरशीं दळणवळण कायमचें तुटणार होतें.

हा रेडक्लिक रिपोर्ट १५ ऑगस्टपूर्वी प्रसिद्ध केला तर स्वातंत्र्योत्सवाला त्यांतून निर्माण होणाऱ्या प्रक्षोभानें न्यूनता येईल. या भीतीपोटीं हा रिपोर्ट १५ ऑगस्टनंतर प्रसिद्ध करण्याचें माउंट बॅटन यांनीं ठरवलें.

याविषयीं मोस्ले कडक टीका करून सांगतो–

" Independence day was happy. but millions of people died or lost everything as a result "

"स्वातंत्र्याचा दिवस सुखांत गेला. परंतु याचा परिणाम म्हणून लाखों लोक मारले गेले आणि त्याचें सर्वस्व नाहीसें झालें."

पुढें जीना यांनी असा आरोप केला, कीं दि. ९ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट या काळात माउट बॅटन यानी सर रेडक्लिफ याचेवर दडपण आणून फेरोजपूर, झिरा व गुरुदासपूर भारताला द्यावयास लावले.

या आरोपाचें मोस्ले खडन करतो व लिहितो—

"पुष्कळ सशोधनानतर लेखकाला एका गोष्टीबद्दल मुळींच संशय नाहीं कीं, रेडक्लिफ अॅवार्ड जाहीर न करण्याची चूक जरी कदाचित् माउट बॅटननी केलेली असली तरी त्यानी पाकिस्तान-विरुद्ध या काळांत काही कट केला असें म्हणायला अजिबात वाव नाहीं. जीनांनी गव्हर्नर जनरलकीबाबत माउंट बॅटन याचा जो अधिक्षेप केला. त्याचा सूड म्हणून या रेडक्लिफ रिपोर्टांत माउंट-बॅटन यांनी ढवळाढवळ केली असें पाकिस्तान्यांनीं नंतर म्हणणें म्हणजे माउंट बॅटन याच्या चारित्र्यावर निष्कारण शितोडे उडवण्यासारखें आहे"—

●●

## सैन्य बेभरवंशाचें ठरलें

दहाव्या प्रकरणाला. श्री. मोस्ले यांनी Two cheers for Britain असा मार्मिक मथळा दिला आहे. इंग्लडला या प्रकरणात सगळे मार्क देण्यांत न्याय नाही म्हणून तो Three cheers म्हणत नाहीं. १४–१५ऑगस्ट हे दोन दिवस कराची, दिल्ली येथें सोहळयाच्या गडबडीत जात असतां पंजाबांत काय घडत होतें ? मोस्ले सांगतो—

"१४ ऑगस्टचा कराचींतील समारंभ आटपून पाकिस्तानचे सुप्रीम कमांडर फिल्ड मार्शल ऑकिनूलेक यांचें विमान दिल्लीला परततांना वाटेंत लाहोरला थावलें. विमान खाली उतरत असताना त्यांना वरून काय दिसलें–? खेडयापाडयातून आगी लागलेल्या होत्या. व त्याचा धूर वर उठत होता. धुळवडीच्या रस्त्यावरून अगणित निर्वासितांच्या रांगा पूर्वेकडे धांवत होत्या.

परंतु खरी मोठी पळापळ अजून सुरूं झालेली नव्हती. रेडक्लिफ अॅवार्ड जाहीर होईपर्यंत–आपलें खेडें वा शहर पाकिस्तानांत जाईलच कशावरून या आशेनें बरेचसे हिंदु, शीख पश्चिम पंजाबांतच राहिले होते. त्याचे पुढारी परिस्थितीचा नीट अदाज नसताना त्यांना "पळूं नका" असा उपदेश करीत होते. अमृतसरमध्यें मुसलमानांचीं दुकानें ज्या भागांत होती तो भाग भस्मसात झाला होता.

लाहोरच्या विमानतळावर ऑकिनलेक, जनरल रीझ, आणि गव्हर्नर ईव्हॅन जेन्किन्स याची बोलणीं झालीं. ही बोलणी ज्या वेळीं चालू होतीं तेव्हाच लाहोरच्या रेल्वे स्टेशनवर तिकिटासाठीं क्यू लावलेल्या शीख निर्वासितांपैकीं डझनवारी शीखांचे मुसलमानानी मुडदे पाडले. पोलिस दूर उभे राहून शांतपणें झाला प्रकार पहात होते. जेन्किन्स-ऑकिनलेक यांना कबुली देत होते की, पोलिसांवर विश्वास राहिलेला नाही. त्यांनाहृ जातीयवादानें घेरलें आहे. लष्करी कायदा पुकारायचा म्हटला तरी पुरेसे निःक्षपाती लष्करी अधिकारी उपलब्ध नव्हते. या बैठकीनंतर २४ तासात गव्हर्नर जेन्किन्स आपल्या जागेचा चार्ज सोडून लंडनला परत जाणार होते. जनरल रीझ् यांनीहि सैन्याबाबत हीच कहाणी सांगितली. ज्या पंजाब सरहद्द सेनेवर विश्वास टाकून माउंट बॅटन आणि इतर पुढारी गैरसावध राहिले त्याच सेनेनें विश्वासघात केला होता. या सैन्यातील मुसलमानांना जेव्हां शीख विभागांत मुसलमानांवरील अत्याचार पहावे. लागले तेव्हां हिंदू शीखांना वांचवण्याचा त्यांचा उत्साहच सरला. आणि या साऱ्या गोंधळात भर म्हणून ब्रिटिश अधिकारी लवकर घरीं जाण्याच्या कल्पनेमुळें मन लावून काम करीत नव्हते.

या सैन्यांत त्यावेळीं जे दोन अधिकारी म्हणून होते ते फील्डमार्शल अयुबखान आणि जनरल थिमय्या. यांनी पुढें असे स्पष्टपणें मत दिलें कीं, ब्रिटिश अधिकाऱ्याची या काळातील अवस्था खरोखरच शोचनीय होती.

जनरल रीझनें आपल्या अहवालात लिहिलें आहे–" शीखांनी मुसलमानाना ठार मारण्यासाठी जथे तयार केले होते. एका जथ्यांत सुमारें वीस–तिसापासून तो पांचशेंपर्यंत शीख असत. त्याचे नेते ठरवलेले होते. त्यांचीं ठाण्याची ठिकाणें सारखीं बदलतीं असत. निर्वासिताचा एखादा लोंढा निघाला आहे किंवा एखादी गाडी निर्वासितानीं भरून पाकिस्तानकडे जात आहे अशी बातमी मिळाली कीं, त्याचें काम सुरू होई. चालत निघालेले निर्वासित शेतांच्या बांधावरून ओळीनें जाऊ लागले कीं, पिकांत लपून बसलेला जथा त्यांच्यावर तुटून पडे. निर्वासितात स्त्रिया व मुलें असल्यामुळें त्यांची संख्या कितीहि मोठी असली तरी पळापळ व गोंधळ सुरुं होई. भाले व तरवारी याचा सढळ उपयोग केला जाई. या निर्वासितांबरोबर लष्करी वा पोलीस सरक्षण असे परंतु तें नेहमीच अपुरें असें.

दगलीच्या सुरुवातीच्या काळांत मुसलमान मोठ्या प्रमाणांत मारले गेले. परंतु अखेर शीखाना याची जबर किंमत द्यावी लागली. प्रत्येक मारलेल्या मुसलमानागणिक शीखांचें आयुष्य पश्चिम पंजाबात धोक्यांत येत होतें, आणि पश्चिम पंजाबातच शीख अधिक होते गुजराणवाला या लाहोरच्या उत्तरेकडील भागांत शेंकडों शीखांना ठार मारून मुसलमानाच्या प्रतिहल्याला सुरुवात झाली.

लेफ्टनंट कर्नल मिचिसन ( Mitchison ) हे एका निर्वासितांच्या लोंढ्याबरोबर संरक्षणासाठीं होते. त्यांनीं लिहिलेली एक हकिगत या दिवसांत काय घडत होते याची कल्पना येण्यास पुरेशी आहे. ते लिहितात—

"जवळ जवळ एक लाख मुसलमान निर्वासित बियासपासून लाहोरकडे निघाले होते. अमृतसर मधून हा मार्ग जातो. जवळ जवळ पन्नास मैलाच्या प्रवासात ४०० ते ६०० निर्वासित ठार मारण्यात आले. एक हल्ला झाला तेव्हां मी जवळच होतों. जवळच्या पिकांतून अचानक हा हल्ला झाला. कांहीं मिनिटाच्या आंत पन्नास पुरुष, स्त्रिया व मुलें यांचे तुकडे उडवण्यांत आले व जवळ जवळ तीस जखमी निर्वासित जखमा वहात असतांना जीव घेऊन आमचेकडे पळत येताना मी पाहिलें–"

प्रत्यक माणसाला एक गोष्ट माहीत होती कीं, जर जीना व नेहरू स्वतः पंजाबांत येतील तरच या भयानक हत्याकांडाला पायबद बसेल. माउंट बॅटन यांना याबाबत कांही हालचाल करतां आली असती. त्यांच्या हें लक्षात आले असलें पाहिजे, कीं, 'प्रत्येक हिंदु, मुसलमान शीख माणसाचें सरक्षण मी करीन' अशी जी हमी त्यानी मौलाना आझाद यांना दिली होती त्याला आतां फारसा अर्थ उरलेला नव्हता.

परंतु जीना कराचीत, नेहरू दिल्लींत व माउंट बॅटन दोन्हीकडे सोहळयांत गुंतलेले होते,

१३ ऑगस्टला पाकिस्तानच्या जन्मसोहळयांत भाग घेण्यासाठीं व्हाईसरॉय कराचीला आले. मिरवणुकीत जीना यांचेवर कदाचित

बॉम्ब फेंकण्यांत येईल अशी गुप्त पोलिसखात्याची बातमी असल्यामुळें स्वतः व्हाईसरॉय शाही मिरवणुकींत जीनांच्या शेजारीं बसले.

यावेळीं कायदे आझमांनीं माउंट बॅटनच्या ए. डी. सी. जवळ उद्गार काढले. ते मोस्ले यानें उधृत केले आहेत.

" I never thought it would happen- I never expected to see Pakistan in my life time "

(मला वाटलें नव्हतें कीं, हें सर्व घडेल. माझ्या आयुष्यांत पाकिस्तान झालेलें पाहीन अशी माझी अपेक्षा नव्हती.)

माउंट बॅटन यांनीं १५ ऑगस्टला कराचींत रहावे अशी जीनांची इच्छा नव्हती. कारण १५ ऑगस्ट हा दिवस जीनांच्या ऐश्वर्याचा होता. लाखों लोकासमोर " पाकिस्तान झिंदाबाद " अशी बांग देतांना त्यांना आसपास दुसरें कुणीहि नकों होते.

## दिल्लीचा स्वातंत्र्यसोहळा

माउंट बॅटन १४ ऑगस्टलाच दिल्लीला विमानाने परत आले. दिल्लीतील गडबडीचें वर्णन करताना मोस्ले लिहितो–

" दिल्लीत समारंभाची तयारी वेगानें सुरू होती. कमानी उभ्या रहात होत्या. जिकडेतिकडे निशाणेंच निशाणें फडकत होती. बलगाड्यांतून आसपासच्या गांवातून शेतकरी-कामकरी दिल्लीत लोटत होते. दिल्ली-मुंबई-कलकत्ता या शहरांत आनदाला उधाण आणि उत्साहाला भरतें आलें होतें. "

" लेजिस्लेटिव्ह् असेम्ब्लीचे सभासद धोतरें नेसून आणि धोव्याकडून आणलेल्या कडक पाढऱ्या टोप्या घालून एकत्र जमत होते. त्याच्यापैकीं अनेकांनीं स्वातंत्र्यासाठीं कारावास भोगला होता आणि आतां त्या देहदंडाचें चीज होणार होतें. तिथें जवळजवळ सर्वच होते–

Nehru, his saffron face drawn with weariness, rings under his eyes, in a state of sublime exhaustion; Patel more like a Roman Emperor than ever, wearing his dhotti like a toga and triumph like a flag; a grinning Rajgopalachari as near to a state of intoxication, as that dedicated old tea totaller will ever be; Prasad near to tears; Rajkumari Amritkaur actally in tears and only the sad sad face of Moulana Abul Kalam Azad, to whom this occastion was something like a tragedy, sticking out from the sea of happy faces like gaunt and ravaged rock "

मध्यरात्रीचा प्रहर जवळ सरकू लागला. नेहरू म्हणाले–

" मध्यरात्रीचा टोला आतां पडेल. सारें जग निद्रित असतांना स्वतंत्र भारत सजीव होऊन जागा होत आहे. इतिहासात असा एक क्षण केव्हांना केव्हा येतो कीं, जेव्हां एक पर्व समाप्त होतें आणि देशाचा चिरडलेला आत्मा बोलू लागतो. या गभीर क्षणीं आपण भारताच्या उत्कर्षासाठीं येथील जनतेच्या स्वास्थ्यासाठीं आणि पर्यायानें अखिल मानतेच्या हितासाठी झटण्यासाठीं बद्धपरिकर होऊं या."

मध्यरात्र झाली. उलटली. १८२ वर्षांची भारतातील ब्रिटिश सत्ता संपुष्टांत आली.

" जय हिंद– "

माउंट बॅटनकी जय–

नेहरूकी जय—

अशा निनादानीं दिल्लीचें आसमत तरारून उठले. ज्यानीं राज्य केलें त्यांच्याविषयी द्वेषाचा लवलेश दृगोचर होत नव्हता. जणू या नाटकांत खलपुरुष सुधारून त्यानें नायकाची जागा घेतलेली होती. निदान तसें भासत तरी होतें.

परंतु या प्रकरणाचा शेवट करण्यापूर्वी मोस्ले सागतो––

## सहा लाखांचा नाहक बळी

" भारत स्वतंत्र झाला. दिल्लीत व कराचीत आनंदीआनद होता– परतु पजाबांत या स्वातंत्र्याचें दर्शन भयानक होतें. "

" १५ ऑगस्टला सकाळीं अमृतसरच्या बाजारांत अनेक मुसलमान स्त्रियाना आणि मुलीना नागवें करून रस्त्यातून त्यांची मिरवणूक काढण्यांत आली. त्यांतल्या अनेकावर अमानुष बलात्कार झाले. काहीचा खातमा उडवण्यात आला. फक्त सहा-सात स्त्रिया सुवर्णमदिरांत पळत आल्या तेवढ्या वाचल्या–– "

" लाहोरांत त्याच दिवशीं संध्याकाळी शीखांच्या गुरूद्वारावर मुसलमानांनीं हल्ला केला. तिथें शेंकडों शीख कुटुंबें आश्रयाला होतीं. गुरुद्वारा पेटवण्यात आलें. आणि जेव्हां आंत जळणाऱ्या लोकांच्या किंकाळ्या आसमत भेदून आकाशाला गवसणी घालू लागल्या. तेव्हां पोलिस दूर उभें राहून शांतपणे सगळा प्रकार पहात होते––"

मोस्ले याचा हा ग्रंथ इथें समाप्त होतो. परंतु या ग्रंथाइतकेंच याला त्याने जो उपसंहार जोडला आहे त्याला महत्त्व आहे. या उपसंहारांत त्याने हें स्वातंत्र्य रणावीण येऊनदेखील रक्तपात कां टाळता आला नाहीं, कुणाच्या कायचुका झाल्या या प्रश्नाची उत्तरें शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

मोस्ले लिहितो––


" ऑगस्ट ४७ ते मे ४८ पर्यंत चौदा ते सोळा लाख हिंदू मुसलमान व शीख यांना आपापली घरेंदारें व जमीनजुमला सोडून रक्ताला चटावलेल्या घोळक्याच्या भीतीनें संरक्षणाकरता पळ काढावा लागला. याच कालखंडांत सहा लाख लोक मारले गेले. नुसते मारले गेले नाहीत, त्यांतील जीं अर्भकें होती त्यांना पायाकडून उचलून दगडाभिंतीवर त्यांचीं डोकीं फोडण्यांत आलीं. त्यातील ज्या अल्पवयीन मुली होत्या त्याच्यावर बलात्कार करण्यांत आले, त्यांतील ज्या तरुण स्त्रिया होत्या त्यांच्यावर बलात्कार करून त्यांचें स्तनहि कापण्यांत आले. आणि त्यातील ज्या गरोदर स्त्रिया होत्या त्यांचे गर्भपात करून त्यांना मारण्यात आलें. या काळांत लाहोर स्टेशनांत मृतांनीं भरलेल्या आगगाड्या पोंचत होत्या. शीखांचीं व हिंदूचीं प्रेतें भरून गाड्या पाकिस्तानांतून बाहेर जात होत्या. ज्या देशात गांधींजीनीं अहिंसा हें व्रत म्हणून प्रचारिलें त्याच देशांत अमानुषपणें खून, जाळपोळ, लुटालुट आणि बलात्कार झाले. चेंगीझखानाच्या दिवसांची आठवण आली हें केवढें दुर्दैव––! "

" १९४७ सालीं भारतांत गिधाडाना अमाप भक्ष्य लाभलें. कुजणाऱ्या मासाची चव विसरावी एवढ्या प्रमाणांत ताजें रक्त आणि मांस त्यांना अवतींभोंवती विपुल प्रमाणात उपलब्ध झालें होतें. "

" शेवटीं १७ ऑगस्टला स्वातंत्र्यदिनानतर ४८ तासानीं जेव्हां रॅडक्लिफ अॅवॉर्ड माउंट बॅटनने प्रसिद्ध केलें तेव्हां शीख जमात रागानें वेडी झाली-- "

" या सर्वांत दुःखाची गोष्ट अशी कीं, पश्चिम पंजाबचे ब्रिटिश गव्हर्नर सर फ्रांसि मुडी यांनी मुसलमानाना शीखांना पंजाबातून हुसकण्यासाठी उघड प्रोत्साहन दिलें. ५ सप्टेंबर ४७ ला जीना याना पाठवलेल्या पत्रांत मुडी लिहितात––

––" मी सर्वांना हें सागतो आहे कीं, शीख कसे सरहद्द



दि. ७ जून १९४७ रोजीं फाळणी–योजनेवर शिक्कामोर्तब करणाऱ्या दिल्लींतील ऐतिहासिक बैठकींत ......... (डावीकडून) पं. नेहरू, लॉर्ड इस्मे, लॉर्ड, माउंट बॅटन वॅ. जिना......

ओलांडतात याची मला पर्वा नाहीं. परंतु महत्त्वाची गोष्ट ही आहे त्यांना इथून हुसकलें पाहिजे-- "

" कुणी असें म्हणतील कीं, ही दिली गेलेली किंमत स्वातंत्र्याच्या बदल्यांत फारशी महत्त्वाची नाहीं. सहा लाख लोक मेले, सोळा लाख बेघर झाले. माणसें हैवान झालीं. भारत–पाकिस्तान सरहद्दीची हवा निदान एक पिढीपर्यंत तरी कटु आठवणींनीं भरून गेली. फुकट फुकट हें सारें रामायण घडलें--"

" हें सर्व न घडून चालण्यासारखें होतें. जर स्वातंत्र्याची प्राप्ति इतक्या झपाट्यानें न करून घेतां तें थोडया धीरानें घेतलें गेलें असतें तर हा रक्तपात टळला असता-- "

## चुकांमागून चुका

" वॅव्हेलच्या योजनेप्रमाणें हें सर्व होऊनहि कदाचित भारत अखंडित राहिला असता. पण ती योजना फेकून देण्यांत आली. "

" जीनांचा मुसलमानांचा स्वतंत्र आस्तित्वाचा दावा मान्य केला केला गेला. परंतु त्यांतून होणाऱ्या परिणामांचा मुकाबला करण्याची कांहीं तरतूद केली गेली नाहीं, पाकिस्तान म्हणजे कोणते प्रांत हें ठरलेलें नव्हतें. सैन्याच्या विभाजनाचा आराखडाच नव्हता. "

" नुसत्याच सिमल्याच्या वाटाघाटींत टेबलाभोंवतीं बसून पाकिस्तान जन्माला मात्र घातलें. "

" जर जून १९४८ चा हिंदू मुसलमान झगडा मिटो वा न मिटो अखंड भारतांतून आपली सत्ता काढून घेण्याचाच मजूर मंत्रीमंडळाचा निर्धार होता, तर भारत खंडित करण्याचा उपद्व्याप अंगावर घेऊनहि स्वातंत्र मात्र १० महिने अलिकडे घेतले जावें ! "

" चुकांमागून चुका "

भारताची फाळणी जाहीर होती मे १९४७ मध्यें आणि जून उजाडला तरी सैन्याच्या फाळणीचा विचारच केलेला नाहीं. आणि अवधि फक्त सहा आठवडे उरलेला.- "

" भारताची फाळणी ठरली मे मध्यें आणि सरहद्दीचा बिकट प्रश्न सोडविण्याचें कमिशन नेमलें जूनच्या अखेरीस- "

## सगळा गाडी घोड्यापुढें ठेवण्याचा प्रकार–!

" मे मध्यें फाळणी जाहीर, स्वातंत्र्य ऑगस्टमध्यें आणि लोकांना नेमकें पाकिस्तान कुठें सुरुं होतें हें सांगणारा रॅडक्लिफ रिपोर्ट स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दोन दिवसांनीं जाहीर- "

" या सर्व घोडचुका टाळतां आल्या असत्या. या चुकांपायीं हजारो निरपराध जीवांचा मात्र प्राण गेला.— "

" जरा धीरानें काम घेतलें असतें तर ही सारी हत्या टाळता आली असती. पाकिस्तान निर्मिती हा फक्त जीनांच्या कर्तृत्वाचा खेळ होता. हे जीना पाकिस्तान निर्मितीनंतर वर्षभरदेखील जगले नाहींत. जरा धीर धरला असता! कळ काढली असती! घिसाडघाईला बळी दिला नसता ! गांधीजींचा सल्ला होता सबुरीनें घ्या, स्वातंत्र्य आतां कुठें जात नाहीं. भारताचा विचार केला तर फक्त गांधीजींचा सल्लाच बरोबर होता. "

नेहरूंनीं १९५६ सालीं नेहरूंचा चरित्रकार मायकेल ब्रीचर याला मुलाखतींत सांगितलें होतें–

" आम्हीं त्या वेळेला हाच विचार केला कीं, अखंड भारतांत कटकटी सतत रहाणार. पाय ओढण्याचे प्रयत्न होणार. शिवाय स्वातंत्र्य मिळवण्याचा अन्य मार्गहि दिसत नव्हता. अशा परिस्थितींत आम्हीं ठरवलें कीं, एक ताकदवान भारत आपण निर्माण करूंया. ज्यांना या भारतांत रहावयाचें नसेल त्यांना इथें कोण डांबून ठेऊं शकणार–? "

## पंडितजींचें सत्यकथन

मोस्ले लिहितो कीं, यापेक्षां १९६० सालीं माझ्याशी बोलतांना नेहरू सत्याच्या अधिक जवळ आले. नेहरूंनीं मला सांगितलें–

" खरी गोष्ट ही आहे कीं, आम्हीं त्यावेळीं थकलेलीं माणसें होतों. आमचीं वयें होत आलीं होतीं. पुनः तुरुंगवासाचा विचार फारच थोडयांना सहन झाला असता. जर अखंड भारताचाच आम्हीं आग्रह धरला असता तर आम्हांला पुनः तुरुंगातच जाणें भाग पडलें असतें.

पंजाबांतून रोज जातीय दंगलीचीं वृत्तें येत होतीं. भारताच्या फाळणी-मुळें यांतून वाट सांपडेल असें आम्हाला वाटलें. आणि आम्ही तो मार्ग पत्करला. पण जर गांधीजींनीं आम्हांला विरोध केला असतां तर कदाचित् आम्हीं स्वातंत्र्यलढा लढतच राहिलों असतों. वाट पाहिली असती. आमची अशी भावना झाली कीं, हें विभाजन कांही काळ राहील. पाकिस्तान पुन: भारताकडे आल्याशिवाय राहणार नाहीं. कुणालाच याची कल्पना नव्हती कीं, हत्या होईलच, काश्मिरमध्यें अघटित घडेल आणि या दोन देशांत कायमचें वैमनस्य येईल-"

१५-८-४७ ला भारताचे पहिले प्रधानमंत्री झाल्यावर १७ ऑगस्टला नेहरू प्रथम पंजाबांत अमृतसरला विमानानें गेले. त्यांनीं पंजाबचा दौरा केला. त्यांनीं तिथें जें पाहिलें त्यामुळें त्यांना जवळजवळ वेड लागायची पाळी आली. स्वातंत्र्यासाठी जी घिसाडघाई केली त्याची केवढी जबरदस्त किंमत मानवहत्त्येच्या रूपानें द्यावी लागत आहे याची त्यांना कल्पना आली. मुठी आवळून ते दगेखोरीत शिरून लोकांना परावृत्त करूं लागले. यानंतर असें मानणे फारच कठीण आहे कीं, १५ ऑगस्ट १९४७ या दिवसासंबंधीं नेहरूंच्या आठवणी तरीहि सुखद राहिल्या आहेत. ●●

स्वातंत्र्याचा सूर्य उदयचलावर येण्याचीं चिन्हें दिसूं लागताच संस्थानिकांची घुबडें फडफडाट करूं लागलीं. परंतु पटेल, मेनन या दुकलीनें फार अक्कलहुशारीनें व कणखरपणें हा प्रश्न कसा निकालांत काढला याची सुरस कहाणी मोस्ले यानी 'The downfall of Princes' या प्रकरणांत मध्येंच वाचकांना सादर केली आहे. 'रणावीण स्वातंत्र्या'चा हा प्रदीर्घ लेख ही कहाणी सांगितल्याविना संपूं शकत नाहीं. अगदी थोडक्यांत ती सांगायची ठरवली तरी तिचा विस्तार जरा मोठाच होतो. पण उत्सुक वाचक याबद्दल क्षमा करतील असें गृहीत धरून पुस्तक-परिचयाचा हा शेवटला भाग येथें वाचकां-समोर ठेवला आहे.

भोपाळच्या नबाबानें प्रथम हालचालीना सुरुवात केली. भोपाळचे नबाब हे 'चेंबर ऑफ प्रिन्सेस्' या संस्थानिकाच्या संघटनेचे अध्यक्ष होते. भोपाळच्या नबाबाना माउंट बॅटन यानीं विश्वासांत घेऊन सत्तादानाचा आराखडा समजावून सांगितला, यावर नबाबांनीं लगेच विचारलें की, "शाही सरकार संस्थानिकांनाहि १५ ऑगस्टला डोमि-निअन स्टेट्सचा दर्जा देणार की नाहीं?' याला माउंट बॅटननी उत्तर दिलें की, 'ब्रिटिश सरकारचा तसा विचार नाहीं' या गोष्टीनंतर तीनच दिवसांनीं भोपाळच्या नबाबांनीं चेम्बर ऑफ प्रिन्सेसच्या चॅन्सेलर-शिपचा राजिनामा दिला आणि असे जाहीर करून टाकलें कीं, 'ब्रिटिश सत्ता भारतातून मागें घेण्यांत येताक्षणींच आपल्या संस्थानचें काय करायचें हें ठरवावयास आपण मुखत्यार व स्वतंत्र आहोत-'

व्हाईसरॉय याचे संस्थानिकाच्या प्रश्नावरचे सल्लागार सर कोन-राड कॉरफिल्ड यांच्याशी श्री. मोस्ले यानीं तत्कालिन परिस्थिती-संबंधी नतर बोलणें केले, तेव्हां सर कॉरफिल्ड यानीं सांगितलें-" मला अशी आशा होती कीं, लीग व काँग्रेसीपुढाऱ्यांच्या कचाटयांतून संस्था-निकांना वांचवण्याच्या माझ्या प्रयत्नात माउट बॅटन यांची संस्था-निकाना तिळमात्र सहानुभूति नव्हती, हें माझ्या लक्षांत आलें. मी सुरुवातीपासून संस्थानिकाना हा सल्ला देत होतों कीं, त्यानी आपल्या कारभारांत लोकशाहीप्रधान राज्यकारभार आणावा म्हणजे काँग्रेसी-नेत्याना टक्कर देणें त्यांना अधिक सुलभ होईल. परंतु तशी सक्ती न करण्यात माझी चूकच झाली—"

"सर कॉरफिल्ड यांचा असा विश्वास होता कीं, सर्व सहार्शे संस्थानें वांचवतां आलीं नाहींत तरी निदान हैदराबादसारखीं दोन तीन मोठीं संस्थानें तरी कमींतकमीं वांचवलींच पाहिजेत. याकरतां त्यानीं 'पॅरामाउंटसी' या कराराचा फायदा घेण्याचें ठरवलें (ज्या करारानुसार संस्थानिकांनीं काहीं अधिकार ब्रिटीश सरकारला बहाल केलें त्याला 'पॅरामाउंटसी' म्हणतात.) सत्तादान झाल्यातंतर ब्रिटिश सरकारकडून हे अधिकार पुन: संस्थानिकांकडे परत येतात व त्यांची इच्छा असल्याखेरीज काँग्रेसला वा लीगला त्यांच्यावर नव्या डोमि-निअनमध्यें सामील होण्याची सक्ति कायद्यानें करतां येत नाहीं असा सर कॉरफिल्ड यांचा यथार्थ दावा होता.– "

## कॉरफिल्डचे उपद्व्याप

या कॉरफिल्डसाहेबानें माउंट बॅटनना डावलून लॉर्ड लिस्टोवेल–सेक्रेटरी ऑफ स्टेट –यांचेशी लंडनमध्येंच संधान बांधलें. मे १९४७ मध्यें जेव्हां इस्मे व जॉर्ज अॅबेल माउंट बॅटन यांचा मूळ सत्तादानाचा आराखडा घेऊन लंडनला गेले तेव्हां सर कॉरफिल्ड त्यांच्याबरोबर लंडनला गेले. त्यानीं निघताना माउंट बॅटन याना 'पॅरामाउंटसी' संबंधीचा निर्णय घेण्याकरतां आपण लंडनला जात आहोत असें मोघम सांगितलें. या संबंधीं सर कॉरफिल्ड यांनीं मोस्ले याना नंतर सांगितलें.

"मी कशाकरतां जात होतों तें माउंट बॅटनना नीटसें समजलें नाहीं. मी पण स्पष्टीकरणाच्या फंदांत पडलों नाहीं. माझा मुख्य हेतु होता, संस्थानिकाचें हित पहाणें. मग त्यामुळें भारताच्या मार्गात अडथळे आले तरी मला त्याची पर्वा नव्हती—"

लंडनमध्यें पोंचल्यावर लॉर्ड लिस्टोवेल यांचेकडून पॅरामाउंटसी संपुष्टांत आली असा स्पष्ट उल्लेख विधेयकांत करण्याचें आश्वासन मिळालें. तितक्यांत भारतांतून माउंट बॅटन यांची मार्गें वर्णन केलेली तार आली— "माझें विमान पाठवा. मी लंडनला येत आहे—"

तारेप्रमाणें माउंट बॅटन याचें यॉर्क विमान लंडनहून भारताला परत येण्यास निघाले, तेव्हां त्यातून सर कॉरफिल्ड परत आले. दिल्लीला पोंचल्यावर त्यानी माउंट बॅटनची गांठच घेतली नाहीं.

माउंट बॅटन व्ही. पी. मेननसह लंडनला जाण्यासाठीं विमानांत बसले. दिल्ली-कराची मार्गावर विमान असतांना विमानाच्या नोकर-वर्गापैकी एकानें विमान परतलें तेव्हां, कॉरफिल्ड भारतांत परत आल्याचें माउंट बॅटन याना सांगितलें. सर कॉरफिल्ड आपल्याला डावलून काहीं उद्योग करीत आहेत असा माउट बॅटन याना संशय आला. त्यांनीं एका कागदावर व्ही. पी. मेनन यांना चिठ्ठी दिली—

"कॉरफिल्डने काय उद्योग केला याची काहीं कल्पना आहे काय--?" ("Do you know what that son of bitch Corfield has done?")

मेननीं खरडलें--"नाहीं. काय केलें—?"

"मला न कळवतां स्वारी भारतात परतली आहे. त्यांच्या काय मनांत आहे कळत नाहीं--!" ("I wonder what he is up to—")

## चार टन कागदपत्रांची होळी

माउंट बॅटन लंडनमध्यें असताच सर कॉरफिल्ड यांनीं भारतांत राहून बरेच घातुक उद्योग केले होते. "ब्रिटन आणि संस्थानिक याच्यांत झालेले सर्व करारमदार रद्द करण्याच्या दृष्टीनें त्यानी जय्यत तयारी सुरु केली. संस्थानिकासंबंधीं जे खासगी कागदपत्र-कदाचित्

उद्यां नेहरूसरकारच्या हातीं पडलें तर त्रासदायक ठरतील—ते सर्व जाळून टाकण्याचा तडाका त्यांनीं सुरू केला. काश्मीर महाराजांची खासगी लफड्याची फाइल, अलवारच्या महाराजांचीं वेडसर कृत्यें, आणि मुमताजमहलच्या खुनासंबंधींचे कागद हे सर्व अग्निस्थानीं पडले. संस्थानिकासंबधीचे जवळजवळ चार टन गुप्त कागदपत्र जाळून टाकण्यांत आले—"

१३ जूनला माउंट बॅटन यांचे अध्यक्षतेखालीं जी बैठक झाली, तिला नेहरू, जीना व सर कॉरफिल्ड हे हजर होते. यावेळीं नेहरूनीं संतापाने विचारलें—

"पोलिटिकल डिपार्टमेंटनें आगाऊपणा करून भारतसरकारला घातक ठरणाऱ्या गोष्टी केल्या त्या कोणत्या अधिकारांत--? मी आणि माझे सहकारी यानीं यासबंधीं असंख्य पत्रें लिहिलीं त्यांतील एकालाहि डिपार्टमेंटकडून उत्तर आलें नाहीं. मी पोलिटिकल डिपार्टमेंट व सर कोनॉर्ड कॉरफिल्ड याचेवर असा स्पष्ट आरोप करतो, कीं त्यांनीं अधिकाराचा दुरुपयोग केला आहे आणि त्याची न्यायालीन चौकशी झाली पाहिजे—"

नेहरूंच्या या अनपेक्षित हल्ल्यानंतर सर कॉरफिल्ड यांनीं आशेनें माउंट बॅटन यांचेकडे पाहिलें कीं, आतां माउंट बॅटन नेहरूंना काय म्हणतात--? परंतु व्हॉईसरॉय कांहींच बोलले नाहींत. जीना सर कॉरफिल्ड यांच्या मदतीला धांवले. जीना उद्‌गारले—

"जर श्री. नेहरू बैठकींत असे भावनेच्या आहारी जाऊन वायफळ आणि निराधार आरोप करणार असतील तर ही बैठक चालू ठेवण्यांत काहीं अर्थ नाहीं—"

सर कॉरफिल्ड यांनीं संथपणें खुलासा केला--"मला कांहींच लपवावयाचें नाहीं. सेक्रेटरी ऑफ स्टेटच्या सल्ल्याप्रमाणें मी वागत आहे. मला सेक्रेटरी ऑफ स्टेटनें असें स्पष्ट सांगितलें आहे कीं, पॅरामाउंटसी ही नव्या डोमिनिअन्सकडे आपोआप जाते असें जर ब्रिटिशसरकारनें मानलें तर तो संस्थानिकांचा विश्वासघात होईल—"

जीना आतां मात्र सांवरलें. आणि मग जीना व नेहरू या दोघांनीं सर कोनॉर्ड कॉरफिल्ड याचेवर टीकास्त्र सोडलें.

"या प्रकारानंतर सर कॉरफिल्ड व माउंट बॅटन यांचें संबंध नेहमींच ताणलेले राहिले."

सर कॉरफिल्ड यांनीं उघडपणें संस्थानिकांच्या मनांत हें भरवून दिले कीं, १५ ऑगस्टनंतर संस्थानिकांना पाकिस्तानांत सामील व्हायचें कीं भारतांत सामील व्हायचें हे दोनच पर्याय नसून स्वतंत्र रहाण्याचा तिसरा पर्यायहि पॅरामाउंटसी संपुष्टांत आल्यामुळें त्याना प्राप्त होतो.

या आमिषाला त्रावणकोरचे महाराज बळी पडले. त्यांनीं १५ ऑगस्टनंतर आपण सार्वभौम होऊं असें जाहीर केलें. दुसऱ्याच दिवशी निजामनेंहि असेंच जाहीर केलें.

### व्ही. पीं चा कानमंत्र

नेहरू यांनी सर कॉरफिल्ड याच्या हालचाली लक्षांत घेऊन गृहमंत्र्याच्या अधिकाराखाली एक संस्थानासबंधीं विचार करण्यासाठीं खातें उघडलें. सरदार पटेलाकडे हें खातें ओघानें आलें व पटेलानीं खात्याचे सेक्रेटरी म्हणून व्ही. पी. मेननना निवडले.

पॅरामाउटसीचा फायदा घेऊन ब्रिटिश सरकारनें भारताच्या पायांत खोडा घालावा याबद्दल सरदार बिघडले होते. त्यांना मेनननीं दिलासा दिला– मेनन म्हणाले—

"पोलिटिकल खात्याला असें वाटतें आहे कीं, यामुळें आपलें कायमचें नुकसान ते करूं शकतील. मला असें वाटत नाहीं. उलट माझें तर असें मत आहे कीं, पॅरामाउंटसी संपुष्टांत येत आहे हें आपल्याला शापीत वरदानच आहे. जर हे सार्वभौमत्वाचे अधिकार आपल्याला सुपूर्त झाले असते तर जे करारमदार ब्रिटिशानीं केलें त्याला आपण कायमचे बाधले गेलों असतों. परंतु आता हे करारमदारच संपतील. खास अधिकारहि लुप्त होतील. आतां कोरी पाटी हाती येत आहे संस्थानिकांनीं कसें वागावयाचे हें सागण्याची आता आपली पाळी आहे आणि त्यांची सद्दी आतां संपली आहे."

अजून १५ ऑगस्ट उजाडावयास आठ आठवडे होते. एवढ्या काळांत प्रत्येक संस्थानिकाला गाठून त्याच्याकडून सरक्षण, परराष्ट्र व्यवहार व दळणवळण या तीन बाबतींत सार्वभौम अधिकार भारतानें मिळवावयाचें व याकरता लॉर्ड माउंट बॅटन याचें सहकार्य घ्यायचे असा पटेल–मेनन यानी तत्काळ निर्णय घेतला. यालाच सामिलीकरणाचा करारनामा (Instrument of accession) हे नामाभिधान मिळालें.

मेनन यानी लॉर्ड माउटबॅटन यांचें सहकार्य सर कॉरफिल्ड याचेवर मात करून मिळवले व १५ ऑगस्टपूर्वी संस्थानिकानीं लगतच्या डोमिनिअनमध्यें सामील होण्यासाठी इन्स्ट्रुमेंट ऑफ अॅक्सेशन् वर स्वाक्षरी करावी अशी विनति माउट बॅटनमार्फत संस्थानिकाना करण्यांत आली.

२५ जुलै १९४७ ला माउंट बॅटन यांनीं संस्थानिकांची परिषद बोलावली. माउंट बॅटन यांची अशी खात्री पटली होती कीं, संस्थानिकांनीं स्वतंत्र रहाण्याचा विचार करणें हें मूर्खपणाचें होईल. तेव्हां

एकाचे दोन शब्द !

सुती अथवा गरम होजियरी
कोणत्याहि तऱ्हेच्या टोप्या व
मुलांचे तसेच मोठ्या माणसांचे
अद्यावत तयार कपडे
यांपैकीं कांहींहि
खरेदी करणें असेल तेव्हां

मुंबईस, प्रार्थना समाजा जवळ

एन् व्ही. गोखले यांचें दुकानीं

खरेदी करणें हिताचें ठरेल.
वाजवी किंमत व खात्रीचा माल हें वैशिष्ट्य.

त्यांनीं तत्काळ कुठल्यातरी डोमिनिअनमध्यें सामील होणें अगत्याचें आहे. तेंदेखील १५ ऑगस्टपूर्वी !

### सहज कसा खेळवी

या परिषदेची हकिगत माउट बॅटनचे सहकारी कॅम्बेल जॉनसन यांनीं लिहिली आहे. जॉनसन् लिहितात–

" त्यानी (माउंटबॅटन यानी) संस्थानिकाना हें स्पष्टपणें बजावलें की, १५ ऑगस्ट नंतर ब्रिटिश सरकारच्या वतीने काही करण्याचा त्याचा अधिकार नष्ट होईल. तेव्हां जर कुणी स्वतत्र सैन्यें व दारूगोळा जमविण्याच्या उद्योगांत असतील तर त्यांच्या मदतीला १५ ऑगस्टनतर येणे त्याना अशक्य आहे.

" जे संस्थानिक माउंट बॅटन आपल्याला स्वतंत्र रहाण्यास पाठिंबा देतील अशा आशेनें जमा झाले होते त्यांच्यावर तर कुऱ्हाडच कोसळली शाळकरी पोरांप्रमाणे माउंट बॅटन यानीं प्रत्येकाला सामिलीकरणावर सही करणार कीं नाही असें विचारलें. व्हाईसरॉय आपला सगळा व्हाईसरॉयकीचा इतमाम-गणवेश बिल्ले सैनिकी सन्मान अगावर घालून बोलत होते. परंतु अपेक्षित बोलत नव्हतें हें पाहून बडचाबडचा सस्थानिकाचें अवसान गळालें–"

" एका बडचा सस्थानिकाने आपल्या दिवाणाला या परिषदेसाठीं पाठवलें होतें व तो स्वत: युरोपांत निघून गेला होता. या दिवाणाची माउंट बॅटनची चकमक उडाली ती याच वैठकीत. माउट बॅटन यानीं सामिलीकरणासंबंधीं विचारतांच हा दिवाण उत्तरला–

" सरकारस्वारीकडून याबाबत कांही सूचना नाहींत आणि ते तर परदेशांत आहेत–"

" पण तुम्ही दिवाण म्हणवतां तर तुम्हांला त्यांच्या मनाचा कांहीं अंदाज आहे कीं नाही–?"

" नाहीं–मला त्यांच्या मनांत काय आहे हें समजलेलें नाहीं, आणि तारेनें मी उत्तर मागवूं शकत नाहीं– "

माउंट बॅटन यांनीं लगेच समोरच्या टेबलावरील कागदावर ठेवलेला कांचेचा गोळा उचलला आणि तो डोळयासमोर घरीत सांगितलें–

" मी या कांचेच्या गोळचात पाहून या प्रश्नाचें उत्तर देतों–" निमिषमात्र शांतता पसरली लगेच माउंटबॅटन यानीं सांगितलें–

" His Highness asks you to sign the Iustrument of Accession " (सरकारस्वारीचें तुम्हांला सांगणें आहे कीं, तुम्ही सामिलीनाम्यावर सही करा– "

सगळा हॉल हास्यात खळखळून निघाला. आपल्याच देहदंडाच्या आज्ञेवर सही करताना देखील हसतमुखाने करा असा माउंट बॅटनचा जणूं आग्रहच होता. फक्त एका माणसाच्या तोंडावरचें हांसूं पार पार निपटलें गेलें होतें आणि तो माणूस म्हणजे–सर कॉरफिल्ड !"

माउंटबॅटन यांच्या या परिषदेतील कर्तबगारीचा प्रत्यय लगेच येऊं लागला. एकामागून एक संस्थानिक सामिलीनाम्यावर सहचा करूं लागलें पण सगळेच असें नव्हतें. निजाम दाद लागू देत नव्हता. त्रावणकोर, भोपाळ, जोधपूर, इंदूर हेदेखील बधले नाहीत.

एवढें झाले तरी सर कॉरफिल्ड यांचे भोपाळच्या नवाबामार्फत स्वतत्र रहाण्याचें उपद्व्याप सुरूंच होते. मेननच्या हें ध्यानीं येतांच त्यांनीं माउंट बॅटन यांना सागितलें–

" Either Sir Conard Corfield goes or I go "

(सर कॉरफिल्डनीं तरी गेलें पाहिजे नाहींतर मलातरी गेलें पाहिजे)

माउंट बॅटन यांनीं सर कॉरफिल्ड याना बोलावून आपला गाशा गुंडाळण्यास सांगितलें. २५ जुलैला सर कॉरफिल्ड भारताला राम राम ठोकून जायला निघाले. त्याची घनघोर निराशा झाली होती. त्यांना निरोप देण्यासाठीं फक्त तीन संस्थानिक हजर होते. बाकीच्या पांचशे साडे-पाचशें संस्थानिकांनीं सर कॉरफिल्ड यांची विचारपूसहि केली नाही.

" चिल्लर संस्थानिकांनीं सामिली करणाच्या करारावर सहचा केल्या ह्यांत आश्चर्य नव्हतें. सह्या करणाऱ्या संस्थानिकात बिकानेरच्या महाराजांनीं पहिली सही केली.– "

" बडोद्याच्या महाराजांनीं सही केली आणि मेननच्या गळयांत हात टाकून मुलासारखें ते ढसाढसा ते रडले, एका संस्थानिकाला सही केल्याबरोबर हार्ट अॅटॅक आला. "

त्रावणकोरचे दिवाण सर सी. पी. रामस्वामी अय्यर यांनीं माउंट बॅटन यांचा निरोप महाराजांना सांगितला. महाराजांनी तार केली की,"मला सामिलीकरणाच्या अटी मान्य आहेत. परंतु मी सही करणार नाहीं–" माउंट बॅटन यांनीं उलट तार दिली. " सही करावी लागेल— "

महाराजांच्या विरुद्ध त्रावणकोर कॉंग्रेसनें निदर्शनें आखलीं. रस्त्यावर संस्थानी पोलिसांशी झटापट उडाली. सर सी. पी. रामस्वामी याना कुणी अज्ञात माणसानें भोसकून जखमी केलें. महाराजांनी लगेच घावरून तार केली कीं, सामिलीकरणावर आपण सही करूं. पटेलांनीं त्रावणकोर कॉंग्रेसला निदर्शनें बंद करण्यास सांगितलें.

पटेलांनीं या प्रकरणांत कॉंग्रेसच्या ताकदीची चुणूक दाखवली. त्रावणकोरचे महाराज कोसळतांच बध्या संस्थानिकांचें धाबें दणाणलें. पटेलांचा चाबूक वाजतांच बिथरलेलीं कांहीं घोडीं पुन्हा सामिलकरणाच्या रंगणांत आपण होऊन चालत आलीं.

### सूर्याजी पिसाळाची औलाद

परंतु एक सूर्याजी पिसाळाची औलाद मौजूद होती. जोधपूरचे महाराज हणमंतसिंग यांच्या उपद्व्यापांची मोस्ले यांनीं सांगितलेली हकिगत वाचली कीं, हे सस्थानिक किती स्वाभिमान्य व बेवकूफ होते हें ध्यानांत येतें.

माउंट बॅटन यांनीं एका डोमिनिअनमध्यें सामील व्हा असा संस्थानिकाना सल्ला देतांना असा आग्रह केला होता कीं, ज्या डोमिनिअनला लागून संस्थानाच्या सरहद्दी असतील त्या डोमिनिअनमध्यें संस्थानिकांनी सामील व्हावें. जोधपूर संस्थानाची हद्द भारताला व पाकिस्तानाला दोघांना भिडलेली होती.

जोधपूरचा राजा हा पोलो, विमानउड्डाण आणि नृत्यांगना यांत मश्गूल असे. अत्यंत खर्चिक, काळजीमुक्त आणि खेळाडू अशी त्याची प्रसिद्धी होती. त्याचा राज्यकारभार अरेरावीचा होता. आणि समता वगैरे गोष्टींवर त्याचा विश्वास नव्हता.

या महाराजानें जीना यांची गुप्तपणें गांठ घेतली. बरोबर जैसलमेर संस्थानचा महाराजाहि होता. जीनाना या दोन राजपूत राजाना पाहून विलक्षण आनंद झाला. जीनांच्या हें लक्षांत आले कीं, जर ही दोन संस्थानें पाकिस्तानांत सामील झाली तर इतर रजपूत संस्थानेंहि तेंच करतील. यामुळें पजाब बगालच्या फाळणीमुळें पाकिस्तानचें जें नुकसान झालें तें पुष्कळ प्रमाणात भरून येईल. जीनानी म्हणूनच टेबलाच्या खणांतून एक कोरा कागद पुढें घेतला आणि दोन्ही महाराजांना म्हटलें—

" आपल्या अटी या कागदावर आपण लिहा. मी सही करतों—"

जोधपूरच्या महाराजानें आपल्या सोबत्याकडें पाहून विचारलें—

" तुम्हीं पण सही करणार काय-- "

जैसलमेरच्या राजानें सांगितलें--

" एका अटीवर ! जर उद्यां हिंदु–मुसलमान संघर्ष उत्पन्न झाला तर तटस्थ रहाण्याचा अधिकार माझ्या संस्थानाला असावा, आणि हें आश्वासन लेखी हवें. "

जीनांनीं सांगितलें कीं, असें कांहीं होण्याची शक्यता नाही. परंतु जोधपूरचा महाराज चमकला. जोधपूरची बहुसंख्य जनता हिंदु होती. राजा हिंदू होता आणि पाकिस्तानात सामील होण्याची वाटाघाट सुरूं होती ! त्यानें सांगितलें की " विचार करून काय तें कळवतों--"

" एवढें सांगून जोधपूरचे महाराज दिल्लीला आपल्या हॉटेलांत परतले. मेनन यांना ही घडामोड कळलेली होती. त्यांनीं सायंकाळीं जोधपूरच्या महाराजांची भेट घेतली व त्यांना माउंट बॅटन यांनीं तावडतोब भेटीसाठीं बोलावल्याची थाप ठोकून महाराजांना सोडून मेनन ' व्हॉईसरॉयच्या बंगल्यावर ' गेले. "

" वेटिंगरूममध्यें महाराजांना बसवून मेनन यांनीं माउंट बॅटन यांच्याशी आत बोलणे केलें, व जोधपूरच्या महाराजांचा चालूं उद्योग निवेदन केला. दोघे थोडचा वेळानें बाहेर आले. माउट बॅटन यांनीं महाराजांना सांगितलें, की हिंदु संस्थानाचा हिंदु अधिपति या नात्यानें भारताची मुसलमान व बिगरमुसलमान अशी फाळणी होत असताना, पाकिस्तानला सामील होण्याचा विचार करणें हें फाळणीच्या तत्त्वाला सोडून आहे. याचे दूरवरचे परिणाम काय होतील याचा विचार केला आहे काय ? "

" माउंट बॅटन याच्या कानउघाडणीनंतर जोधपूर संस्थान भारतांत सामील झालें-- "

रजपूत संस्थानांची ही ' ऐने अकबरी ' मेनन यानी उधळून लावली आणि भारताचा दुवा संपादन केला यात शंका नाहीं.

भोपाळच्या नबाबांनीहि काहीं दिवसात शरणागति दिली. परंतु नबाब शहाणा होता. त्यानी पटेलांना पत्र लिहिलें--

" मी ही गोष्ट लपवूं इच्छित नाहीं कीं, माझ्या संस्थानाचें स्वतंत्र अस्तित्व रहाण्याच्या दृष्टीनें माझ्या अधिकारात जें जें होतें तें सर्व भलेबुरे मार्ग मीं अनुसरलें. आतां पराभव मान्य केल्यानंतर मी जसा कट्टर शत्रू होतो तसाच आतां कट्टर मित्र आहे, असा आपल्याला अनुभव येईल. माझ्या मनांत कुणाविषयीं किंतु नाहीं-- "

पटेलांनीं आपल्या उत्तरात मारलेल्याला मारूं नये या सुरांत लिहिलें आहे–

" तुम्ही भारतांत सामील झाला हा आमचा जय झाला व तुमचा पराजय झाला असें मी मानीत नाही. जें होणें इष्ट व अगत्याचें होतें तेंच अखेर झालें आणि यात आपला दोघाचा वांटा आहे असें मी समजतों. "

भोपाळ संस्थान फारशी गडबड न करतां भारतात सामील झालें. परंतु जुनागडच्या नबाबाची खुमखुमी अजून शिल्लक होती. काठियावाडातील हें बहुसंख्य हिंदू प्रजेचें संस्थान मुसलमान नबाबीखालीं होतें. गिरनार पर्वताच्या माथ्यावर जैनांचीं आणि हिंदूचीं प्रसिद्ध धर्मस्थानें या संस्थानांत आहेत,

आशिया खडांतील उरलेसुरले सिंह ज्या गीरच्या अरण्यांत रहातात तें गीर अरण्य या जुनागड संस्थानांतच होतें.

## नबाबाचीं कुत्रीं आणि बेगमा

जुनागड भारतात सामील झालें पण जुनागडचा नबाब आपल्या खासगी विमानातून पाकिस्तानला पळून जात होता. त्याला कुत्र्याचें वेड होतें. जेवढीं कुत्रीं विमानात कोंबता येतील तेवढीं त्यानें कोंबली होतीं. शिवाय चार बेगमा होत्याच. विमान सुटण्यापूर्वी एका बेगमेच्या लक्षांत आलें की, आपले एक पोर राजवाडचात राहिलें. तिनें नबाबाला पोर आणीपर्यंत थांबण्यास सांगितलें. बेगम राजवाडचाकडे जातांच उरलेल्या कुत्र्यांपैकीं आणखी दोन कुत्रीं नबाबानें विमानांत घेतलीं आणि एका बेगमेला न घेतांच विमान उडालें–

### जुनागड-काश्मीरचा शह प्रतिशह

जुनागडच्या नबाबानें जीनाकडे पाकिस्तानांत सामील होण्यासाठीं बोलणें लावलें. जुनागड हें सर्व बाजूनीं हिंदू संस्थानानी वेढलेलें असल्यामुळें व या सर्व संस्थानांनीं जामनगरच्या राजेसाहेबांच्या नेतृत्वाखालीं भारतांत सामील होण्याचें ठरवलें असल्यामुळें जीनाना ही गोष्ट उघड दिसत होती कीं, हें संस्थान पाकिस्तानात आलें तरी तें संभाळणार कसें ? परतु जीना मुत्सद्दी होते. त्यांचा डोळा काश्मिरवर होता. जुनागडची प्रजा हिंदु होती व राजा मुसलमान, तर काश्मिरची प्रजा मुसलमान आणि राजा हिंदु होता. जर कॉंग्रेसनें जुनागडच्या पाकिस्तानांत सामिलीकरणांत कांटे पसरले तर भारताची काश्मिरबाबत भूमिका हादरते हें जीनांना माहीत होतें. राजकारणातला एक डाव म्हणून पाकिस्तान हद्दीपासून २४० मैल अंतरावरील या हिंदु प्रजेच्या संस्थानाचें सामिलीकरण स्वीकारू असें जीनांनी आश्वासन दिलें.

जुनागडच्या नबाबांनी संस्थान पाकिस्तानांत सामील होत असल्याचें जाहीर केलें. हिंदूची पळापळ सुरुं झाली. संस्थानाची नाकेबंदी झाली आणि संस्थानांत अन्नपुरवठा कमी पडूं लागला. लोकानी निर्णयाविरुद्ध चळवळ सुरू केली तरी पाकिस्तान स्वस्थ राहिलें.

" जुनागडचा निकाल लागत असताना जीना व लिकायत मनात मांडे खात होते कीं, सगळें जग या गोष्टी पहात आहे. जर उद्यां काश्मीरनें भारतांत सामील होण्याचें ठरवले तर पाकिस्तान याच मार्गाचा अवलब करून भारताला सागू शकेल कीं, " माफ करा ! "

परंतु संस्थानिकाच्या प्रश्नाबाबत बोलायचें तर पटेल–मेनन यानीं जीनालिकायत यांना खडे चारले असेंच म्हणावयास हवे. ज्या काश्मीरवर नजर ठेवून जीनांनीं जुनागड प्रकरणात हात चोळण्यापलिकडे काहीं केलें नाहीं त्या काश्मीरबाबत कॉंग्रेसच्या हालचाली सुरूहि झालेल्या होत्या.–

काश्मीरच्या महाराज हारीसिंगाबद्दल नेहरूंना प्रेम नव्हतें. परतु नेहरू व गांधीजीनीं महाराजाना घाईने कोणताहि निर्णय न घेण्याचा अनाहूत सल्ला दिला. नेहरू काश्मीरच्या महाराजांना भेटण्यास तयार होते. परंतु हारीसिंग त्यांना कैदेंत टाकील असाच संभव होता.

ही कामगिरी अखेर माउंट बॅटन यांनीच शिरावर घेतली. १९२१ साली माउंटबॅटन व हारीसिंग प्रिन्स ऑफ वेल्सचे ए. डी. सी. होते. तेव्हांपासून त्यांची ओळख होती.

२१ जून १९४७ ला व्हाईसरॉय श्रीनगरला गेले व काश्मीरच्या महाराजांची त्यानीं भेट घेतली. परंतु महाराज ताकास तूर लागूं देईनात. शेवटच्या दिवशी ठरवलेली भेट आजारी असल्याचें निमित्त सांगून महाराजानीं चुकवली. आणि माउंटबॅटन फक्त उपदेश करून परत आले. १५ऑगस्टपूर्वी काय तें ठरवा एवढाच त्यांचा आग्रह होता.

परंतु एकंदरीत काश्मिर प्रकरणांत माउंट बॅटन यानीं नेहरूंच्या तडफेने काम केलें नाहीं व हा प्रश्न रेंगाळत ठेवला. त्याचे परिणाम अजून भारत भोगीत आहे.

## निजाम संपला

पॅरामाउंटसी संपुष्टांत येतें आहे हें आपल्या पथ्यावरच आहे असें श्री. व्ही. पी. मेनन यानी सरदार पटेलाना सागितलें होतें. त्याचा अनुभव हैद्राबाद संस्थानच्या बाबतीत लगेच आला. हे सार्वभौम अधिकार सपलें की, ब्रिटिशाचे करारमदार संपले व आपल्याला यापुढें ब्रिटिशांवर अवलबून रहाता येणार नाहीं हें ब्रिटिशाचा खास शाही दोस्त, मराठ्यांचा जन्मजात शत्रू जो निजाम त्याच्य लक्षांत आलें. ९ जुलै १९४७ ला माउंटबॅटन याना लिहलेल्या पत्रांत निजाम लिहितो–

"प्रिय माउंट बॅटन—

मला असें वाटत होतें, कीं, मी ब्रिटिशाच्या शस्त्रास्त्रावर आणि शब्दावर विसंबून सुरक्षित आहे. शेवटच्या क्षणापर्यंत सैन्यांत वाढ जरूरी नाहीं, असा सल्ला मिळाल्यामुळें मी आजवर गाफीलपणें सैन्य वाढवलें नाहीं. संस्थानच्या कारखान्यात दारुगोळाहि तयार केला नाहीं. स्वातंत्र्याच्या ब्रिटिश सरकारच्या विधेयकांतील सातव्या कलमान्वयें सर्व सार्वभौम अधिकार सपुष्टांत येण्याची तरतूद वाचून मला अत्यंत खेद होत आहे. तुम्ही लंडनमध्यें असतांना माझ्या संस्थानाला डोमिनिअन स्टेटस् मिळावें अशी खटपट मीं केली होती हें आपणास माहित आहे. या सातव्या कलमान्वयें यांवर पाणी पडत आहे. माझे व ब्रिटिश सरकारचे जिव्हाळ्याचे संबंध टिकावेत या दृष्टीनें काहीं तरतूदीची घोषणा पार्लमेंटमध्यें होईल अशी आशा अजून मला आहे. मी ज्या राजनिष्ठेनें आजपर्यंत बादशहाचीं इमानें इतबारें सेवा केली, ते सबंध यामुळें तोडले जात आहेत. तुम्ही माझें हें पत्र ब्रिटिश सरकारपुढें ठेवाल अशी मी आशा बाळगतो. तोपर्यंत मी हे प्रसिद्ध करीत नाहीं. परंतु पुढें *मला संस्थानच्या* हिताच्या दृष्टीनें हें प्रसिद्ध करावें लागलें तर तसें करण्याचा अधिकार मी राखून ठेवतों.–"

माउंट बॅटन यानी पत्र पाठवलें कीं, भारताच्या पोटांत आणखी एक डोमिनिअन निर्माण करण्याच्या मनःस्थितीत ब्रिटिश सरकार नाहीं. तुम्हाला एकच मार्ग आहे आणि तो म्हणजे भारताच्या सामिलीकरणाच्या करारनाम्यावर सही करणें व नतर मेनन, पटेल, नेहरू याच्याकडे खास अधिकारांसाठीं विनती करणें.

परंतु निजामाने हा सल्ला मानला नाहीं. जोपर्यंत माऊंटबॅटन गव्हर्नर जनरल होते. तोपर्यंत निजामाच्या बाबतीत पटेल–मेनन स्वस्थ राहिले. ज्या दिवशी माउंटबॅटन भारतांतून निघून गेले त्याच्या तिसऱ्या दिवशीं निजामानें भारत सरकारला कळवलें कीं,– "माउंटबॅटननी कळविलेली खास अधिकाराची योजना मला मान्य ताहे–"

सरदार पटेलानी मेननना सांगितलें– "त्याला कळवा–वेळ निघून गेली आहे." माउंटबॅटन आपल्याबरोबर आपली योजना घेऊन घरीं गेले आहेत–" ( Tell him it is too late. The Mountbatten plan has sailed to Home" ) यानंतर थोड्या दिवसांत भारताचीं सैन्यें निजामहद्दीत शिरलीं आणि निजाम मुठींत नाक धरून शरण आला.

वर सागितलेल्या जुनागड, काश्मीर आणि हैद्राबाद या संस्थांनाबाबतच्या घटना या १५ ऑगस्टनतर कालानें घडल्या. १५ ऑगस्ट उजडण्यापूर्वी मात्र या तीन संस्थांनाखेरीज सर्व संस्थानें भारताच्या नकाशांत विलीन झालीं. रक्ताचा थेंबहि न सांडता ( सर सी. पी. यांच्या रक्ताचा अपवाद ) पटेल–मेनन यांनीं संस्थानिकांचा प्रश्न निकालात काढला. श्री. मोस्ले या घटनेचें बरेचसें श्रेय व्ही. पी. मेनन याच्या कर्तृत्वाला देतो.

भारताच्या स्वातंत्र्य युद्धांतील 'रणाविण' असा भाग एवढा तरी निश्चितच मान्य करावा लागेल.

• • •


# पांढरे डाग

अनुभवसिद्ध प्रसिद्ध गुणकारी औषध. अनेक बक्षिसें व हजारों अभिप्राय मिळाले आहेत व नित्य मिळतात. औषधाची किंमत ६ रुपये. पो. ख. १ रु. माहिती मागवा. मोफत पाठवू.

नकली वैद्यांपासून सावध राहावे.

वैद्य बी. आर्. बोरकर. आयुर्वेद भवन ( माणू. )
मु. पो. मंगरूळपीर. जि अकोला ( महाराष्ट्र. )



# समाज प्रबोधन संस्था

विद्यापीठ वाडा, १२४२ सदाशिव पेठ, पुणे २.

## नवें प्रकाशन

अंतरीक्ष प्रवास : का. वा. कोगेकर

मूल्य रुपये दोन

# जगावेगळें एकत्र कुटुंब

—आमच्या प्रतिनिधीकडून

' गणपत जाधव ' ही गेल्या अंकांत प्रसिद्ध झालेली एका सामान्य पट्टेवाल्याची मुलाखत अनेकांना आवडली.

मुंबईहून वरळी येथील डी. डी. चाळीतील एक वाचक लिहितो—, " एका सामान्य पट्टेवाल्याची आपल्या प्रतिनिधीनें घेतलेली मुलाखत वाचनीय तर आहेच; शिवाय कार्य प्रशंसनीय असून इतरांस मार्गदर्शनीय ठरेल. "

या अभिनव उपक्रमांतील हा दुसरा लेख. सोळा अशिक्षित माणसांच्या एकत्र कुटुंबाचा हा परिचय सुशिक्षित म्हणविणाऱ्यांनाहि जवळून पाहावा असा आहे.

चालू जमान्यांत भाऊ भावापासून विभक्त होत आहे; मुलगा बापापासून बदलीच्या निमित्तानें विभक्त होऊं पहात आहे; जागेच्या टंचाईसाठीं म्हणा अगर दुसऱ्या कांहीं कारणांसाठीं म्हणा विभक्त कुटुंब पद्धतीचा उदोउदो होत आहे. अशा काळांत सोळा कोंकणी लोक एका ठिकाणीं रहात आहेत, गुण्यागोविंदानें रहात आहेत, इतकेंच नव्हे तर गेली वीस वर्षें सुखानें रहात आहेत असं सांगितलं तर बऱ्याच लोकांचा विश्वास बसणार नाहीं. एकत्र कुटुंब पद्धतीचं कबरडं मोडलं गेलं असतांना त्याच पद्धतीचा अनुसर वीस निरनिराळ्या घरांत रहाणारे लोक करीत आहेत हें खरंच कौतुकास्पद आहे.

—शुक्रवार, या घरांत तीन तीन खणांच्या दोन खोल्यांत ही मंडळी राहात आहेत. घर सांधारलेलं, मळकट आणि हवा, उजेड नसलेलं आहे. दुसरी खोलीहि तसलीच असावी. घरांत सामानसुमान फारसं नाहीं. एक लांकडी फळ्यांची कॉट, चार–पाच भांडीं. प्रत्येकाचे थोडेथोडे कपडे, अन्न शिजवण्यासाठी लागणारी भांडीं याशिवाय काहीहि जादा सामान त्या खोलींत नव्हतं. मीं प्रथम त्या खोलींत प्रवेश केला. ती वेळ रात्री ८॥–९ ची होती. सगळी कोंकणी मंडळी जेऊन आपसात गप्पा मारण्यांत दंग झाली होती.

वरील पद्धतीनें ते लोक राहातात हें मी बरेच दिवस ऐकून होतों. एकदा प्रत्यक्ष माहिती घ्यावयाची होती म्हणून समक्ष जाणं जरूर होतं.

त्या दोन खोल्यात एकूण १५ पुरुष आणि १ स्त्री असे सोळा लोकांचें एक कुटुंब आहे. १५ पुरुषापैकी १३ लोकांचें आडनांव घडशी आहे. दोघे घडशीचे पाहुणे आहेत. ही घडशी मंडळी रत्नागिरीपासून आठ मैलांवर असलेल्या खेड्यांतली आहेत. त्यांचें जवळचें नातें नाहीं. पण १००–२०० वर्षांपूर्वी त्याच्या घराण्याचा मूळ पुरुष एक असावा. आपसात त्यांचें भाऊबंदाचें नातें आहे.

त्यांच्यातला कोणीतरी एक तीस वर्षांपूर्वी पुण्याला आला आणि कमिटीत कामाला लागला. त्यावेळीं रस्त्यावरचे काचेचे कंदील लावण्याचें काम त्याच्याकडे होतें. आतां ही मंडळी कॉर्पोरेशनमध्येंच निरनिराळ्या खात्यांत कामाला आहेत. त्यांना साधारणपणें १०० च्या दरम्यान पगार आकारला जात असावा. फंड, फंडाचें कर्ज आणि सोसायटी वजा जाता ६० ते ८५ च्या दरम्यान त्याच्या हातांत पैसे पडत आहेत. त्यातल्या एकाला तुला चालू महिन्यांत पगार किती मिळाला हें विचारलें तेव्हा त्यानें सांगितलें, " ऐंशी आणि एक " त्याला एक्याऐंशीं पगार सांगता आला नाहीं.

त्या पगारांतले ३०–३१ रुपये सामुदायिक खाण्याचा खर्च त्यांना पडतो. १० ते १५ रुपये प्रत्येकाला महिन्याला चहापाणी, पानतंबाखू यासाठी, कपडालत्ता यासाठीं, खर्च येतो. आणि राहिलेले पैसे कोंकणांत रवाना होतात.

बहुतेक मंडळींना पान तंबाखूचें व्यसन आहे.त्या पलिकडे त्यांची मजल नाहीं.त्यांतल्या एकाने माझ्या देखत चिलीम पेटवली, तेव्हां ह्या बाकीच्या लोकांना त्याच्या ह्या खर्चिक व्यसनाची माझ्यादेखत कुचेष्टा केली. वर्षीसहामहिन्यांतून त्याच्यातला एखादा गडी सिनेमाला जातो. तमाशाला पैसे खर्च करून जात नाहीत. गणपतींत अगर इतर जत्रेच्या वेळी कुठें फुकट पाहावयास मिळाला तर मात्र ते सोडत नाहीत.

राजकारणाबद्दल त्यांचें काय मत आहे, हें विचारावें म्हणून त्यांना विचारलें, " तुम्ही मतें कुणाला दिली रे ? " असे विचारताच त्यांतला एक समजूतदार म्हणाला, " मत कुणाला दिले हें काय सांगायचं असतं ? " आणि मताचें प्रकरण बरेच घोळून घेतल्यानंतर त्यातल्या एकानें सांगितलें त्याचा आशय असा : आम्ही पक्षाला, माणसाला पाहून मतें देत नाही. साधारण आमच्या मतांतलीं सारीं मत सगळ्यांना वाटून टाकतो 'कुणाला राग नसावा, लोभ नसावा' त्यातल्या एकाने कॉंग्रेसचे नाव चटकन् घेतलें. आणि स्मरणशक्तीला बराचसा ताण देऊन अडखळत अडखळत एस्. एम्. जोशींच्या नावाचा उल्लेख केला. हेंच राजकारणाबाबतचे त्यांचें ज्ञान ! !

मी त्याची माहिती घ्यावयास येणार आहे असा निरोप पुढें सांगितला तेव्हा त्यानी " आम्हाला माहिती सांगता येणार नाही, आमच्यातल्या म्होरक्याला, शिकलेल्या माणसाला सांगता येईल, तो असेल तेव्हाच या " असें मला बजावलें. तो मनुष्य किती शिकला

आहे हें विचारलें. तेव्हां त्यांतला ज्ञानू म्हणाला, "ह्याला लिहिता वाचता येतंय्. मराठी दुसरी नाहीं तर तिसरी असेल–" हाच त्यांच्यांतला शिकलेला शहाणा माणूस! त्याच्यावरच त्या अडाणी माणसांची भिस्त–!

–१५ लोकांतले १३ लोक विवाहित होते. त्यांतली एकाचीच बायको इथें होती. सगळ्यांना स्वयंपाक करून घालीत होती बाकीच्यांच्या बायका कोकणांत! वर्षातून एकदां ते महिन्याची रजा काढून कोंकणांत आगोठीला जातात. दैवानें एखादी दु:खद घटना घडली तर मधीं आधीं जातात. वर्षातून एकदाच गांवाकडे जाणें हेंच त्यांचें ससारी जीवन. त्या पलिकडे नाहीं. "तुम्ही इकडे आणि बायका तिकडे कसें काय होतें रे?" असं मी विचारतांच माझं विचारणं त्यांन जरा खवचटपणाचें वाटलें. त्यांतला एक म्हणाला, "शहरांतल्या सारख्या आमच्याकडच्या बायका चहाटळ नाहींत, तसं वांकडं पाऊल पडलं तर तिला आम्ही मारून टाकतों. नाहीतर हांकलून चाळीस गांवांत तिची बदनामी करतो." आणि हें सांगून झाल्यावर कॉर्पोरेशनमधल्या एका कारकुनाच्या प्रेमप्रकरणाची त्या सगळ्यांनीं मोठ्या रसिकपणें त्यांच्या रागडचा भाषेत कुचेष्टा केली.

त्यांची जात कोणती हें मला उघड उघड विचारता येईना. हे लोक मराठे असावेत असं समजून मी म्हणालों, "साळवी, सावंत, शिर्के, सुर्वे यापैकीं तुम्ही का रे–?" त्यावर त्यातला एकजण म्हणाला. "छे! छे! त्यांतले आम्ही नव्हे. ते देशमुख मराठे. त्याच्यात म्होतूर (रिमॅरेज) लावत नाहीत" आणि मग जरा वेळ थांबून म्हणाला. "आमच्यांतल्या बायका सात पाट (रिमॅरेज) लावतील पण एक पोटचं (अॅबॉर्शन) पाडणार नाहीत. पुर्नविवाह चालीचा त्याला मोठा अभिमान वाटला. कोकणांतल्या त्यांच्या लग्नाला ३००–४०० रुपये खर्च येतो. पूर्वीच्या पिढीतली कर्तबगार माणसं लग्न जमवीत. त्यांच्यापुढें कुणी ना म्हणत नसे. त्या माणसाचा शब्द पाळला जाई. जुना जमाना सपल्याचें दु:ख याच्यांतहि होते. 'एखाद्या बाईला दोन मुलें असलीं तर आम्ही म्होतूर लावीत नाही' हेंहि एकानें सागून टाकले.

गौरी, शिमगा, आणि दिवाळी सण महत्त्वाचे. त्यांतल्यात्यांत गौरी सण महत्त्वाचा असावा असें दिसतें "तुमची बायका–पोरं गांवाला, मग तुम्ही दिवाळी कशी करता?" म्हटल्यावर ती मंडळी हंसली "आम्ही दिवाळीतलं सगळं करतों. इतकेंच काय, आम्हींच एकमेकाच्या अंगाला उटणं पण लावतों, एकमेकांला आघोळी घालतों, अस एकानें सागतांच सर्व मंडळी अगदी खसखसून हंसली. त्या विनोदी प्रसंगाची सुखद आठवण त्यांना मोठी गमतीची वाटली.

–गेल्या पंचवीस–तीस वर्षांत त्यांच्यात एकदाहि भाडण झालं नाहीं. ही बांधलेली आवळ्याची मोट सुटण्याचा साधा प्रसंगहि आला नाही. आपसांत कुरबूर अगदीं क्वचित् झाली तर त्या दोघांनीहि चोवीस तासाच्या आंत एकमेकाशी बोललं पाहिजे असा त्या घरांतला दंडक आहे.

त्यांच्यातला एखादाहि मेंबर आजारी पडला तर सगळ्यांनी त्याची प्रामाणिकपणें सेवा करणें हें ते आद्य कर्तव्य समजतात. त्यांच्यांतल्या एखाद्याला वेळेवर पगार मिळाला नाहीं तर, त्या महिन्याला त्याला सवड मिळतें. कुणाचाहि पाहुणा गावाहून आला तर त्याला पैसे मागितले जात नाहीत. एखादा कुणी नोकरीसाठीं आला तर नोकरी लागेपर्यंत त्याला जेऊं घालावयाचें, नोकरी लागल्यावर हिशेब, असा तिथला शिरस्ता आहे!!

–फक्त एकच बाई आलटून पालटून सगळ्या लोकांना स्वयंपाक करून घालण्यासाठीं आणली जाते. तिनें स्वयंपाक करून सगळ्यांना घालावयाचा असतो. ह्या बदल्यांत त्या जोडप्याला जेवणखाणाचा खर्च माफ. तिला सगळ्यांनी मदत करावयाची असते. भाजी, आणणें, ती चिरून देणें, लागणारें साहित्य आणून देणे, आपलीं जेवणाची ताटें आपणच धुणे, कपडे आपणहून धुणे असली कामे सर्वांनीं आळीपाळीनें करणे हें महत्त्वाचें काम. स्वयपाक चागला साधून तयार करणें हें त्या बाईचे काम

दुसऱ्या स्वतंत्र खोलीत त्या जोडप्याची सोय केलेली आहे. तिकडे कुणी फिरकत नाहीं. काय करायच असेल ते इकडच्या खोलींत नियम म्हणजे नियम!

—त्याच्यातला एक भिडू रत्नागिरीहून सात दिवसात पुण्याला चालत आला होता. दोन दिवस इथ राहून मुंबईला चालतच गेला होता!—त्याच्यातल्या एकाला देवी आल्या तर घरांतच त्याची काळजी घेऊन त्याला मरणाच्या दारांतून बाहेर काढला. पण' कमेटीत' त्याला नेऊं दिला नाही.

२५ वर्षाहून एकत्र राहिलेल्या त्या विचित्र एकत्र कुटुबाचं मला अजून मोठं नवल वाटतं. जगांतली कोणतीहि सस्था इतक्या एकोप्यानें इतक्या दीर्घकालपर्यंत कसलाहि अपहार न होता टिकली नसेल. या संस्थेच्या यशाचं रहस्य कोणतं आहे, हें खूप विचार केला तरी मला समजत नाहीं

कधीं वाटतं, न कळत कां होईना त्या लोकानीं दोन बायका कधीच एकत्र आणल्या नाहीत म्हणून ती सस्था चाललेली असावी. दोन बायका एकत्र आल्या कीं, घर फुटत या तत्त्वज्ञानाचं बाळकडू त्याना लहानपणींच मिळालं असावं. आणि त्यांनीं ही दक्षता पहिल्यापासूनच घेतलेली असावी.

कधी वाटतं, त्यांच्यांत फाजील शहाणपणा नसावा. एकमेकांचा बुद्धिभेद करून, रण माजवून, मीच शहाणा असें त्यातलें कुणीच म्हणत नसावें. माझंच सगळ्यानीं ऐकलं पाहिजे, मीच शहाणा ही प्रवृत्ति त्यांतल्या कुणातहि नसावी. म्हणून हे इतके दिवस इतक्या चांगल्या रीतीनें चाललेलें असावें!

कधीं वाटतें, एकमेकांवरचा गाढ विश्वास; अपहार न करण्याची बुद्धि हेच त्या संस्थेचें मुख्य कारण असावें! —कांहीं कां असेना, राजकारणांतल्या मोठमोठ्या पुढाऱ्यांनीं आपला माथा त्यांच्या संस्थेपुढें नमवावा इतकी त्याची एकी मोठी आहे. एकाच आईबापाच्या पोटीं जन्माला येऊन विवाहानंतर थोड्याच काळांत विभक्त होणाऱ्या भावानीं लाजेने मान खालीं घालावी इतकी थोरवी त्यांच्या ठिकाणीं आहे!! माणसाला माणसासारखें वागवा असे पुढारी आपसांत सांगतात पण इथें तें कटाक्षानें पाळलें जातें. सहजीवन हाच उद्धार आहे, हें तत्त्व सुशिक्षितांना पटते किंवा नाहीं कोण जाणें! पण हे लोक जन्माला आल्यापासून त्याच तत्त्वाचें आचरण करीत आहेत. जीवन सुखी करण्यासाठीं नेमकी याचीच जरूरी आहे, असें सांगून स्वत:कडे मोठ्या तत्त्वज्ञानाचा अहंकार घेऊन मिरवणाऱ्यानीं एकदां त्याच्यांत जाऊन बसावं, आणि आपलं ज्ञान अजमावून घ्यावं!!

● ● ●

# संगीत शाकुंतलचा

## प्रथम प्रयोग



**पुणें येथील तंबाखू आळींतील गुळवे हवेली. येथेंच कै. अण्णासाहेब किर्लोस्कर यांनीं संगीत शाकुंतल लिहिलें व नाटकाची रंगीत तालीमहि याच हवेलीच्या तिसऱ्या मजल्यावर करण्यांत आली.**

सुधीर दामले

३१ ऑक्टोबर १८८० सालची गोष्ट ! पुण्यांतील बुधवार पेठेमधील आनंदोद्भव नाटचगृह प्रेक्षकांनी तुडुंब भरून गेलें होतें. मराठी नाटचाच्या इतिहासांत खरोखरच अविस्मरणीय दिवस होता तो !! एक नवें पर्व, एक नवें यग त्या दिवशीं सुरूं झालें. संगीत शौकीन लोक आनंदानें वेडे झाले. कै. अण्णासाहेबांनीं लिहिलेल्या शाकुंतलचा–नव्हे संगीत शाकुंतलचा–प्रथम प्रयोग होता तो. येथूनच मराठी संगीत नाटचाच्या इतिहासांत एक नवें पान उघडलें.


कै. अण्णासाहेबांना आपण मराठी नाटचसृष्टींत कांहीं अपूर्व करावें अशी बलवत्तर इच्छा होती. पण मार्ग सापडत नव्हता. संस्कृत नाटकांचा ठरीव सांचा सोडून किंवा जुन्या गद्य नाटकांचे नियम मोडून मराठी रंगभूमीवर कोणतीहि क्रांति होत नव्हती. अललडुर्रं किंवा लळितें, तमाशा अशांसारख्या प्रयोगांतून कोणतीहि शिस्त म्हणा किंवा अंगभूत गुणांना वाव मिळतील अशा गोष्टी घडून येत नव्हत्या. सारा कांहीं सांवळा गोंधळ ! अण्णासाहेबांना नको होते तें हेंच ! त्यांना हें सारें बदलून एक नवा आदर्श उभा करावयाचा होता. हाच एक विचार सदैव मनाला टोचीत होता.

आणि अशाच स्थितींत १८८० च्या सुमारास कांहीं सरकारी कामानिमित्त ते पुण्यास आले. तेव्हां पारशी लोकांनीं सुरुं केलेलीं संगीत नाटकें त्यांच्या पाहाण्यांत आलीं. मामुली संगीताच्या योगेंहि तीं उत्तम रंगत असत. इंग्रजी कथानकास संगीताचा साज चढविण्यांत आला होता, असेंच आपण कांहीं केलें तर–!

आणि हाच विचार मनांत बळावून अण्णासाहेबांनीं सर्वश्रुत अशा कालिदासाच्या शाकुंतलचा अनुवाद करण्यास सुरुवात केली. बुद्धि जात्याच प्रगल्भ, तशांतच संस्कृत, इंग्रजी भाषांतील ग्रंथांचें भरपूर वाचन. त्यामुळें सहाजिकच भाषेला एक वेगळाच डौल आला होता. त्याच जोडीला काव्यदेवताहि मनापासून प्रसन्न होती. मग काय विचारता ? शाकुंतलचें कथानक सरसर पुढें सरकूं लागलें. मधून मधून अर्थवाही पदांची पखरण सुरूं झाली. संगीताची जात्याच आवड आणि योग्य ज्ञान. यामुळें शब्द अर्थवाही तर होतेच पण ते त्याचबरोबर तालबद्ध आणि लयबद्ध आकार धारण करूं लागले. ऑगस्टमध्यें सुरूं केलेल्या नाटकाचे चार अंक अवघ्या चार महिन्यांत–ऑक्टोबर महिन्यांत पुरें केलें. पहिलें–वहिलें संगीत नाटक आणि तेंसुद्धां किती योग्यतेचें ! सरकारी कामकाजांतून वेळ काढून अशी कलाकृति सादर करणें म्हणजे कांहीं सामान्य नव्हे. तशांतच संगीत नाटकांचा आदर्श घालून देण्याची मोठी जबाबदारी होतीच. परंतु अलौकिक बुद्धिगुणांनींच तें सहजच शक्य झालें.

नाटक जसें आकार धारण करूं लागलें. तशी पात्र योजनाहि सुरूं झाली. मोरोबा वाघुलीकर आणि बाळकोबा नाटेकर हे दोघे त्यावेळीं पुण्यांत आपल्या गायनामुळें विशेष मान्यवर झाले होते. अण्णासाहेबांनीं सहाजिकच त्यांना हाताशीं धरलें. इतरहि सुशिक्षित मध्यमवर्गीय मंडळी जमा केली. या नाटकानें त्यांना जसें एक नवें पर्व सुरूं करावयाचें होतें. तद्वत लोकांच्या मनांत नाटचकलेबद्दल असलेल्या भ्रामक समजुतीहि दूर करायच्या होत्या. या त्यांच्या इच्छेला सर्वांनीं हरप्रयत्नें मदत करण्यास सुरुवात केली आणि म्हणूनच तो अपूर्व दिवस उगवला.

१३ ऑक्टोबर १८८० रोजीं तंबाखू आळींतील गुळवे यांच्या घरीं पहिल्या तीन




शरद अभ्यंकर.

**" मी नुसतीं चित्रें काढतो. पण कलाकाराच्या वैचारिक संघर्षाचें आणि भावमंथनाचें प्रत्ययकारी चित्रण आमचा वाळ्या करतो. "**

अंकाची रंगीत तालीम झाली. आणि त्यानंतर बरोबर १८ व्या दिवशीं म्हणजेच ३१ऑक्टोबर रोजीं पहिल्या चार अंकांचा जाहीर प्रयोग करण्यांत आला. कोणतीहि विशेष जाहिरात न करतां प्रेक्षकांनीं अमाप दाटी केली. तिसरी घंटा झाली आणि प्रेक्षकांनीं श्वास रोखून धरले. उदाचा सुगंधहि लोकांना कळेना. पडदा वर गेला आणि अण्णासाहेब सूत्रधाराच्या वेषांत सामोरे ठाकले. त्यांची ती भव्य मूर्ति पहातांच प्रेक्षक देहभान विसरले. यानंतर येणाऱ्या प्रत्येक पात्राबरोबर प्रेक्षक स्वतःला विसरूं लागले. शिकारीच्या वेषांत निघालेला दुष्यंत, झाडांना पाणी घालणारी शकुंतला, तिच्या लाघवी, खटयाळ सख्या, तपोनिधी कण्व—सारीं पात्रें पुढें येतांच प्रत्येकजण त्या कथानकाशीं सहजगत्या समरस होऊं लागला. त्यांचे ते मधुर आवाज. तीं अर्थवाहि पदें, ते दिलखेचक संवाद, त्यानुरूप होणारा अभिनय सारे कांहीं अवर्णनीय होते. नाटक संपलें आणि मगच स्वाऱ्यांच्या ध्यानांत आलें, कीं ते अण्णा होते, ते मोरोबा होते.—दुष्यंत नव्हे, ते तर बाळकोबा नाटेकर होते—कण्व नव्हते, आणि ती शकुंतला नसून शंकरराव मुजुमदार होते.

या प्रयोगाचें वर्णन "इंदुप्रकाश" या पत्रांत आलें आहे तें तसेंच उधृत करणें योग्य ठरेल.

" मागील रविवारीं येथील आनंदोद्भव नाटकगृहांत संगीत शाकुंतलचा प्रयोग झाला. हें नाटक प्रायशः गायनयुक्त असून त्या प्रसंगीं कालिदासकृत अभिज्ञान शाकुंतल नाटकापैकीं पहिले चार अंक अभिनिमित झाले. प्रयोगाचे सोईकरितां रा. रा. बळवंत पांडुरंग उर्फ अण्णा किर्लोस्कर शांकरदिग्विजय नाटकाचे कर्ते यांनी मुद्दाम नवीन भाषांतर केलें असून त्यांत निरनिराळ्या रसांस अनुरूप अशा अनेक रागांवर गाता येण्याजोग्या पदादिक कवितांचा फारच मनोहर संग्रह होता. प्रयोगस्थ पात्रांपैकीं दुष्यंत राजाचा भाग फारच अप्रतिम झाला. हें पात्र स्वतः देखणे आणि बांधेसूद असून शिवाय त्याचा कंठहि अति मधुर व हावभावांची ठेवणहि फारच मोहक होती. त्यामुळें या पात्रांचा अभिनय पाहून सर्व प्रेक्षकजनांची चित्तवृत्ति तटस्थ झाली यांत नवल नाहीं. त्याच्या खालोखाल विदूषक, शकुंतला प्रियंवदा, व वैखानस, इत्यादी पात्रांचीं कामें फारच चांगलीं झालीं. कण्वाचें पात्र गायनकलेंत निपुण होतें. तथापि कंठ अतिशयच मधुर पडला व गायनांत रसपरिपोषापेक्षां तान घेण्याकडेच विशेष लक्ष पुरविलें गेलें. त्यामुळें चतुर्थ अंक व्हावा तसा झाला नाहीं. तथापि एकंदरीत संपूर्ण प्रयोग फारच दर्शनीय होता यांत संशयच नाहीं. देखावेहि चांगले होते. तथापि हेंच नाटक येथील नाटचगृहांत न होता मुंबईतील ग्रांटरोड नाटचगृहांत झालें असतें तर येथें प्रयोग खुलला याहून तेथें फारच अधिक खुलला असतां यांत संशय नाहीं. असो ! याच नाटकाचा द्वितीय प्रयोग येत्या रविवारीं व्हावयाचा आहे. "

अशा या पुण्याच्या प्रयोगाचें वृत्त वाचून मुंबईकरांनीं मोठ्या आग्रहाने या मंडळीस मुंबईस बोलावलें. व्हिक्टोरिया थिएटरमध्यें प्रयोग करण्यांत आला. प्रयोगाला डॉ. भांडाकर, का. त्रि. तेलंग, बाळ मंगेश, वागळे आदी सन्माननीय व्यक्ती हजर होत्या. त्यांनीं तर प्रयोग पुनश्च व्हावा असाच आग्रह धरला. तथापि तसें घडून येऊं शकलें नाहीं.

एकंदरींत या आठवणी ऊर भरून आणणाऱ्या, नवा हुरूप निर्माण करणाऱ्या आहेत. या अपूर्व यशाला नटवर्ग तर कारण आहेच पण कै. अण्णासाहेबांची प्रतिभा तितकीच कारणीभूत आहे. कोणत्याहि अडचणींवर ते मात करणारे होते. कल्याण येथें एकदां प्रयोग होता. ऐनवेळीं सकाळी कण्वाचें काम करणारे बाळकोबा नाटेकर येणार नसल्याचें समजलें. तेव्हां तें काम कोणाला द्यावें असा प्रश्न पडला. कण्वाची तीं अवघड पदें नाटेकरांखेरीज कोण म्हणूं शकेल ? पण अण्णासाहेब अडून बसले नाहींत. त्यांनीं बैठक मारली आपल्याला म्हणतां येतील अशीं सोपीं पदें संध्याकाळपर्यंत त्यांनीं तयार केली आणि रात्रीचा प्रयोग रंगला. अण्णांनीं कण्वाचें काम केलें. कांहीं तासांतच तशाच अर्थाचीं तितकीं रंगतदार पदें तयार करणें कांहीं सोपें नव्हतें. परंतु अण्णांना तो सहज प्रकार वाटला.

●●●

## दीर्घायुष्य व कायाकल्प

ही पु. ना. ओक यांची लेखमाला या अंकापासून सुरू होणार होती. जागेच्या अभावी ती देतां आली नाहीं. जानेवारी १९६३ या अंकापासून ती चालू होईल.

—संपादक

# सप्तपदी

## वाट चुकलेला मराठी बोलपट

रंगा मराठे



'सप्तपदी' मध्यें उषाकिरण

'भारतीय संस्कृतींत विवाह हा पवित्रतम संस्कार मानला जातो. ज्या पतीबरोबर स्त्री सप्तपदीचीं सात पावलं टाकते त्याची ती जन्मोजन्मींची युगानुयुगाचीं सोबतीण होते-' हें उदात्त तत्त्व स्पष्ट करण्याकरतां सप्तपदी हा चित्रपट काढला असूनसुद्धां त्याची वाट आणि दिशा संपूर्णपणें चुकली आहे. दिशाभूल झालेलीं माणसं जशीं सैरावैरा भटकतात तशींच या चित्रपटांतील पात्रं असंबद्ध बडबडतात व वाट फुटेल त्या दिशेनं धांवत सुटतात. अर्थात् याची जबाबदारी कथालेखक वि. वि. बोकीलांपेक्षां पटकथालेखक ( मधुसूदन कालेलकर ) व दिग्दर्शक ( दत्ता धर्माधिकारी ) यांचेवरच आहे. सप्तपदीशी अर्थाअर्थी या चित्रपटाचा कांहींच संबंध नाहीं. एकूण १३५१ फूट लांबीच्या या चित्रपटांत मध्यंतरापर्यंत, म्हणजे सुमारें सात हजार फुटांपर्यंत "सप्तपदी" सुरूंच झालेली नसते. सप्तपदीनंतरसुद्धां सप्तपदीचा अर्थ चित्रपटांत कुठेंच स्पष्ट होत नाहीं. ज्या भारतीय विवाह संस्कृतींत सप्तपदीला अग्रगण्य स्थान दिलें जातें त्याचें या चित्रपटाला नांव देऊन प्रेक्षकांची दिशाभूल केलेली आहे. मूल जन्मण्याअगोदरच त्याचें घाईनें बारसें केल्याप्रमाणें हा प्रकार होतो.

### कथानक

वडिलोपार्जित शेती व इनामदारी करणारे अण्णा इनामदार ( साळवी ) यांचा मुलगा कांचन ( रमेश देव ) शहरांत कॉलेजांत शिकत असतो. बी. ए. ची परीक्षा देऊन तो आपल्या गांवीं परत येत असतांना आगगाडींत त्याची व लताची ( उषा किरण ) ओळख होते. या ओळखीचें रूपांतर पुढें मैत्री, प्रेम व शेवटीं लग्नांत होतें. कांचन बी. ए. ची परिक्षा पास होतो व लग्नानंतर लतासह आपल्या गांवीं येऊन रहातो. आईवडिलांच्या मायेच्या छत्राखालीं वडिलोपार्जित इस्टेटीच्या आस्वाद घेत निष्क्रिय जीवन जगणें लताला पसंत नसतें. आपल्या स्वतःच्या पायावर उभं राहून त्यानं एल्. एल्. बी. पास होऊन वकील व्हावं व वकिली करावी, अशी तिची इच्छा असते. ती कांचनचं मन वळवतें व तीं दोघं पुन्हा शहरांत येऊन कांचनच्या जुन्या खोलींत संसार थाटतात. स्वतःच्या पायावर उभें रहाण्याच्या प्रयत्नांत त्या दोघांच्या मार्गांत अनेक आर्थिक अडचणी येतात. पण लता मोठ्या जिद्दीनें या साऱ्या अडचणीशीं झगडूं इच्छिते. कांचन मात्र हाय खाऊन वडिलांकडे परत जातो. मात्र त्याची आई त्याला त्याच्या दुबळेपणाचा जाब विचारून त्याचें तोंडहि पहात नाहीं. शहाणा होऊन वडिलांची मदत न घेतां तो वकिलीचा अभ्यास सुरूं करतो. त्या दरम्यान लताला दिवस रहातात. कांचन एल्. एल्. बी. परिक्षा पास होतो. वकील होतो.

ज्या दिवशीं कांचनची वकील या नात्यानें पहिली केस कोर्टांत असते, त्याच दिवशीं लताला बाळंतपणासाठीं हॉस्पिटलांत जावं लागतं बाळंतपण अवघड असतं. ऑपरेशन करणं जरूर असतं. कांचनचें मन द्विधा होतें. इकडे कोर्टांत पहिली केस व तिकडे हॉस्पिटलमध्यें लताचें अवघड ऑपरेशन. लता त्याला धीर देते. हॉस्पिटलमध्यें न रहाता

त्यानें कोर्टात हजर राहणें कसें आवश्यक आहे तें त्याला समजावून सांगते. कांचन कोर्टात परत येतो. केस जिंकतो. इकडे लताचं ऑपरेशन सुखरूप पार पडतं. व तिला पुत्ररत्न होतं. कांचन-लता आपल्या बाळाला घेऊन आईला भेटायला गांवीं परत येतात !

चित्रपटाचं हें कथानक ! लेखक, दिग्दर्शकाला काय सांगायचें हें त्यांचें त्यानाच समजलेलें दिसत नाही.

### आचरट विनोदाचें उपकथानक

मूळ कथानकाला एक आचरट विनोदी पोट कथानक शिवलें आहे. शिवण उसवलेले कपडे घातल्यासारखीं ही पात्रें वेडीवांकडी तोंडें करून ही ऽऽ ही ही ऽऽ" करून हंसतात त्यालाच विनोद म्हणायचा असल्यास न कळे ! कांचनचा रूम पार्टनर हा ह्या आचरट उप कथानकाचा नायक. त्याचं नांव केशव साठे (शरद तळवळकर) त्याच्या प्रेमपात्राचें नांव गीता साने (उर्फ नीता सेन- हा नावांतला विनोद ). केशव आणि गीता चित्रपटात सारखा धांगडधिंगा घालत असतात. हा केशव शिरगणती ऑफिसर म्हणून बराच आचरटपणा करतो. आपल्या प्रेमपात्रावरोबर त्याचे प्रणयचाळे, कुणाच्याहि घरांत शिरून शिरगणती करण्याची त्याची पद्धत, त्याचं बोलणं, चालणं हंसणं, सारंच हिडीस वाटतं. पुष्कळदा या पात्राचं डोकं फिरलं आहे काय अशी शंका येते. हा माणूस बी. ए. सेकंड क्लासमध्यें पास होतो. ( त्यांतहि विनोद असावा किंवा विद्यापीठांना कोपरखळी ! ) आपल्या प्रेमपात्राशीं तो लग्न करतो व आपल्या मित्राला- कांचनला जागा देण्यासाठीं तो आपल्या सासऱ्याच्या ( धुमाळ ) घरी येऊन मुक्काम करतो. आपल्या सासऱ्याची पॅन्ट-शर्ट घालून हा गृहस्थ सर्कशीतल्या विदुषकासारखा विनोद करतो. मधून मधून हा गृहस्थ कोटेचा करून विनोदी वाक्यें बोलतो. कांचनला धीर देतांना तो म्हणतों, "धैर्याचा अकाउंट असल्याशिवाय प्रेमाचा चेक फाडूं नये" हा निष्क्रिय उडाणटप्पू केशव आपल्या सासऱ्याकडे मुक्काम ठोकून घरजावई बनतो ही लेखकानें विनोदासाठीं निर्माण केलेली खास सिच्यूएशन बरं कां !

या वरील दोन पात्रांशिवाय आणखी कांहीं विनोदी पात्रें या चित्रपटांत वावरत असतात. लताच्या मामाचा तंबाखूची गुळणी घरून "इ अू अू" म्हणत साधलेला विनोद बऱ्यापैकी म्हणतां येईल. परंतु भटजीच्या ( दामूअण्णा मालवणकर ) पात्रात जो विनोद कोंबला आहे तो म्हणजे तपकीर कोंबून शिंका काढल्यासारखा आहे.

या चित्रपटात एक सर्वात मोठा अभावित विनोद झालेला आहे. तो म्हणजे कांचन सात-आठ महिन्यांत एल्. एल्. बी. होतो. कालेलकर-युनिव्हर्सिटीचा हा नवा कोर्स असावा ! मुंबईला आल्यावर लताला दिवस जातात आणि ती बाळंतीण होण्यापूर्वी कांचन वकीलीहि करूं लागतो. दिवस गेलेले लक्षांत येतात तेव्हां तर कांचनला नोकरीहि नसते. ही दोघें मग मुंबईंत जगतात कशावर ? नोकरी लागल्यावर कॉलेज सुरुं होतें असें मानलें तर अवघ्या नऊ महिन्यांत हा वकिली कशी करूं लागेल ?

### भ्रष्ट नक्कल

चित्रपटाची नायिका लता ही आईवडिल नसलेली मुलगी असते. तिचा सांभाळ मामा मामीच करतात. मामी (विमल घैसास) खाष्ट व ती लताचा जाच करते. तिला छळते. मामा ( वैशंपायन ) तिच्या ताटाखालचं मांजर असतो.

लताचं साठीं उलटलेल्या एका बिजवराशी हे मामा-मामी लग्न ठरवतात, हा प्रसंग म्हणजे शारदा नाटकांतील एका प्रसंगाची भ्रष्ट नक्कल आहे. आजच्या काळांत असे प्रसंग घडत नाहीत हें लेखकाला ठाऊक नसल्यामुळें तो पन्नास वर्षांपूर्वीच्या काळांत वावरत असावा असें दिसतें )

### साक्षात्कारानें झपाटलेलीं माणसें

या चित्रपटांतील पात्रें सुसंबद्ध मुळीच वागत नाहीत. आपला मुलगा कांचन हा आपल्या मायेच्या पाघरुणाखालीं पांगळा बनला आहे. असा साक्षात्कार त्याच्या आईला ( रत्नमाला ) अचानक होतो. ती एकदम झपाटल्यासारखी वागूं लागते. कांचन-लतालाहि घराबाहेर पडण्यास सांगते. हें सारं कां ? तर सुनेनें कांचनला केलेला उपदेश ती आडून ऐकते व एकदम तिच्या वृत्तीत पालट होतो. लताच्या मामीला कांचनची विधवा आत्या ( इंदिरा चिटणीस ) एक व्याख्यान देते आणि ही साऱ्या चित्रपटांत कजागपणें वागणारी बाई सुतासारखी सरळ येते.

चित्रपटांत अनेक पात्रांचा फापटपसारा मांडला आहे. कांचनची बहीण मैना ( बेबी अंजली ) वामन भटजी ( दामुअण्णा मालवणकर ) यांचा इथें प्रामुख्यानें उल्लेख करावासा वाटतो.

### दिग्दर्शन आणि पटकथा

चित्रपटाचें दिग्दर्शन दत्ता धर्माधिकारी यांनीं केलें असून त्याचें दिग्दर्शन-कौशल्य कोठेंच दिसत नाही. पटकथा मधुसूदन कालेलकरांची असून ती अगदीं शिथिल व निर्जीव आहे. बऱ्यापैकी चुटक्यांची ती एक गोघडी आहे.

चित्रपटाचे संगीत दिग्दर्शन गजानन द्वारकानाथ यांचें असून तें फारसें चांगलें नाहीं. "ऊठ मुकुंदा सरली रात" हें सुमन कल्याणपूर यानीं गायिलेले गाणेंच थोडी फार पकड घेतें.

### अभिनय

उषा किरण यांचा नायिकेच्या भूमिकेंतील अभिनय चांगला आहे. पण बऱ्याच वेळीं त्यांनीं अंग चोरून ( सध्यां त्यांना अंग चोरावेंच लागतें.) अभिनय केला आहे. रमेश देव यानीं काम ठीक केलें आहे. साळवी, रत्नमाला, इंदिरा चिटणीस, वैशंपायन, धुमाळ यांचीं कामें चांगली झाली आहेत. शरद तळवळकर आपण चित्रपटाचे नायक आहोत असें समजून जादा आत्मविश्वासानें काम करतात, जणूं काय हा चित्रपट पडणार आहे व सांवरला तर आपल्या विनोदानें या भूमिकेशीं ते एकरूप झाल्यासारखें काम करतात. परिणाम-हाः हाः हि. हिः हुः हुः हुः अशी 'सप्तपदी' तयार झाली आहे. या गुणी नटाला भरपूर वाव मिळेल असें चित्र अजून लिहिलेंच गेलें नाही. ज्या विनोदाला कारुण्याचे थोडें फारहि अस्तर नाहीं ती विनोदी भूमिका फारशा उंचीवर जाऊं शकत नाहीं ही गोष्ट तळवलकरानी भूमिका पत्करताना आग्रहानें ध्यानी घ्यावयाला हवी.

एकूण या चित्रपटांत उल्लेखनीय असं काहीच नाहीं. उत्कृष्ट नटनटींचा संच असूनसुद्धां सामान्य आणि दिशाभूल करणाऱ्या वेड्या वांकड्या संवादामुळें हा चित्रपट निराशाजनक वाटतो.

●●●

जाहिरातींचें मजकुरावर अतिक्रमण नसलेला

एक भरीव व सकस दिवाळी अंक

# माणूस

**धन्य तूंचि कांता**

★ वि. स खांडेकर, ★ आचार्य अत्रे, ★ एस्.एम्. जोशी, ★ बलराज सहानी, ★ केशवराव भोळे,
★ सुधीर फडके, ★ अशोक कुमार, ★ अमर वर्मा, ★ वसंत जोगळेकर,
★ कवि मनमोहन व ★ उद्योगपति गोगटे

या विविध क्षेत्रांतील प्रथितयशांनी

आपल्या सांसारिक जीवनाचें वाचकांना घडवलेलें भावपूर्ण दर्शन

**कथा** —— : अरविंद गोखले, शंकर पाटील, मधु मंगेश कर्णिक, पाटणकर, वि. ग. कानिटकर, श्रीपाद काळे, प्रा. कुलकर्णी, अशोक शहाणे

★ ना. ह. आपटे यांच्या गतस्मृती ★ पु. ना. ओक यांनीं लिहिलेल्या सुभाषचंद्रांच्या नवीन आठवणी

★ एस्. ए. कुलकर्णी यांनीं देवल सर्कसच्या व्यवस्थापकांची घेतलेली चटकदार मुलाखत.

## शनवारवाड्यांतील शमादान

ब. मो. पुरंदरे यांची बाजीराव–मस्तानी–काशीबाई यांच्या जीवनावर आधारलेली प्रदीर्घ इतिहासकथा

☆ मर्लिन मनरो या दिवंगत अभिनेत्रीच्या रहस्यपूर्ण जीवनसंघर्षाचें खास सचित्र दर्शन – रंगा मराठे

☆ एक संपूर्ण रसरशीत ऐतिहासिक कादंबरी – दा. सी. देसाई

● चित्रकार दलाल यांचे संग्राह्य अनेकरंगी मुखपृष्ठ : **महाराष्ट्रलक्ष्मी** ●

मूल्य केवळ अडीच रुपये

( पंचवीस टक्के कमिशन वजा करून एजंटांनी मनीऑर्डर पाठवावी )

**माणूस : ४१९ नारायण पेठ : पुणें २**

संपादक–मुद्रक–प्रकाशक : **श्री ग. माजगांवकर** ※ प्रकाशनस्थळ : **राजहंस प्रकाशन**, ४१९ नारायण पेठ, पुणें २.
मुद्रणस्थळ : प्रशांत **प्रिंटिंग प्रेस**, ४३१ सदाशिव पेठ, पुणें २. ※ कव्हर छपाई : **उदय मुद्रणालय**, पुणें २.